CMYK

सोलापूर तरुण भारत

Solapur Tarun Bharat

न मे कर्मफले स्पृहा

छत्रपती संभाजीनगर, अहिल्यानगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित

छत्रपती संभाजीनगर | सोमवार, दि. २३ मार्च २०२६ | वर्ष - ३ रे | अंक ३४३ | पाने : ८ | किंमत रु. ६/- | dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# सर्वाधिक पुरावे माझ्याकडे, विरोधकांनी राजकीय रंग देऊ नये

## अशोक खरात प्रकरणी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची प्रतिक्रिया

**तभा वृत्तसेवा**

**मुंबई, दि. २२ मार्च :** भोंदूबाबा अशोक खरातला पोलिसांनी महिलेच्या लैंगिक शोषण प्रकरणात बुधवारी अटक केली. त्यानंतर आता त्याला २४ मार्चपर्यंत पोलीस कोठडी सुनावण्यात आली आहे. अशोक खरात त्याच्या कार्यालयात महिलांचं लैंगिक शोषण करायचा. त्यांचा लैंगिक छळही करायचा. पोलिसांना यासंदर्भातले ५८ व्हिडीओ मिळाले आहेत. दरम्यान या प्रकरणानंतर विरोधकांकडून विविध आरोप केले जात आहेत. अशोक खरात प्रकरण आणि विरोधकांचे आरोप याबाबत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी प्रतिक्रिया दिली आहे.



हवेत बोलणं, याला काही अर्थ नाही. अशोक खरात प्रकरण गंभीर आहे. आम्ही इंटेलिजन्सच्या आधारे भांडाफोड केला आहे. लाजेखातर किंवा सामाजिक दबावामुळे एकदम महिला पुढे येत नाहीत. त्या पीडितांना धीर देऊन आम्ही महिलांना समोर आणत आहोत. या संपूर्ण प्रकरणाची वरिष्ठ स्तरावर मॉनिटरिंग होतं आहे. नाशिक सीपी आणि एसआयटी मिळून हे काम पूर्ण करत आहेत. कुणालाच आम्ही सोडणार नाही. या प्रकरणाला जो राजकीय रंग देण्याचा प्रयत्न चालला आहे तो विनाकारण आहे. विरोधी पक्षातले कोण कोण जायचे खरातांकडे याचे पुरावे माझ्याकडे आहेत. सर्वाधिक पुरावे तर माझ्याकडे आहेत. पण ते पोलिसांकडे आहेत. पोलिसांचं काम पोलीस करत आहेत. खरातांना भेटणाऱ्यांपैकी कुणाचा सहभाग असेल तर त्यावर नक्की कारवाई होईल. पण कुणी भेटलं आहे अशा माणसावर कारवाई करायला लागलो तर मग तुम्हाला माहीत आहे कोण कोण कसं काय करायचं ते तुम्हाला म्हणजेच माध्यमांना माहीत आहे. या प्रकरणात राजकारण करु नये. हा महिलांच्या प्रतिष्ठेचा प्रश्न आहे.

आपल्या कथित शक्तींचा वापर करुन महिलांना भरीस पाडणं योग्य नाही. काही झालं तरीही शिक्षा होईलच. सरकार ही बाब सहन करणार नाही. कोण कोण भेटलं, फोटो आहेत ते कुणाचेही फोटो असू शकता. पण ज्यांनी मंत्रिमंडळांची बैठक बोलवून अशोक खरातच्या संस्थेला ४० किमीची लाइन टाकून पाणी अशोक खरातांना दिलं त्यांच्याबाबत कोण कोण गप्प आहे? मंत्र्यांबाबत बोलणारे याबाबत का गप्प बसलेत? सिलेक्टिव्ह का बोलत आहात? असा प्रश्न देवेंद्र फडणवीस यांनी विरोधकांना विचारला आहे. तसंच आम्हाला राजकारणात नाही तर महिलांच्या प्रतिष्ठेत इंटरेस्ट आहे. महिलांवर जे अन्याय झालेत त्यासंदर्भात आधी चौकशी होईल, असं देवेंद्र फडणवीस यांनी म्हटलं आहे.

# लग्नाचे आमिष : भोंदुबाबाचा महिलेवर अत्याचार

**तभा वृत्तसेवा**

**नांदेड, दि. २२ मार्च :** नाशिकमधील कॅप्टन अशोक खरात या भोंदू बाबाचे प्रकरण राज्यात चर्चेत असतानाच नांदेडमध्येही भोंदू महाराजाने एका महिलेला लग्नाचे आमिष दाखवून तिच्यावर वारंवार अत्याचार केल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. या प्रकरणात महिलेने दिलेल्या तक्रारीवरून भाग्यनगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. भोंदू संत हरीगीर दत्तगीर गिरी याला पोलिसांनी अटकही केली आहे. या प्रकरणात पोलिसांनीच एकदा समेट घडवून आणण्याचा प्रयत्न केल्याची बाबही पुढे आली आहे.



नांदेड शहरातील गाडीपुरा भागात असलेल्या महंत बाळगीर महाराज मठात पौर्णिमेच्या दर्शनासाठी गेलेल्या एका महिलेची तिथे संत हरीगीर दत्तगीर गिरी महाराज याच्यासोबत ओळख झाली. सदर महिला दर गुरुवारी मठामध्ये दर्शनासाठी जात होती. त्यावेळी भोंदूने महिलेशी सलगी वाढविली. तिचा मोबाईल क्रमांक घेतला आणि मोबाईलवर संभाषण सुरू केले. महिलेच्या वाढदिवसानिमित्त तिच्या घरी जाऊन तिच्याशी जबरदस्ती केली. यावेळी त्याने मी संन्यास सोडून तुझ्याशी लग्न करण्यास तयार असल्याचे सांगितले. त्यानंतर लग्नाचे आमिष दाखवत महिलेवर भोंदू महाराजाने अत्याचार केला. पुढे लग्न करण्यास त्याने टाळाटाळ केली. त्यावेळी महिलेने लग्नासाठी वारंवार तगादा लावला. त्यामुळे महाराजाच्या नातेवाईकांनी तसेच मठातील लोकांनी सदर महिलेला धमक्या दिल्या. या महाराजाचे इतर अनेक मुली आणि महिलांबरोबर संबंध असल्याचेही तक्रारीत म्हटले आहे. लग्नाचे आमिष दाखवून त्याने तीन ते चार वेळा

अत्याचार केला. पुढे आपण संन्याशी असून लग्न करू शकत नाही, असे म्हणून भोंदू महाराजाने लग्नास नकार दिला. या तक्रारीवरून भाग्यनगर पोलिसांनी भोंदू हरीगीर दत्तगीर गिरी याच्याविरुद्ध गुन्हा दाखल करून त्याला अटक केली आहे. या प्रकरणाचा तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक अनुसया केंद्रे यांच्याकडे सोपविण्यात आला आहे. या भोंदुबाबाला आज न्यायलयात हजर केले असता न्यायालयाने एक दिवसाच पोलीस कोठडी सुनावली आहे.

# वकिलांना ३ महिने काळ्या कोटापासून मिळणार सुट्टी

**तभा वृत्तसेवा**

**पुणे, दि. २२ मार्च :** वाढत्या उष्णतेमुळे वकिलांना मोठा दिलासा देणारा निर्णय घेण्यात आला आहे. उन्हाळ्याच्या काळात पारंपरिक काळा कोट घालण्यापासून वकिलांना तात्पुरती सूट देण्यात आली आहे.

१५ मार्च ते १५ जून या कालावधीत ही सवलत लागू राहणार असून या दरम्यान वकिलांना न्यायालयात काम करताना काळा कोट परिधान करणे बंधनकारक राहणार नाही. उन्हाळ्यात तापमानात मोठी वाढ होत असल्याने काळ्या रंगाच्या कोटामुळे उष्णता अधिक जाणवते. त्यामुळे वकिलांना दीर्घकाळ न्यायालयात काम करताना त्रास सहन करावा लागतो. विशेषतः ज्या न्यायालयांमध्ये पुरेशा थंडाव्याच्या सुविधा उपलब्ध नाहीत, त्या ठिकाणी परिस्थिती अधिक कठीण होते.

ग्रामीण भागातील अनेक न्यायालयांमध्ये पंखे, कुलर किंवा एअर कंडिशनिंगची सुविधा मर्यादित असल्याने वकिलांना उकाड्यात काम करणे आव्हानात्मक ठरते. या पार्श्र्वभूमीवर ही सवलत उपयुक्त ठरणार असल्याचे मानले जात आहे.

काळा कोट हा वकिलांच्या ओळखीचा महत्त्वाचा भाग मानला जातो. तरीही आरोग्य आणि कामाच्या सोयीसाठी दरवर्षी उन्हाळ्यात अशी तात्पुरती सवलत दिली जाते.

या निर्णयामुळे वकिलांना काम करताना अधिक आरामदायी वातावरण मिळेल, तसेच उष्णतेमुळे होणारा त्रास काही प्रमाणात कमी होण्याची आहे.

# अमेरिकेच्या हल्ल्यांमुळे झालेल्या नुकसानीबद्दल इराणने केली यूएईकडून भरपाईची मागणी

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** अमेरिका-इस्रायल आणि इराण यांच्यात सुरू असलेल्या युद्धामुळे मध्यपूर्वेतील देशांसमोर मोठ्या अडचणी उभ्या राहिल्या आहेत. दरम्यान, शेजारी देशांबरोबर राजनैतिक तणाव वाढवत इराणने आता संयुक्त अरब अमिराती (यूएई) कडून अमेरिकन हल्ल्यांमुळे झालेल्या नुकसानीची भरपाई मागितली आहे. इराणने संयुक्त राष्ट्र संघ यांच्या महासचिवांना पत्र लिहून अमेरिकन हल्ल्यांमुळे झालेल्या नुकसानीसाठी यूएईकडून नुकसानभरपाईची मागणी केली आहे.

या पत्रात इराणचे संयुक्त राष्ट्रांतील राजदूत अमीर सईद इरवानी यांनी आरोप केला आहे की, अमेरिकेने इराणवर केलेल्या हल्ल्यांदरम्यान अमेरिकन सैन्याने संयुक्त अरब अमिरातीची जमीन वापरली. त्यामुळे अमेरिकेकडून झालेल्या हल्ल्यांमुळे इराणचे जे नुकसान झाले, त्याची भरपाई करण्याची जबाबदारी यूएईवर येते, असा दावा त्यांनी केला आहे.इराणचे संयुक्त राष्ट्रांतील राजदूत अमीर सईद इरवानी यांनी महासचिवांना दिलेल्या पत्रात नमूद केले आहे की, आंतरराष्ट्रीय कायद्यानुसार इराणला झालेल्या सर्व भौतिक आणि नैतिक नुकसानीची भरपाई देणे संबंधित देशांचे दायित्व आहे.

# भारताने पुन्हा एकदा गाठला एक अब्ज टन कोळसा उत्पादनाचा टप्पा

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** भारताने २० मार्च २०२६ रोजी सलग दुसऱ्या वर्षी १ अब्ज टन कोळसा उत्पादन घेण्याचा ऐतिहासिक टप्पा यशस्वीपणे गाठला. या यशामुळे ऊर्जा क्षेत्रातील भारताची वाढती आत्मनिर्भरता आणि प्रमुख उद्योगांकरता निरंतर इंधन पुरवठा सुनिश्र्चित करण्याची देशाची वचनबद्धता अधोरेखित झाली आहे. कोळसा क्षेत्रातील सातत्यपूर्ण आणि समन्वित प्रयत्न तसेच सर्व भागधारकांच्या योगदानामुळे भारताला हे यश मिळवता आले आहे.



कोळसा उत्पादनाच्या या विस्तारलेल्या आणि शाश्र्वत स्तरामुळे देशाला ऊर्जेची वाढती मागणी परिणामकारकतेने पूर्ण करणे शक्य झाले आहे. यासोबतच कोळशावर आधारित औष्णिक वीज प्रकल्पांमध्ये कोळशाचा विक्रमी साठा राखण्याच्या दृष्टीने वीज निर्मिती क्षेत्राला पाठबळ देणेही शक्य झाले आहे. या यशातून भारताने कोळसा मूल्य साखळीअंतर्गत साध्य केलेले काटेकोर नियोजन, कार्यक्षम अंमलबजावणी आणि बळकट समन्वयाची प्रचिती आली आहे. यासोबतच देशाच्या आर्थिक विकासाच्या वाटचालीतही या यशाने मोलाचे योगदान दिले आहे.

एक स्थिर, पारदर्शक आणि कामगिरीवर आधारित परिसंस्था विकसित करण्याची वचनबद्धता पार पाडण्याच्या दिशेने कोळसा मंत्रालयाची ठोस वाटचाल सुरू आहे. सक्रिय धोरणात्मक उपाययोजना, कामगिरीसंबंधी कठोर देखरेख आणि भागधारकांसोबतचा दृढ संवाद अशा उपाययोजनांच्या माध्यमातून मंत्रालय सर्व क्षेत्रांसाठी कोळशाची विश्र्वासार्ह उपलब्धता राहील आणि सुरळीत कामकाज होत राहील, याची खातरजमा करत आहे.

विकसित भारत २०४७ चा राष्ट्रीय संकल्प प्रत्यक्षात साकार करण्याच्या दिशेनेच हे प्रयत्न केले जात आहेत. या प्रयत्नांमधून एक लवचिक ऊर्जा आराखडा तयार करण्याचा, देशांतर्गत उत्पादन क्षमता वाढवण्याचा आणि शाश्र्वत आर्थिक विकासाला गती देण्याचा सरकारचा निर्धार अधिक दृढपणे व्यक्त झाला आहे.

# मुंबई ते अहमदाबाद बुलेट ट्रेन प्रकल्पाविषयी महत्वाची अपडेट

**तभा वृत्तसेवा**

**मुंबई, दि. २२ मार्च :** मुंबई-अहमदाबाद बुलेट ट्रेन प्रकल्पाच्या कामाला आता गती मिळण्याची चिन्हे दिसत आहेत. या प्रकल्पातील मुंबईतील महत्त्वाच्या भुयारी टप्प्यासाठी आवश्यक तयारी पूर्णत्वाकडे जात असून लवकरच खोदकाम सुरू होणार आहे.

या कामासाठी लागणारी अत्याधुनिक टनेल बोरिंग मशीन लवकरच मुंबईत दाखल होणार असून त्यानंतर भूमिगत बोगद्याचे काम सुरू होईल. आतापर्यंत काही तांत्रिक आणि प्रशासकीय कारणांमुळे या टप्प्याला विलंब झाला होता, मात्र आता पुढील काही महिन्यांत प्रत्यक्ष काम सुरू होईल, असे संकेत मिळत आहेत.

वांद्रे-कुर्ला संकुल ते शिळफाटा या दरम्यान सुमारे २० किमीपेक्षा अधिक अंतर भुयारी मार्गाने पार केले जाणार आहे. या मार्गातील सुमारे ७ किमीचा भाग ठाणे खाडीखालून जाणार असून हा प्रकल्पातील सर्वात आव्हानात्मक टप्पा मानला जात आहे. या बोगद्यांची खोली काही ठिकाणी २५ ते ६५ मीटरपर्यंत असणार आहे.

# राज्यातील हॉटेल, उपहारगृहांना २० टक्के गॅस पुरवठा होणार; व्यावसायिकांना मोठा दिलासा

**तभा वृत्तसेवा**

**मुंबई, दि. २२ मार्च :** राज्यातील हॉटेल, ढाबे, उपहारगृहे तसेच औद्योगिक कॅन्टीन, अन्न प्रक्रिया आणि दुग्धव्यवसाय क्षेत्रासाठी दिलासादायक निर्णय घेण्यात आला आहे. केंद्र शासनाच्या निर्देशानुसार व्यापारी एलपीजी चा अतिरिक्त २० टक्के पुरवठा करण्यात येणार असल्याची माहिती राज्याचे अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री छगन भुजबळ यांनी दिली.



केंद्र सरकारच्या पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू मंत्रालय यांनी २१ मार्च २०२६ रोजी जारी केलेल्या सूचनांनुसार, यापूर्वी राज्याला ३० टक्के एलपीजी वाटप मंजूर होते. आता २३ मार्च २०२६ पासून पुढील आदेश येईपर्यंत अतिरिक्त २० टक्के वाटप वाढविण्यात आले आहे. त्यामुळे राज्यातील एकूण गॅस पुरवठा हा पूर्वीच्या संकटपूर्व पातळीच्या सुमारे ५० टक्क्यांपर्यंत पोहोचणार आहे. या वाढीव २० टक्के वाटपात हॉटेल, ढाबे, उपहारगृहे, औद्योगिक कॅन्टीन, अन्न प्रक्रिया उद्योग आणि दुग्धव्यवसाय यांना प्राधान्य देण्यात येणार आहे. यासोबतच राज्य शासन किंवा स्थानिक स्वराज्य संस्थांकडून चालविण्यात येणाऱ्या अनुदानित कॅन्टीन, कम्युनिटी किचन्स तसेच स्थलांतरित मजुरांसाठी राबविण्यात येणाऱ्या योजनांनाही या निर्णयाचा लाभ मिळणार आहे.

मंत्री छगन भुजबळ यांनी स्पष्ट केले की, या निर्णयामुळे व्यापारी एलपीजीच्या तुटवड्यामुळे अडचणीत आलेल्या हॉटेल व खाद्य व्यवसायिकांना मोठा दिलासा मिळेल. मात्र, गॅस पुरवठा मिळवण्यासाठी संबंधित व्यावसायिकांनी तेल विपणन कंपन्यांकडे नोंदणी करणे तसेच पीएनजी जोडणीसाठी अर्ज करणे आवश्यक राहणार आहे.

दरम्यान, राज्यातील केरोसिन वितरणाबाबतही महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले आहेत. प्रलंबित परवाने आपोआप नूतनीकरण झाल्याचे मानण्यात येणार असून, त्यासाठी कोणतेही शुल्क आकारले जाणार नाही. तसेच वारसांच्या नावे परवाने तात्काळ वर्ग करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. ज्या गावांमध्ये किरकोळ केरोसिन परवानाधारक उपलब्ध नाहीत, त्या ठिकाणी रास्तभाव दुकान चालविणाऱ्या दुकानदारांना किरकोळ केरोसिन परवानाधारक म्हणून मान्यता देऊन परवाना देण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. २० मार्च २०२६ रोजी जारी करण्यात आलेल्या शासनपत्रान्वये या संदर्भातील कार्यवाही करण्यासाठी सर्व जिल्हाधिकाऱ्यांना सूचना देण्यात आल्या आहेत. या सर्व निर्णयांमुळे राज्यातील इंधन पुरवठा व्यवस्थेला काही प्रमाणात गती मिळण्याची अपेक्षा असून, विशेषतः खाद्यव्यवसाय आणि लघुउद्योगांना याचा मोठा फायदा होणार असल्याचे मानले जात आहे.



तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# थोडक्यात...

## स्ट्रोकविषयी जागरूक रहा - प्रत्येक मिनिट महत्वाचा आहे - डॉ. अमित भट्टी

**छत्रपती संभाजीनगर :** स्ट्रोक हा जगभरात अपंगत्व आणि मृत्यूचे एक प्रमुख कारण आहे. पण वेळेवर ओळख झाल्यास अनेक प्रकरणे टाळता येऊ शकतात किंवा योग्य उपचार करता येतात. जेव्हा मेंदूच्या एखाद्या भागाला जाणारा रक्तपुरवठा थांबतो किंवा कमी होतो, तेव्हा स्ट्रोक होतो. त्यामुळे मेंदूला आवश्यक ऑक्सिजन आणि पोषक घटक मिळत नाहीत. काही मिनिटांतच मेंदूतील पेशी मरायला लागतात, त्यामुळे तात्काळ वैद्यकीय उपचार घेणे खूप गरजेचे आहे. डॉ. अमित भट्टी सांगतात की, स्ट्रोक ही एक वैद्यकीय आपत्कालीन स्थिती आहे, जिथे प्रत्येक मिनिट खूप महत्त्वाचा असतो. स्ट्रोक झाल्यावर, जर मेंदूकडे जाणारा रक्तपुरवठा लगेच पुन्हा सुरू झाला नाही, तर प्रत्येक मिनिटाला सुमारे २० लाख मेंदूतील पेशी नष्ट होऊ शकतात. त्यामुळे लक्षणे लवकर ओळखून तात्काळ उपचार घेतल्यास कायमस्वरूपी अपंगत्वाचा धोका मोठ्या प्रमाणात कमी करता येतो.

## पेन उपकरणामध्ये सेमाग्लुटाइड इंजेक्शन प्रस्तुत

**मुंबई :** झायडस लाइफसायन्सेस लिमिटेड (तिच्या उपकंपन्यांसह, यापुढे झायडस म्हणून संदर्भित), या नाविन्यपूर्ण जागतिक जीवनविज्ञान कंपनीने, भारतातील पेटंटची मुदत संपल्यानंतर सेमाग्लिन टीएम, मशेमा टीएम आणि ऑल्टरमी टीएम या ब्रँड नावाखाली सेमाग्लुटाइड इंजेक्शन बाजारात आणले आहे. भारताच्या औषध महानियंत्रकांनी (डीसीजीआय) यापूर्वीच टाईप २ मधुमेह आणि लठ्ठपणा या दोन्ही आजारांच्या उपचारांसाठी सेमाग्लुटाइड इंजेक्शनचे उत्पादन आणि विपणन करण्यास मान्यता दिली होती.

## साऊथ मुंबई ते चाळ

**छत्रपती संभाजीनगर :** सोनी सबवरील लोकप्रिय शो पुष्पा इम्पॉसिबल आपल्या हृदयस्पर्शी कथाकथनाने आणि प्रेक्षकांना जवळच्या वाटणाऱ्या व्यक्तिरेखांनी सतत प्रेक्षकांची मनं जिंकत आहे. कथेतला ताजा ट्विस्ट म्हणजे शनायाची (मुस्कान बामने साकारलेली भूमिका) एन्ट्री. साऊथ मुंबईतून आलेली ही आत्मविश्र्वासी, बेधडक तरुणी, तिच्या विशेषाधिकारांनी भरलेल्या दृष्टिकोनासह जेव्हा पुष्पाच्या चाळजीवनाशी भिडते, तेव्हा नवीन समीकरणं आणि रोचक क्षण निर्माण होतात. तिच्या आगमनामुळे पुष्पा (करुणा पांडे) चा प्रवास आणखी गहिरा होतो.

## जागृत झाले भगवान महादेव

सोनी सब घेऊन आला आहे भक्ती, कुटुंब आणि दिव्य ज्ञानाच्या अमर कथा गाथा शिव परिवार की - गणेश कार्तिकेय मधून. शिव परिवाराच्या गाढ बंधनाचा उत्सव साजरा करत, शो सुंदरपणे भगवान गणेश (निर्णय समाधिया) आणि भगवान कार्तिकेय (सुभान खान) यांच्या कमी परिचित कथांना उलगडतो. भगवान शिव (अविनेश रेखी) आणि देवी पार्वती (श्रेनु पारिख) यांचे प्रिय पुत्र असलेल्या या देवतांच्या दिव्य प्रवास आजही पिढ्यांना प्रेरणा देतात. शोमध्ये आध्यात्मिक गहराई आणि कुटुंबातील भावनिक क्षणांचा सुंदर संगम दाखवला आहे, जो नातेसंबंध आणि मूल्यांना अधोरेखित करतो.

## शनायाची 'घर जेल'मधून सुटण्यासाठीची आर्त योजना

सोनी सबवरील पुष्पा इम्पॉसिबल ही मालिका पुष्पा (करुणा पांडे) हिची प्रेरणादायी कहाणी सांगते. पुष्पा ही एक मजबूत आणि स्वतःच्या मेहनतीने उभी राहिलेली स्त्री आहे, जी आयुष्यातील कठीण प्रसंगांवर मात करत पुढे जाते. गृहिणीपासून वकील होण्यापर्यंतचा प्रवास करताना, वैयक्तिक दुःखांचा सामना करूनही पुष्पा खंबीरपणे उभी राहते. न्याय मिळवण्यासाठी ती नेहमीच ठाम राहते आणि आपल्या मूल्यांना धरून ठेवते, जरी मार्ग सोपा नसला तरी.

## नौदलातील आजी- माजी सैनिकांचा दि.२४ रोजी मेळावा

**छत्रपती संभाजीनगर :** भारतीय नौदलातील आजी-माजी सैनिक व त्यांचे अवलंबित यांचा मेळावा मंगळवार दि.२४ रोजी सकाळी ११ वा. आयोजीत करण्यात आला आहे. हा मेळावा नियोजन सभागृह, जिल्हाधिकारी कार्यालय, छत्रपती संभाजीनगर येथे होणार आहे. यामेळाव्यात नौदल मुख्यालय, मुंबई येथून अधिकारी- कर्मचारी उपस्थित राहणार असून आजी व माजी सैनिकांच्या विविध अडचणी, पेन्शन, जन्म तारीख बदल, नावात बदल इ. येणाऱ्या अडचणीसंदर्भात मार्गदर्शन केले जाणार आहे. तरी नौदलात कार्यरत वा सेवानिवृत्त माजी सैनिकांनी व त्यांच्या अवलंबितांनी आपल्या अर्जासह, आवश्यक कागदपत्रांच्या दोन प्रतिंसह उपस्थित रहावे,असे आवाहन जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी, छत्रपती संभाजीनगर यांनी केले आहे.

## महाराजस्व अभियानात सर्व विभागाने पुढाकार घ्यावा- संजय केनेकर

**छत्रपती संभाजीनगर :** सर्वसामान्य नागरिकांना,शेतकऱ्यांना शासनाच्या विविध योजनांचा लाभ मिळावा ,यासाठी छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिराअंतर्गत सर्व विभागाने विविध योजनांचा लाभ देण्यासाठी पुढाकार घ्यावा असे आवाहन विधान परिषद सदस्य तथा महाराजस्व शिबिराचे राज्यस्तरिय समिती सदस्य संजय केनेकर यांनी केले. जिल्हाधिकारी कार्यालयात छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिराच्या अंमलबजावणीचा आढावा घेण्यात आला. जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी जिल्ह्यात शिबिराची अंमलबजावणी आणि नियोजन याबाबतचे माहिती सादर केली.

सामान्य प्रशासन विभागाच्या उपजिल्हाधिकारी संगीता राठोड, उपविभागीय अधिकारी व्यंकट राठोड,उपजिल्हाधिकारी एकनाथ बंगाळे,कन्नड उपविभागीय अधिकारी संतोष गोरड, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी प्रकाश देशमुख, यांच्यासह सर्व उपविभागीय अधिकारी व सर्व तहसीलदार या बैठकीस दूरदृष्यप्रणालीद्वारे उपस्थित होते. महाराजस्व समाधान शिबीर अंतर्गत सातबारा वितरण, सेतू सुविधा केंद्र मार्फत विविध दाखले आणि प्रमाणपत्र, डिजिटल सातबारा,पानंद रस्ते, कृषी विभागांतर्गत शेती अवजारांचे वाटप, आरोग्य विभागाच्या अंतर्गत आयुष्मान भारत योजनेचे कार्ड, एसटी बसेसचा लाभ घेणाऱ्यां ज्येष्ठ नागरिकांसाठी स्मार्ट कार्ड, इतर विभागांच्या अंतर्गत देण्यात येणाऱ्या विविध शासकीय योजनासाठी आवश्यक असणारे प्रमाणपत्र या समाधान शिबीर अंतर्गत वितरित करण्यात येत यावे.

या समाधान शिबीर अंतर्गत ज्या ठिकाणी समाधान शिबिर आयोजित करण्यात येणार आहे.

# ब्ल्यू व्हॅली इंग्लिश स्कूल व ब्ल्यू माउंटेन प्री स्कूलचे ४० बालकलाकारांनी जिंकली उपस्थितांची मने

तभा वृत्तसेवा

**बिडकीन, दि. २२ मार्च :** पैठण तालुक्यातील बिडकीन येथे दि. २१ मार्च रोजी सरस्वती भुवन विद्यालय, बिडकीनच्या मैदानावर ब्ल्यू व्हॅली इंग्लिश स्कूल व ब्ल्यू माउंटेन प्री स्कूल प्रायोजित एक भव्य, आकर्षक व मनोरंजनात्मक बालनाट्य कार्यक्रम मोठ्या उत्साहात पार पडला. कार्यक्रमाच्या सुरुवातीलाच शाळेचे संस्थापक सतीश तोतला व मुख्याध्यापिका सविता तोतला यांच्या हस्ते पद्मश्री पुरस्कारप्राप्त अभिनेत्री नयना आपटे व प्रसिद्ध नाट्यकलाकार प्रविण कुमार भारदे यांचा सत्कार करण्यात आला. या विशेष उपक्रमामध्ये ब्ल्यू व्हॅली इंग्लिश स्कूल व ब्ल्यू माउंटेन प्री स्कूलमधील तब्बल ४० विद्यार्थ्यांनी सहभाग घेत, आपल्या उत्कृष्ट



अभिनयाने उपस्थितांची मने जिंकली. या कार्यक्रमाचे विशेष आकर्षण म्हणजे नयना आपटे व प्रविण कुमार भारदे यांची उपस्थिती. त्यांच्या सहवासात विद्यार्थ्यांनी रंगमंचावर नाट्य सादरीकरण केले, ज्यामुळे कार्यक्रमाला अधिकच उंची लाभली. या बालनाट्य उपक्रमात मला आई बाबा पाहिजे व कॉमेडी चेटकीण अशी दोन नाटके सादर करण्यात आली. दोन्ही नाटकांना प्रेक्षकांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. कार्यक्रम पाहण्यासाठी नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थिती लावली होती. प्रेक्षकांच्या भरभरून प्रतिसादाबद्दल प्रविण कुमार भारदे यांनी विशेष आभार व्यक्त केले. त्यांनी आपल्या मनोगतात सांगितले की, यापूर्वीही आम्ही बिडकीनमध्ये नाट्य सादरीकरण केले होते, त्यांनी असेही सांगितले की, त्या वेळी मिळालेल्या अत्यल्प प्रतिसादामुळे त्यांनी या शहरात पुन्हा न येण्याचा निर्णय घेतला होता. परंतु आज तब्बल १४ वर्षांच्या वनवासानंतर, सतीश तोतला यांच्या पुढाकारामुळे त्यांनी येथील विद्यार्थी कलाकारांसोबत हा कार्यक्रम सादर केला आणि यावेळी मिळालेला प्रतिसाद अतिशय उत्साहवर्धक आणि अभूतपूर्व आहे. हा संपूर्ण कार्यक्रम अत्यंत यशस्वी ठरला असून, विद्यार्थ्यांच्या कलागुणांना व्यासपीठ मिळवून देण्याचा हा उपक्रम निश्र्चितच प्रेरणादायी ठरला आहे. या कार्यक्रमाच्या शेवटी पालक व प्रेक्षक म्हणून उपस्थित असलेले डॉ. शिंदे यांनी आपले मनोगत व्यक्त करताना सांगितले की, असे उपक्रम मुलांच्या सर्वांगीण विकासासाठी अत्यंत उपयुक्त ठरतात. शाळेने घेतलेल्या पुढाकारामुळे हा कार्यक्रम सादर होऊ शकला, याबद्दल त्यांनी कौतुक व्यक्त केले. तसेच, पुढेही शाळेने अशाच प्रकारचे कार्यक्रम राबवावेत आणि अशा प्रत्येक उपक्रमासाठी आम्ही निश्र्चितच पाठिंबा देऊ, असेही त्यांनी नमूद केले. शाळेतर्फे राबविण्यात आलेल्या मॉम अँड मी या उपक्रमामध्ये सहभागी झालेल्या माता व मुलांना पारितोषिके प्रदान करण्यात आली.तसेच, शाळेत दरवर्षी २८ फेब्रुवारी रोजी साजरा केला जाणारा सायन्स एक्झिबिशन यावर्षीही उत्साहात पार पडला. विद्यार्थ्यांनी आपल्या विविध वैज्ञानिक प्रयोगांचे सादरीकरण केले होते.या स्पर्धेत विजयी ठरलेल्या विद्यार्थ्यांना नयना आपटे यांच्या हस्ते बक्षीस वितरण करण्यात आले.

# पैठणला अस्मानी संकटासह विश्वाशांतीची प्रार्थना



तभा वृत्तसेवा

**पैठण, दि. २२ मार्च :** रमजान ईद उल फित्र निमित्य नाथसागराच्या पायथ्याशी पैठणच्या ईदगाह मैदानावर मौलाना शहेजाद खतीब, शहरेकाझी फजलुल्लाह, काझी कलीमुल्ला यांच्या प्रमुख उपस्थितीत हजारो मुस्लिम बांधवांनी आखाती देशात सुरु असलेले युद्ध तसेच देशात व राज्यात आलेल्या अस्मानी संकटातून सर्वांना सावर म्हणत विश्र्वशांती साठी सामूहिक प्रार्थना केली. यावेळी नगर परिषदेच्या वतीने बांधवांचे स्वागत करण्यात आले. ईदगांह मैदानावर यंदा सुरेख शामीयाण्याची उभारणी करण्यात आली होती.

यावेळी माजी आमदार संजय वाघचौरे, भाजपानेते दत्ता गोर्डे, नगरप्रमुख भूषण कावसणकर, उप नगराध्यक्ष तुषार पाटील, गटनेता हस्नोद्दीन कट्यारे,माजी नगराध्यक्ष राजूभाऊ गायकवाड, जीतसिंग करकोटक, अप्पा गायकवाड नामदेव खराद, नगरसेवक रफिक कादरी, महेश मुंदडा,वीर करकोटक, गौरव आठवले, स्वप्नील साळवे, इम्रान पठाण, मुफीद पठाण,अस्लम पठाण, ईनाम अन्सारी, फाजल टेकडी,पाशाभाई धांडे,पत्रकार मंगलसिंग भवरे, व्यापारी महासंघाचे पवन लोहिया, शहराध्यक्ष स्वदेश पांडे, उमेश तट्टू, शहराध्यक्ष सोमनाथ निकाळजे, गणेश पवार, महेश पवार,सज्जू गाझी, तोफीक धांडे, नदीम सौदागर, जुनेद शेख ,गब्बर पठाण, अनिस बागवान, ऋषीं अय्यर, राजू शेख, शाहिद पठाण सह हजारोंच्या संख्येने समाज बांधव उपस्थित होते.

## महीला बचत गटांना एक कोटी कर्जाचे वितरण

तभा वृत्तसेवा

**छत्रपती संभाजीनगर, दि. २२ मार्च :** महिला आर्थिक विकास महामंडळ, जिल्हा कार्यालय छत्रपती संभाजीनगर यांच्या वतीने पैठण येथे महिला बचत गटांनी उत्पादित केलेल्या वस्तूंचे चार दिवसीय जिल्हास्तरीय भव्य प्रदर्शन व विक्री महोत्सवाचे उद्घाटन आ. विलास भुमरे यांच्या हस्ते करण्यात आले. या प्रसंगी आ. भुमरे यांच्या हस्ते पैठण तालुक्यातील महिला बचत गटांना ५० लाख रुपये तसेच जिल्ह्यातील इतर दतालुक्यांतील बचत गटांना ५० लाख रुपये असे एकूण १ कोटी रुपयांचे कर्ज वितरण करण्यात आले.

कार्यक्रमात बचत गटातील महिलांना विविध सामाजिक उपक्रमांमध्ये सहकार्य करणाऱ्या २२ पुरुषांचा पुरुष सन्मान सुधारक पुरस्काराने गौरव करण्यात आला. यावेळी आ.भुमरे यांनी पैठण येथील बचत गटांसाठी लोकसंचालित साधन केंद्राकरिता हॉल, कार्यालय व प्रशिक्षण सुविधा उपलब्ध करून देण्याचे आश्वासन दिले.

तसेच महिला आर्थिक विकास महामंडळाच्या गटांना खेळते भांडवल उपलब्ध करून देण्यासाठी जिल्हा नियोजन समितीमार्फत सहकार्य करण्याचेही त्यांनी सांगितले. शिवाजी नागरी सहकारी बँकेचे अध्यक्ष रवींद्र काळे,माजी नगराध्यक्ष भूषण कावसनकर, उपनगराध्यक्ष तुषार पाटील, पंचायत समिती सभापती वैशाली विनोद बोंबले, उपसभापती संजय लगाने, जिल्हा परिषद सदस्य पांडुरंग औटे, नगरसेवक जितू परदेशी, प्रशांत जगदाळे, ज्योती काकडे, मनोज गायके, जिल्हा कृषी अधिकारी देशमुख, जिल्हा अग्रणी बँक व्यवस्थापक प्रेषित मोघे, नाबार्डचे महाव्यवस्थापक सुरेश पटवेकर, सामाजिक कार्यकर्त्या ज्योती पठाडे आदींची उपस्थिती होती.


जिल्हास्तरीय प्रदर्शन व विक्री मेळाव्यास पैठण तालुका व जिल्ह्यातील सुमारे ७५० महिला उपस्थित होत्या.

# एमजीएमच्या प्रीती बनकर यांना पीएच. डी. प्रदान

तभा वृत्तसेवा

**छत्रपती संभाजीनगर, दि. २२ मार्च :** महात्मा गांधी मिशन विद्यापीठाच्या इन्स्टिट्यूट ऑफ इंडियन अँड फॉरेन लँग्वेजेसच्या मराठी विभागातील संशोधक प्रीती योसेफ बनकर यांना पीएच.डी. प्रदान करण्यात आली आहे. त्यांनी मराठी विभागातील प्रा.डॉ.राम गायकवाड यांच्या मार्गदर्शनात 'स.ना. सूर्यवंशी यांच्या समग्र साहित्याचा विविधांगी अभ्यास' या विषयावर आपला शोधप्रबंध सादर केला होता.

विशेष म्हणजे प्रीती बनकर या एमजीएम विद्यापीठातील मराठी विभागाच्या पीएच.डी. पूर्ण करणाऱ्या पहिल्या संशोधिका आहेत, तसेच त्यांनी लिहिलेल्या 'प्रेमाचे दोन कोयंडे' आणि 'कन्यादान' या दोन्ही कादंबऱ्यांचा प्रकाशन सोहळाही एमजीएम विद्यापीठाच्या मराठी विभागाच्या वतीने आयोजित करण्यात



आला होता.

या यशाबद्दल प्रीती बनकर यांचे विद्यापीठाचे कुलपती अंकुशराव कदम, कुलगुरू प्रा.डॉ.विलास सपकाळ, कुलसचिव डॉ.आशिष गाडेकर, परीक्षा नियंत्रक डॉ. हरिरंग शिंदे, सामाजिकशास्त्रे व मानव्यविद्या शाखेच्या अधिष्ठाता डॉ. रेखा शेळके, उपकुलसचिव डॉ.परमिंदर कौर, इन्स्टिट्यूट ऑफ इंडियन अँड फॉरेन लँग्वेजेसचे संचालक प्रो.के. पी.सिंग, डॉ.राम गायकवाड, डॉ.मारुती गायकवाड आदींनी अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत.

## जोहान खान वयाच्या दहाव्या वर्षी ३० दिवसाचे उपास पूर्ण केले

तभा वृत्तसेवा

**छत्रपती संभाजीनगर, दि. २२ मार्च :** इंदिरा नगर येथील रहिवासी शौकतुल्लाह खान सर यांचा दहा वर्षीय मुलगा जोहान खान याने आपल्या आयुष्यातील ३० दिवसाची उपास पूर्ण केली अत्यंत उत्साहात पूर्ण केले आहेत. या लहान वयातील त्याच्या या धार्मिक कार्याचे आणि जिद्दीचे सर्वत्र कौतुक होत आहे.त्याच्या या ध्येयावर त्याचे आई-वडील आजी आजोबा आणि सर्व नातेवाईकांनी आनंद व्यक्त करत आहे त्याला भरभरून आशीर्वाद व शुभेच्छा दिले जात आहे



# सेवानिवृत्त शिक्षक संघटनेच्या अध्यक्षपदी वसंत ताकटे तर कार्याध्यक्ष पदी बजरंग काळे

तभा वृत्तसेवा

**पैठण, दि. २२ मार्च :** जिल्हा परिषद प्रशाला पैठण येथे सेवानिवृत्त संघटनेचे जिल्हाध्यक्ष तात्याराव चव्हाण, राज्य संघटक सुभाष शिंदे, विभागीय अध्यक्ष गणेश राठोड, जिल्हा पदाधिकारी कडुबाळ फासाटे, सी.एम. रमणे, प्रकाश लोखंडे, सुर्यकांत बढे, घुगे यांच्या प्रमुख उपस्थितीत पैठण तालुका कार्यकारिणीची निवड प्रक्रिया नुकतीच पार पडली. यामध्ये पैठण तालुका सेवानिवृत्त संघटनेच्या अध्यक्षपदी वसंत ताकटे, कार्याध्यक्ष पदी बजरंग काळे, सचिव विठ्ठल सावंत, सहसचिव ज्ञानदेव शिरवत, उपाध्यक्ष शिवाजी महालकर आणि पंढरीनाथ मोगल, कोषाध्यक्ष मुक्तार शेख, सहकार्याध्यक्ष



उमेश सोनवणे, संघटक पदी मिलिंद रोडे, सुभाष दुधे यांची सर्वानुमते निवड करण्यात आली. यावेळी मुख्याध्यापक अंकुश गाढे, समशेर पठाण, फैय्याज शेख आदी उपस्थित होते.नवनिर्वाचित पदाधिकारी यांचा यावेळी सत्कार करण्यात आला.

# सोयगाव तालुक्यातील सावळदबारा येथे शॉर्टसर्किटमुळे गहू, मका जळून खाक

## शेतकऱ्यांनचे तीन लाखाच्या वर नुकसान, नुकसानभरपाई देण्याची मागणी

तभा वृत्तसेवा

**सोयगाव, दि. २२ मार्च :** तालुक्यातील सावळदबारा येथील शेतकरी दिनकर मोरे याची गट क्र १०८ मध्ये दोन एकर गहू तर दोन एकर मका पिक सुगणीवर आले होते.मात्र शेतामधुन महावितरण चे पोल असल्याने पोलवरील कंन्टक्टर (तार)हे खाली असुन एका जवळ एक असल्याने वारा येऊन स्पर्श झाला असल्याने चिणगी पडुन शेतातील दोन एकर गहू व मका पुर्णपणे जळून खाक झाली असुन शेतकरी दिनकर मोरे यांचे जवळपास तीन लाख रुपयांचे नुकसान झाले आहे, शेतकरी दिनकर मोरे यानी यापुर्वी महावितरण विभागाचे कर्मचारी यांच्या कडे वाकलेल्या पोल



तसेच खाली आलेल्या तारा बाबत माहिती दिली होती मात्र महावितरण विभागाच्या अधिकाऱ्यांनी कानाडोळा केल्यामुळे आज ही परिस्थिती उदभवरी आहे.शनिवारी दुपारी साधारण दोन च्या दरम्यान वारावादण सुरू झाले होते शेतातील लोबकळले तार एकामेकाला स्पर्श घेत चिणगी पडुन सर्वदूर आग ही आग झाली होती आगीमध्ये गहू,मका ठिबक पुर्णपणे जळून खाक झाली असुन तात्काळ पंचनामा करून नुकसान भरपाई देण्यात यावी अशी मागणी शेतकरी करीत आहे.

माझी शेती सावळदबारा येथील गट क्र.१०८ मध्ये चार एकर जमीन आहे त्यामध्ये मी गहू व मका लागवड केली होती तसेच शेतामध्ये ठिबक ही होती शेतामधील महावितरण विभागाचे पोल वाकला होता तसेच तार ही खाली आले होते याबाबत मी महावितरण विभागाच्या अधिकाऱ्यांना ही सुचना केली होती मात्र त्यांनी याकडे लक्ष दिले नसल्याने माझे सुगणीवर आलेले मका व गहू व ठिबक पुर्णपणे जळून खाक झाले असुन तात्काळ पंचनामा करून नुकसान भरपाई द्यावी.

शेतकरी - दिनकर मोरे,सावळदबारा ता. सोयगाव

धाराशिव
# दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


## गुढीपाडवा व रमजान ईदनिमित्त मोफत आरोग्य शिबिर

**तभा वृत्तसेवा**
**लोहारा, दि.२२ मार्च -**

शहरात गुढीपाडवा आणि रमजान ईद सणाच्या पार्श्वभूमीवर प्रभाग क्रमांक ५ मध्ये साप्ताहिक विकासपर्वच्या वतीने सर्व रोग निदान, उपचार व मोफत औषध वाटप शिबिर उत्साहात पार पडले. या शिबिराचा २०० हून अधिक रुग्णांनी लाभ घेतला.



दि.२० रोजी आयोजित या शिबिरात नेत्र तपासणी, रक्तदाब, हिमोग्लोबिन, शुगर, त्वचा यासह विविध आजारांची तपासणी करण्यात आली. तसेच रुग्णांना मोफत औषधांचे वाटपही करण्यात आले. शिबिराचे उद्घाटन नायब तहसीलदार नाना मोरे यांच्या हस्ते झाले. यावेळी पोलीस निरीक्षक विजय पवार यांची प्रमुख उपस्थिती होती. प्रमुख पाहुणे म्हणून अधीक्षक मोटे, कृउबासचे सभापती प्रशांत काळे, आयुब शेख, वजीर अत्तार, काकासाहेब भंडारे व बालाजी माटे उपस्थित होते.

कार्यक्रमास महेबूब उर्फ मुन्ना फकीर, ताहेर फकीर, इक्बाल कुरेशी, लक्ष्मण रसाळ, नामदेव कुंभार, सुरेश थोरात, रमेश रेनके, सद्दाम मुलानी, आफताब कुरेशी यांच्यासह नागरिक उपस्थित होते.



### संक्षिप्त वृत्त...



### गुढीपाडव्याच्या निमित्ताने अनाथ मुलांना साखरेच्या हारांचे वाटप

**नळदुर्ग, दि.२२ मार्च -**

येथील नाभिक समाजाचे ज्येष्ठ कार्यकर्ते व व्यापारी राजेंद्र महाबोले यांनी गेल्या अनेक वर्षांप्रमाणे यंदाही गुढीपाडवा सणानिमित्त 'आपलं घर' प्रकल्पातील अनाथ मुलांना साखरेच्या हारांचे वाटप करून सणाचा आनंद द्विगुणित केला. कार्यक्रमाचे उद्घाटन राजेंद्र महाबोले यांच्या मातोश्री सरुबाई महाबोले यांच्या हस्ते झाले. तसेच नळदुर्ग नगरपालिकेच्या पाणीपुरवठा समितीचे सभापती तानाजी जाधव व नगरसेविका राणीताई शिवाजी सुरवसे यांच्या हस्ते मुलांना साखरेच्या हारांचे वाटप करण्यात आले. या प्रसंगी विकास सोसायटीचे सदस्य रघुनाथ नागणे, सेवानिवृत्त शिक्षक सुभाष महाबोले, सामाजिक कार्यकर्ते संजय विठ्ठल जाधव, दिशा नागरी पतसंस्थेचे व्यवस्थापक उमेश जाधव, तसेच ओंकार महाबोले, आकाश सुरवसे, लखन महाबोले, विशाल सुरवसे आदी उपस्थित होते.



### मंगरुळमध्ये रमजान ईद उत्साहात; सर्वधर्म समभावाचा आदर्श उपक्रम

**मंगरूळ, दि.२२ मार्च -**

ईद-उल-फित्र अर्थात रमजान ईद तुळजापूर तालुक्यातील मंगरुळ येथे मोठ्या उत्साहात आणि आनंदी वातावरणात साजरी करण्यात आली. या निमित्ताने हिंदू-मुस्लिम बांधवांनी एकमेकांना गळाभेट देत ईदच्या शुभेच्छा दिल्या, ज्यामुळे गावात हर्षोल्लासाचे वातावरण निर्माण झाले. गावातील बाजार चौकातील मारुती मंदिरात मुस्लिम युवकांच्या पुढाकारातून सामूहिक शिरखुमा व स्नेहभोजनाचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये शिरखुमा, डाळ, भात, गुलगुले, भजी आदी विविध पदार्थांचा समावेश होता. हजारो नागरिकांनी या भोजनाचा आस्वाद घेतला. गेल्या आठ वर्षांपासून सुरू असलेल्या या उपक्रमामुळे गावात सामाजिक एकोपा, बंधुभाव आणि सर्वधर्म समभाव अधिक दृढ होत असल्याचे चित्र दिसून आले. या सुंदर मनोमिलनामुळे मंगरुळ गावाने सामाजिक सलोख्याचा आदर्श घालून दिला आहे.

### राजेसाहेब चालुक्य पाटील यांचे निधन

**उमरगा, दि.२२ मार्च -**

संताजी चालुक्य पाटील यांचे वडील आदरणीय दत्तात्रय उर्फ राजेसाहेब चालुक्य पाटील (वय ९०) यांचे आज सकाळी निधन झाले. राजेसाहेब चालुक्य पाटील हे शांत, संयमी व समाजाभिमुख व्यक्तिमत्त्व म्हणून परिचित होते. त्यांच्या जाण्याने कुटुंबियांसह समाजातही मोठी पोकळी निर्माण झाली आहे. सामाजिक, राजकीय तसेच विविध क्षेत्रातील मान्यवरांनी त्यांच्या निधनाबद्दल दुःख व्यक्त करत भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली. त्यांचा अंत्यविधी आज दुपारी ४ वाजता मुळज येथे संपन्न झाला.



### तानाजी पारवे यांचे निधन

**तुळजापूर, दि.२२ मार्च -**

तालुक्यातील आरळी बुद्रुक गावचे मा.सरपंच तानाजी बापू पारवे (वय ८५) यांचे निधन शनिवार दि.२१ मार्च रोजी निधन झाले. त्यांच्यावर गावातील स्मशानभूमित रविवारी अंत्यसंस्कार करण्यात आले. त्याच्या पश्चात पत्नी, एक मुलगा, दोन मुली असा परिवार आहे. माजी सरपंच नयनाबाई पारवे यांचे ते पती होत. त्यांच्या अकाली निधनाने गावामध्ये शोककळा पसरली आहे.



## नळदुर्गची बाजारपेठ ओस; व्यापार उभारण्यासाठी सामूहिक प्रयत्नांची गरज





**विलास येडगे**
**नळदुर्ग, दि.२२ मार्च -**

नळदुर्ग शहरातील व्यापार आज पूर्णपणे कोलमडल्याचे चित्र असून बाजारपेठ दिवसेंदिवस ओस पडत चालली आहे. रविवारी भरणाऱ्या आठवडी बाजाराचीही अवस्था अत्यंत बिकट झाली आहे. एकेकाळी गजबजलेली बाजारपेठ आज सुनसान दिसत असल्याने नागरिकांमध्ये चिंता व्यक्त होत आहे.

राष्ट्रीय महामार्गावर वसलेल्या या ऐतिहासिक शहरात पूर्वी रात्री उशिरापर्यंत ग्राहकांची वर्दळ असायची. मात्र आता रात्री नऊ वाजताच बाजारपेठ बंद पडते. दिवसा देखील शास्त्री चौक ते किल्ला गेटपर्यंतची दुकाने ग्राहकाअभावी ओस पडलेली दिसतात. अनेक व्यापाऱ्यांना दुकान उघडून बसावे लागते, पण ग्राहक नसल्याने त्यांना दिवसभर निष्क्रिय बसावे लागते.

**व्यापाऱ्यांमध्ये चिंतेचे वातावरण**

शहरातील खालच्या भागातील सुमारे ७० टक्के दुकाने बंद पडल्याची स्थिती असून उरलेली दुकानेही अडचणीत आहेत. याउलट अणदुर आणि जळकोट येथील बाजारपेठ झपाट्याने विकसित होत असून ग्राहकांना सर्व वस्तू एकाच ठिकाणी उपलब्ध होत आहेत. त्यामुळे नळदुर्गमधील ग्राहकही या ठिकाणी खरेदीसाठी जात आहेत. तसेच नोकरदार वर्ग सोलापूर येथे जाऊन डी-मार्ड सारख्या मोठ्या मॉलमधून खरेदी करत असल्याने स्थानिक व्यापारावर परिणाम झाला आहे.

आठवडी बाजारातही भाजीपाला व भजी विक्रेत्यांखेरीज इतर व्यवसाय ठप्प आहेत. किल्ला गेट, पोस्ट ऑफिस, सरकारी दवाखाना व कुरेशी गल्ली परिसरात बाजार भरत असला तरी स्वच्छतेचा अभाव, पिण्याच्या पाण्याची व स्वच्छतागृहांची सुविधा नसल्याने व्यापाऱ्यांना, विशेषतः महिलांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे. नगरपालिकेने पुढाकार घेऊन बाजारपेठेचे पुनरुज्जीवन करण्यासाठी ठोस उपाययोजना करणे गरजेचे आहे. आठवडी बाजाराच्या ठिकाणी स्वच्छता, पाणी व स्वतंत्र स्वच्छतागृहांची सुविधा उपलब्ध करून देणे आवश्यक आहे. तसेच बंद पडलेला जनावरांचा बाजार पुन्हा सुरू करण्याचा विचार केल्यास व्यापाराला चालना मिळू शकते.

नळदुर्गचा व्यापार पुन्हा उभारी घेण्यासाठी नगरपालिका व व्यापाऱ्यांनी एकत्रित प्रयत्न करणे ही काळाची गरज असल्याची भावना नागरिकांमधून व्यक्त होत आहे.

## शेतातील २३० झाडांना आग; अडीच लाखांचे नुकसान

**तभा वृत्तसेवा**
**मुरूम, दि.२२ मार्च -**

शेतातील झाडांना आग लावून सुमारे २ लाख ५० हजार रुपयांचे नुकसान केल्याप्रकरणी तिघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपी श्रध्दानंद गुणवंत लामजणे, पुतळाबाई गुणवंत लामजणे व गजानन गुणवंत लामजणे (रा. सुपतगाव, ता. उमरगा) यांनी २१ मार्च २०२६ रोजी पहाटे ४.४५ वाजण्याच्या सुमारास ही घटना घडवली. फिर्यादी प्रताप संपणप्पा लामजने (वय ६०, रा. येणेगुर) यांच्या शेत गट क्रमांक १२५ मधील आंबा १२५, फणस २, चिकू २, लिंबू ६०, शेवगा २५, पपई १५ व मोसंबी १ अशी एकूण २३० झाडे जळून खाक झाली. यासोबतच मल्चिंग शीट, ठिबक पाईप लाईन व सीसीटीव्ही फुटेजही जळून नुकसान झाले.

या प्रकरणी फिर्यादीच्या तक्रारीवरून मुरुम पोलीस ठाण्यात गुन्हा नोंद करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे.

### बेलगाव येथे वाळू चोरीचा प्रकार; अज्ञाताविरुद्ध गुन्हा दाखल

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२२ मार्च -**

तालुक्यातील बेलगाव परिसरात अवैध वाळू उत्खनन व चोरीचा प्रकार उघडकीस आला असून अज्ञात व्यक्तीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, २६ जानेवारी २०२५ रोजी दुपारी १२.३० वाजण्यापूर्वी बेलगाव येथील शेत गट क्रमांक १०३ मध्ये साठवून ठेवलेली अंदाजे १५ ब्रास वाळू, किंमत सुमारे ९९,८४० रुपये, अज्ञात व्यक्तीने कोणतीही शासकीय परवानगी न घेता उत्खनन करून चोरी केल्याचे समोर आले आहे.

## राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) पक्षाची आढावा बैठक; संघटन मजबुतीवर भर



**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२२ मार्च -**

राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष यांच्या जिल्हा आढावा बैठकीत संघटन मजबूत करणे, कार्यकर्त्यांना संधी देणे आणि आगामी निवडणुकांची तयारी यावर विशेष भर देण्यात आला.

पक्ष निरीक्षक रवींद्र पाटील यांनी मार्गदर्शन करताना सांगितले की, प्रत्येक तालुक्यात जाऊन कार्यकर्त्यांशी थेट संवाद साधला जाणार असून संघटनात्मक बांधणी अधिक भक्कम करण्यावर भर दिला जाईल. पक्षातील विविध ३५ सेलच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणावर कार्यकर्त्यांना संधी दिली जाईल, असे त्यांनी स्पष्ट केले. धाराशिव जिल्हा हा शरद पवार यांच्या विचारांना मानणारा जिल्हा असल्याचे सांगत, त्या विचारसरणीशी जोडलेला वर्ग पुन्हा सक्रिय करण्यासाठी पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी जोमाने काम करावे, असे आवाहन करण्यात आले. रात्रंदिवस मेहनत घेऊन पक्षाला पुन्हा उभारी देणे ही काळाची गरज आहे, असेही त्यांनी नमूद केले.

बैठकीस जिल्हाध्यक्ष डॉ. प्रतापसिंह पाटील, जेष्ठ नेते जीवनराव गोरे, महिला जिल्हाध्यक्ष मनीषा पाटील, युवक जिल्हाध्यक्ष शेखर घोडके, डॉ. अविनाश तांबारे, शहराध्यक्ष आयाज शेख, कळंब तालुकाध्यक्ष प्रा. तुषार वाघमारे, उमरगा तालुकाध्यक्ष संजय पवार, परंडा तालुकाध्यक्ष किरण करळे, तुळजापूर तालुकाध्यक्ष धैर्यशील पाटील, पंचायत समिती सदस्या प्रिया अमोल घोगरे यांच्यासह अनेक पदाधिकारी उपस्थित होते. यावेळी विविध पदाधिकाऱ्यांच्या नियुक्त्या जाहीर करण्यात आल्या. भूम तालुकाध्यक्षपदी बालाजी गटकळ, जिल्हा चिटणीसपदी आर्यन शिंदे, युवक विभागाच्या जिल्हा सरचिटणीसपदी गणेश खराडे, कळंब तालुका युवक अध्यक्षपदी भीमा हगारे तसेच सामाजिक न्याय विभागाच्या कळंब तालुका कार्याध्यक्षपदी अशोक थोरात यांची निवड करण्यात आली.

जिल्हाध्यक्ष डॉ. प्रतापसिंह पाटील यांनी कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करताना लोकशाहीत पराभव आणि विजय नैसर्गिक असल्याचे सांगत नव्या उमेदीने कामाला लागण्याचे आवाहन केले. जेष्ठ नेते जीवनराव गोरे यांनी आघाडीच्या राजकारणामुळे पक्षाचे नुकसान होत असल्याचे नमूद करत स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका स्वतंत्रपणे लढवण्याची गरज व्यक्त केली.

कार्यक्रमाच्या प्रारंभी दिवंगत नेत्यांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. सूत्रसंचालन ॲड. अमोल पाटील यांनी केले, तर प्रास्ताविक प्रा. तुषार वाघमारे यांनी मांडले.

### उमरग्यात जुगारावर छापा; आरोपी ताब्यात

**तभा वृत्तसेवा**
**उमरगा, दि.२२ मार्च -**

जुगारविरोधी कारवाईदरम्यान उमरगा पोलिसांनी नारंगवाडी पाटी येथे छापा टाकत एका व्यक्तीवर कारवाई केली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, २१ मार्च रोजी उमरगा पोलीस ठाण्याच्या हद्दीत नारंगवाडी पाटी येथे अभिनव चायनीज सेंटरच्या मागील मोकळ्या जागेत छापा टाकण्यात आला. यावेळी आरोपी संजय धनराज पवार (वय ३९, रा. नारंगवाडी) याच्याकडे कल्याण मटका जुगाराचे साहित्य व १,१५० रुपयांची रोकड आढळून आली.

पोलिसांनी जुगार साहित्य व रक्कम जप्त करून आरोपीविरुद्ध गुन्हा नोंद केला असून पुढील तपास सुरू आहे.

## धाराशिव जिल्ह्यात २६ मार्चला श्रीराम नवमी निमित्त भव्य शोभायात्रा : दत्ताभाऊ कुलकर्णी

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२२ मार्च -**

भारतीय जनता पार्टी, धाराशिव जिल्ह्याच्या वतीने आमदार राणाजगजीतसिंह पाटील व माजी आमदार सुजितसिंह ठाकूर यांच्या नेतृत्वाखाली येत्या २६ मार्च रोजी राम नवमी निमित्त जिल्हाभर भव्य शोभायात्रा आयोजित करण्यात येणार आहे, अशी माहिती भाजपाचे जिल्हाध्यक्ष दत्ताभाऊ कुलकर्णी यांनी दिली.

या शोभायात्रेत सहभागी होण्यासाठी जिल्ह्यातील सर्व नागरिकांना आवाहन करण्यात आले आहे. तसेच विविध सामाजिक व धार्मिक संस्था, भजनी मंडळे, वारकरी संप्रदाय, डॉक्टर, वकील, शिक्षक, व्यापारी, उद्योजक, युवक मंडळे, महिला मंडळे, सेवाभावी संस्था, स्वयंसेवी संस्था व विविध आध्यात्मिक संघटनांनाही मोठ्या संख्येने सहभागी होण्याचे आवाहन करण्यात आले आहे.



सदर शोभायात्रा सकाळी १० वाजता संबंधित शहरांतील प्रमुख चौकातून प्रारंभ होऊन त्या भागातील प्रभू श्रीराम मंदिर किंवा प्रमुख मंदिरात विसर्जित होणार आहे.

जिल्ह्यातील नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी होऊन श्रीराम नवमी उत्सव भक्तिभावात व उत्साहात साजरा करावा, असे आवाहनही कुलकर्णी यांनी केले आहे.

## स्वामी समर्थ प्रकटदिन भक्तिभावात; ध्यानमंदिर उभारणीची घोषणा

**तभा वृत्तसेवा**
**अणदूर, दि.२२ मार्च -**

समर्थ नगरी प्रतिष्ठान, अक्कलकोट, नळदुर्ग, अणदूर परिवाराच्या वतीने नळदुर्ग येथे अक्कलकोट स्वामी समर्थ प्रकटदिन नामस्मरण व ध्यानसाधनेद्वारे मोठ्या भक्तिभावात साजरा करण्यात आला.



या वेळी झालेल्या कार्यक्रमात बोरी नदीच्या काठावर ध्यानमंदिर उभारण्यात येणार असल्याची घोषणा प्रतिष्ठानचे अध्यक्ष सैदप्पा इंगळे यांनी केली. नळदुर्ग येथील नदीकाठावरील जागा सीमा जोशी, गायत्री कुलकर्णी आणि मंजुषा जेवरीकर यांनी या प्रकल्पासाठी दिली असून, त्यास लागूनच प्रतिष्ठाननेही जागा खरेदी केली आहे. या जागेवर ध्यानमंदिर उभारण्यात येणार आहे. कार्यक्रमाला नळदुर्ग व अणदूर परिसरातील अनेक स्वामीभक्तांनी उपस्थिती लावली.

विशेषतः महिलांचा सहभाग लक्षणीय होता. यावेळी स्वामी समर्थांच्या प्रतिमा व वस्त्रांचे पूजन करण्यात आले. महिलांनी भजन, तारकमंत्र, ध्यान व नामजप करून प्रकटदिन साजरा केला.

राज्यभरात अक्कलकोट येथील श्रीवटवृक्ष स्वामी महाराज देवस्थानचे चेअरमन महेश इंगळे तसेच स्वामीभक्त चोळप्पा महाराजांचे वंशज वे. शा. सं. अण्णू महाराज यांच्या मार्गदर्शनाखाली स्वामीनाम प्रसाराचे कार्य सुरू आहे.

या कार्यक्रमाला गणेश पाठक, सुखदा ग्रामोपाध्ये, राहुल वटकर, कावेरी धरणे, संजय जेवरीकर, कल्याण कुलकर्णी, राहुल कुलकर्णी तसेच जागामालक शरद देशमुख आदी मान्यवर उपस्थित होते.

## महिला आयोगाच्या अध्यक्षपदासाठी वैशाली मोटे यांचे नाव चर्चेत?

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२२ मार्च -**

महाराष्ट्र राज्य महिला आयोगच्या अध्यक्षा रुपाली चाकणकर यांनी राजीनामा दिल्यानंतर नव्या अध्यक्षपदी कोणाची नियुक्ती होणार याकडे राज्याचे लक्ष लागले आहे. या पार्श्वभूमीवर वैशाली राहुल मोटे यांचे नाव आघाडीवर असल्याची चर्चा सुरू झाली आहे.

राज्यात महिला सुरक्षेचे वाढते प्रश्न, तक्रारींची संख्या आणि संवेदनशील प्रकरणे लक्षात घेता आयोगासाठी कणखर व तळागाळात काम करणाऱ्या नेतृत्वाची गरज व्यक्त होत आहे. या निकषांवर वैशाली मोटे योग्य पर्याय ठरू शकतात, असे मत राजकीय वर्तुळात व्यक्त होत आहे.



धाराशिव जिल्ह्यात विविध सामाजिक व संघटनात्मक उपक्रमांतून त्यांनी सातत्याने काम केले आहे. त्यामुळे त्या जिल्ह्यात परिचित व स्वीकारार्ह चेहरा बनल्या आहेत. शांत, संयमी व अभ्यासू स्वभावामुळे त्या विश्वासार्ह महिला नेतृत्व म्हणून ओळखल्या जातात. आक्रमक घोषणांपेक्षा प्रत्यक्ष कामावर भर देण्याची त्यांची कार्यपद्धती विशेष मानली जाते. भूम तालुक्यातील राष्ट्रवादी काँग्रेस कार्यकर्त्यांकडूनही त्यांच्या नावाला पाठिंबा मिळत असून, त्यांच्या नियुक्तीमुळे महिला आयोगाच्या कामकाजाला नवी दिशा मिळेल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे. आता राज्य सरकार अंतिम निर्णय कोणाच्या बाजूने घेते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

तळागाळातील सक्रिय काम, महिलांशी थेट संवाद आणि संघटनात्मक पकड यामुळे त्या राज्यस्तरीय जबाबदारीसाठी सक्षम पर्याय ठरू शकतात, असे राजकीय व सामाजिक क्षेत्रातून मत व्यक्त होत आहे.

**सुनेत्रा पवार यांच्या पार्श्वभूमीतून सक्षम नेतृत्वाची चर्चा...**

राज्यात महिला नेतृत्वाला चालना देण्याच्या दृष्टीने घडामोडी वेग घेत असताना सुनेत्रा अजित पवार यांच्या धाराशिव जिल्ह्यातील माहेरकडील पार्श्वभूमीतून सक्षम महिला नेतृत्व पुढे येण्याची शक्यता व्यक्त होत आहे. या पार्श्वभूमीवर वैशाली मोटे यांचे नाव विशेष चर्चेत आहे.

**'यशस्वीनी अभियान' मधील प्रभावी कामगिरी...**

वैशाली राहुल मोटे सध्या 'यशस्वीनी अभियान'च्या राज्य समन्वयक म्हणून जबाबदारी सांभाळत आहेत. या भूमिकेत त्यांनी राज्यभरातील महिला गट, कार्यकर्ते व स्थानिक नेतृत्व यांना एकत्रित करून अभियानाला व्यापक स्वरूप दिले आहे. त्यांच्या संघटन कौशल्यामुळे हे अभियान महिला सक्षमीकरणाचे प्रभावी माध्यम ठरत आहे.

## धाराशिवमध्ये संत ज्ञानेश्वर चरित्र कथेला प्रतिसाद

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२२ मार्च -**

सकल संत सेवा धाराशिवच्या वतीने बार्शी नाका येथील स्वयंवर मंगल कार्यालयात सुरू असलेल्या संत ज्ञानेश्वर महाराज यांच्या चरित्र कथेला भाविकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे.



दीपकजी महाराज खरात यांच्या सुमधुर वाणीतून संगीतमय कथेमुळे भक्तीरसाचे वातावरण निर्माण झाले. प्रारंभी ग्रंथपूजन व दीपप्रज्वलन करण्यात आले. कै. हभप श्यामराव दहिटणकर यांच्या आठवणींना उजाळा देत त्यांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.

कथेदरम्यान संतांचे विचार आचरणात आणण्याचे महत्त्व सांगत भाविकांना अध्यात्मिक मार्गदर्शन करण्यात आले. शेवटी आरती व पसायदानाने कार्यक्रमाची सांगता झाली. मोठ्या संख्येने भाविकांनी उपस्थित राहून महाप्रसादाचा लाभ घेतला.

## रोखठोक

दिनेश गुणे

# उन्मादाची उबळ!

आपल्या आनंदाचे क्षण अनुभवताना इतरांनाही त्यामध्ये सहभागी करून घेणे आणि आनंद वाटून घेणे ही माणुसकी असते. तो सहजीवनाचा आदर्श असा संस्कार असतो. कारण, वाटून घेतल्याने कमी होत नाही, अशी आनंद ही एकमेव गोष्ट आहे असे म्हणतात. अलिकडे मात्र असा, स्वतःसोबत इतरांनाही वाटेकरी करून घेता येईल असा भरभरून आनंद वाट्याला येणे धकाधकीच्या आणि असंख्य समस्यांमुळे तणावग्रस्त होत चाललेल्या जगण्यात तसे दुरापास्तच होऊ लागल्याने, आनंदाचे क्षण आपल्यापुरते ओरबाडण्याचीच मानसिकता बळावत चालल्याचे एक विचित्र चित्र आसपास गडद होत चाललेले दिसते. त्यातूनच, आनंदाच्या शोधाची तहानही वाढत चालली असून आनंद मिळविण्यासाठी वणवण भटकण्याची वेळ जगभरातील माणसांवर आली आहे. माणसाच्या कोणत्याही गरजांचे व्यापारीकरण होण्याच्या जमान्याने ही वेळ नेमकी ओळखल्याने या गरजेतूनच पर्यटन नावाचा जागतिक स्तरावरील एक व्यवसाय कमालीचा फोफावला आहे. पर्यटन करा आणि दररोजच्या जगण्यातून हरवत चाललेला आनंद अनुभवा हे या व्यवसायाचे ब्रीदवाक्य झाले असून पर्यटनातून आनंद शोधणाऱ्यांच्या झुंडी जागोजागी पाहावयास मिळत आहेत. जिथे जिथे हमखास आनंद अनुभवता येईल अशा प्रत्येक ठिकाणी या क्षेत्राने आपला ठसा उमटवला असून तशी एकही जागा या व्यवसायाने मोकळी ठेवलेली नाही. शहरे, गावे, ऐतिहासिक स्थळे, तीर्थक्षेत्रे, वने, जंगले अशी अनेक स्थळे पर्यटनस्थळे म्हणून नावारूपास आणून या स्थळांचे व्यापारीकरण करणाऱ्या या व्यवसायात ग्राहक म्हणून सहभागी झाल्यास आनंद मिळतो असे अनुभवास येऊ लागल्यानंतर, हा आनंद एकट्याने अनुभवण्याऐवजी समूहाने अनुभवण्याची टूम सुरू झाली. आता तर गरिबी न्याहाळण्याचाही पर्यटनव्यवसाय सुरू झाल्याची चर्चा ऐकावयास मिळत असून शहरी गरिबी हादेखील पर्यटनाचा मुद्दा होऊ लागला आहे. अशा, चहुबाजूने बहरणाऱ्या पर्यटन व्यवसायाची सारी मदार आनंदसुखासाठी आसुसलेल्या समाजातील समूहांवरच अधिक असल्याने आता एखाद्या स्थळी एकट्यादुकट्याने पर्यटन करणारी व्यक्ती दिसली की त्याच्याविषयी कुतूहल वाटू लागते. त्यातूनच 'सोलो ट्रॅव्हल' किंवा 'एकला चलो रे' नावाचा पर्यटनाचा प्रकार सुरू झाला, पण त्याने या क्षेत्राच्या आर्थिक उन्नतीला फारसा हातभार लागत नसल्याने, सामूहिक पर्यटनाकडे समाजास आकृष्ट करण्याची स्पर्धा सुरू झाली. झुंडीने किंवा समूहाने पर्यटन करण्याच्या वाढत्या सवयीमुळे एक नवी समस्या मात्र निर्माण होऊ पाहत आहे. या समस्येचीच एक चुणूक अलिकडेच महाराष्ट्राच्या ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्पात पाहावयास मिळाली. झुंडीने पर्यटनास निघालेल्यांच्या समूहाने भर जंगलात एका वाघाच्या बछड्यालाच वेढा घालून त्याची वाट रोखली आणि जंगलाचा अनभिषिक्त राजा म्हणून ओळखल्या जाणाऱ्या या राजबिंड्या प्राण्यास शेपूट पाडून पळ काढावा लागला. ज्या जंगलात अशा प्राण्यांनी हक्काने निर्भयपणे वावरावे, तेथे माणसांच्या उन्मादी अतिरेकापुढे हार मानून या बछड्याने काढता पाय घेण्यासाठी अक्षरशः केविलवाणी धडपड केली आणि झुंडीच्या पर्यटनातून मिळालेल्या आसुरी आनंदाचे वाटेकरी होत जमावाने जल्लोष केला. गेल्या रविवारी संध्याकाळच्या वेळी या अभयारण्यातील छोटी मधू नावाच्या वाघिणीचा बछडा रस्ता ओलांडण्याचा प्रयत्न करत असताना रस्त्याच्या दुतर्फा उभ्या असलेल्या पर्यटकांच्या वाहनांतील गर्दी वाहनांतून रस्त्यावर उतरली आणि वाघासोबत सेल्फी घेण्याची चढाओढ सुरू झाली. ज्या नीरव जंगलात एरवी फक्त वन्यप्राण्यांच्या सांकेतिक संवादाचा आवाज घुमत असतो, तेथे पर्यटक नावाच्या मानवी झुंडींच्या कोलाहलाने हा वाघदेखील गुदमरून गेला. अखेर कसाबसा जीव मुठीत धरून त्याने रस्ता पार केल्यावर गर्दीने विकृत आनंदाचा उत्सव साजरा केला आणि हा आनंद एकमेकांत वाटून घेत गर्दी पुढच्या प्रवासास निघाली. शहरांतून जंगल पर्यटनासाठी आणि वन्यप्राण्यांना न्याहाळण्यासाठी, विशेषतः व्याघ्रदर्शनासाठी जंगलांतील मातीचे रस्ते पालथे घालणाऱ्या पर्यटक नावाच्या मनुष्यसमूहास असा समोर चालून आलेल्या व्याघ्रदर्शनामुळे आनंदाचा उन्माद अनावर झाला असावा. या घटनेनंतर वन्यजीवांच्या जीवनशैलीतील बदलाच्या शक्यता डोके वर काढतील आणि आसपासच्या परिसरातील नागरिकांच्या सुरक्षिततेचाही प्रश्न निर्माण होईल, अशी भीतीही व्यक्त केली जात आहे. तो वाघाचा बछडा होता आणि कदाचित त्याला आपल्या शक्तीचा आक्रमक वापर करता येतो याचा साक्षात्कार झाला नसावा, अन्यथा अशा उन्मादी अवस्थेतील जमावाला पांगविण्यासाठी त्याने जमावावर हल्ला केला असता, तर तेथे काय परिस्थिती उद्भवली असती याची कल्पना करणे फारसे अवघड नाही.



आता त्या गर्दीच्या अतिरेकी उन्मादाची चौकशी होईल, त्यांच्यावर कारवाईदेखील होईल, पण अशा तात्कालिक कारवाया सहजीवनाच्या संस्कृतीची शिकवण पुन्हा रुजविण्यासाठी पुरेशा ठरतील का, हादेखील प्रश्नच आहे. उन्मादी जमावांच्या मानसशास्त्राने समाजजीवनही अनेकदा असुरक्षित वाटू लागते. अशा काळात, अशा उन्मादाची उबळ मानवी वस्त्यांपलीकडच्या वन्यप्राण्यांना त्रासदायक ठरू लागली, तर त्याला आवर घालण्याचे आव्हान अधिक जटिल होऊ शकते. अभयारण्ये, राष्ट्रीय उद्याने आणि दाट जंगलांमध्ये होत असलेली पर्यटनाची वाढ ही आधुनिक काळातील एक महत्त्वाची सामाजिक, आर्थिक घडामोड मानली जाते. निसर्गाच्या सान्निध्यात काही क्षण घालवण्याची ओढ, वन्यजीवांचे प्रत्यक्ष दर्शन घेण्याची उत्सुकता आणि 'इको-टुरिझम'च्या नावाखाली वाढणारी पर्यटकांची संख्या या सगळ्यांमुळे जंगलांचे स्वरूप बदलत आहे. मात्र या पर्यटनाच्या लाटेतूनच झुंडीने फिरणाऱ्या माणसांचा उन्माद व त्यातून निर्माण होणाऱ्या निसर्गासोबतच्या विसंवादाची एक चिंताजनक प्रवृत्ती डोके वर काढत आहे. वस्तुतः, जंगलांमध्ये माणसांच्या वस्तीचे आणि जमावाच्या झुंडीचे नियम चालत नाहीत. तेथे निसर्गाच्या नियमांचे पालन करावयाचे असते. पण प्रत्यक्षात अनेक अभयारण्यात वाहनांच्या लांबलचक रांगा, प्राण्यांच्या दर्शनासाठी होणारी चढाओढ, मोठ्याने ओरडणे, सेल्फीसाठी धोकादायक जवळीक साधण्याचे प्रयत्न असेच सर्व दृश्य सामान्य होत चालले आहे. ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्प किंवा जिम कॉर्बेट राष्ट्रीय उद्यान यांसारख्या प्रसिद्ध अभयारण्यात अशा प्रकारच्या घटना वारंवार घडताना दिसतात.

अशा उन्मादी वर्तनामागे केवळ व्यक्तीची असंवेदनशीलता कारणीभूत नसते. त्यामागे एक विशिष्ट मानसशास्त्र कार्यरत असते. झुंडीमध्ये असताना व्यक्तीची वैयक्तिक जबाबदारीची जाणीव कमी होते. सगळेच करत आहेत, मग आपणही तसेच करावे, हा विचार सहजपणे मनात घर करतो आणि एकटे असताना एखादी व्यक्ती जे वर्तन कधीच करणार नाही, तेच वर्तन तो समूहात सहज करतो. जंगलात हेच वर्तन अधिक धोकादायक ठरते, कारण ते केवळ माणसांसाठी नव्हे, तर वन्यजीवांसाठीही त्रासदायक असते. कारण, जंगल हे त्यांचे हक्काचे व सुरक्षित निवासस्थान असते. पर्यटनाच्या नावाखाली मानवी झुंडींचा वाढता गजबजाट मात्र त्यांच्या नैसर्गिक जीवनशैलीत व्यत्यय आणतो. मानवी कोलाहलामुळे प्राणी घाबरतात, त्यांच्या हालचालींचे मार्ग बदलतात, पाणवठ्यांपासून दूर राहू लागतात. काही वेळा तर प्राण्यांना माणसांच्या उपस्थितीपासून बचाव करण्यासाठी पळ काढावा लागतो. असा पळ काढण्याची वेळ जेव्हा त्यांच्यावर येते, तेव्हा त्या अनुभवाचा त्यांच्या जगण्याच्या प्रक्रियेवरच परिणाम होत असतो. अशा अनुभवाची भीती घर करून राहिली, की वन्यप्राण्यांच्या शिकारीच्या वेळा बदलतात, विश्रांतीच्या नेहमीच्या जागा सोडून अन्यत्र सुरक्षित जागांसाठी भरकटणे सुरू होते किंवा पिल्लांच्या सुरक्षिततेच्या भयाने त्यांची स्वभावशैलीच बदलू शकते.

अशा घटना वारंवार घडताना दिसू लागल्याने, मानवी संस्कृतीच्या आणि सहजीवनाच्या संस्काराचा ऱ्हास होत आहे का, असा प्रश्न साहजिकच समोर येणार आहे. अर्थात, याचे उत्तर सरळ होकारार्थी किंवा नकारार्थीही देता येणार नाही. एकीकडे आपण तंत्रज्ञानाच्या प्रगतीचा, पर्यटनाच्या वाढीचा आणि आर्थिक संधींचा अभिमान बाळगतो; तर दुसरीकडे निसर्गाशी वागण्यातील असंवेदनशीलता वाढताना दिसते. सुमारे सहा वर्षांपूर्वी, डिसेंबर २०२० मध्ये असंवेदनशीलतेचे दर्शन घडविणारी अशीच एक घटना महाराष्ट्राच्या सांस्कृतिक राजधानीत, पुणे शहराच्या मध्यवस्तीत घडली. त्या दिवशी सकाळी कोथरूड परिसराच्या महात्मा सोसायटीमध्ये एका झाडाखाली एक गवा शांतपणे उभा होता. ही बातमी पसरताच जंगलातून भरकटत गावात आलेला हा प्राणी पाहण्यासाठी लोकांची गर्दी सुरू झाली. लोकांनी त्यांचे फोटो काढले, काहींनी व्हिडीओदेखील 'शूट' केले आणि ते सोशल मीडियावर झळकविण्याची चढाओढ सुरू होताच गावात गवा आल्याची बातमी आणखी वेगाने पसरली. गर्दी वाढली आणि गलबला सुरू होताच गोंधळलेला हा प्राणी बिथरून पळत सुटला. गोंगाट करणारी गर्दी मागे आणि तो भेदरलेला गवा पुढे, असा लपंडाव बराच वेळ सुरू होता. लोकांची हल्लडबाजी वाढली आणि गव्याला पकडण्याचे वन विभागाच्या कर्मचाऱ्यांचा प्रयत्न अपुरे ठरू लागले. जमावाने गव्याचा पाठलाग सुरू केला होता. भेदरलेला हा जीव सैरभैर होऊन पळत असताना त्याने एक उंच भिंतदेखील उडी मारून ओलांडली आणि दमछाक झाल्याने तो तिथेच बसला. पुन्हा त्याला पकडण्याचा प्रयत्न सुरू झाल्याने तो अधिकच बिथरला. संतापून त्याने शेजारच्या एका मोटारीस टक्कर मारली आणि त्यामुळे रक्तबंबाळ झालेला हा गवा पुन्हा सैरावैरा पळू लागला, अडथळ्यांना धडका देताना तो पुरता जखमी होऊन घायाळ झाला असतानाच त्याला पकडण्यात यश आले, पण उपचारांसाठी नेले जात असतानाच त्याचा अंत झाला. भीतीमुळे रक्तदाब वाढून त्याचा मृत्यू झाला असे त्यानंतर सांगण्यात येत होते. हादेखील उन्मादी गर्दीच्या अविवेकी आनंदाचाच बळी म्हणावा लागेल. सेल्फी आणि सोशल मीडियासाठी 'क्षण टिपण्याची' घाई, 'मी तिथे गेलो' हे दाखवण्याची स्पर्धा या प्रवृत्ती निसर्गाचा अनुभव घेण्यापेक्षा त्याचा उपभोग घेण्याकडे झुकतात आणि हीच प्रवृत्ती उन्मादाला खतपाणी घालते. कोथरूडमधील गर्दीच्या उन्मादाचा बळी ठरलेल्या या गव्याची प्रतिकृती उभारून काही संवेदनशील लोकांनी त्याची क्षमायाचना करणारे फलक पुण्याच्या काही भागांत लावले. जंगलातून भरकटत मानवी वस्तीत आल्याची मोठी शिक्षा त्या दिवशी, माणसांनी उभारलेल्या कॉंक्रीटच्या जंगलात हरवलेल्या त्या दुर्दैवी जीवाला भोगावी लागली.

अशा उन्मादातून मिळणारा आनंद कोणासाठी तरी जीवघेणा ठरू शकतो, हे कोथरूडमधील त्या घटनेनंतर सिद्ध झाले. 'आम्ही चुकलो, आम्ही तुझे अपराधी आहोत, आम्हाला क्षमा कर' असा पश्चात्ताप व्यक्त करणारे फलक त्यानंतर लागले, पण पश्चात्तापाची ही जाणीव होईपर्यंत एका जीवाचा बळी गेला होता. म्हणून, अशा घटना घडून गेल्यानंतर अपराधीपणाची भावना जागी होण्यापेक्षा, त्या क्षणी संवेदनशीलता जागी ठेवणे गरजेचे ठरते. काही वर्षांपूर्वी, केरळमध्ये एका गर्भवती हत्तीणीला स्फोटकांनी भरलेला अननस खावयास घालून ठार मारल्याची घटना देशभर खळबळ माजवून गेली होती. पोटातल्या पिल्लाचे पोषण व्हावे यासाठी अन्नाच्या शोधात जंगलातून मानवी वस्तीत शिरलेल्या या हत्तीणीला मिळालेला अननस खात असताना तोंडात झालेल्या स्फोटांच्या वेदना असह्य झाल्यामुळे ती सैरावैरा धावत सुटली आणि गावाबाहेर येऊन तिने तीन दिवस स्वतःस नदीच्या पात्रात बुडवून घेतले होते. या अमानुष मानसिकतेविरुद्ध तीव्र संताप व्यक्त झाला होता. पिके उद्ध्वस्त करणाऱ्या रानडुकरांना ठार मारण्यासाठी स्फोटके भरलेले अन्न खाऊ घालण्याचा प्रकार अनेक ठिकाणी पाहावयास मिळतो. त्यामुळे, काही प्राण्यांवर हेतुतः जीवघेणे प्रसंग लादले जातात, तर काही प्राणी केवळ उन्मादाच्या दबावामुळे जीव गमावतात. जमावाच्या मानसशास्त्रात संवेदनशीलतेला फारसे स्थान नसते. म्हणून, सामाजिक विवेकशक्ती जागी ठेवण्याचे संस्कार घडविण्याची गरज असते. त्यासाठी या परिस्थितीच्या दुसऱ्या बाजूला बळ देण्याची गरज आहे. पर्यावरण संवर्धनाबाबत जागरूकता वाढत आहे, 'जबाबदार पर्यटन' ही संकल्पना रुजत आहे, स्थानिक समुदायांच्या सहभागातून निसर्गसंवर्धनाचे प्रयत्न होत आहेत. अनेक पर्यटक नियम पाळतात, शांततेने जंगल अनुभवतात आणि निसर्गाशी एकात्म होण्याचा प्रयत्न करतात. त्यामुळे संपूर्ण समाजावर आणि सहजीवनाच्या संस्कृतीवर सरसकट ऱ्हासाचा शिक्का मारणे योग्य ठरणार नाही. परंतु ज्या प्रवृत्ती निसर्गाशी संघर्ष निर्माण करतात, त्यांना वेळीच आवर घालणे अत्यावश्यक आहे. जंगल हे 'मनोरंजनाचे उद्यान' नसून एक सजीव परिसंस्था आहे, ही जाणीव पर्यटकांच्या मनात रुजवावी लागेल. आपण जंगलात 'प्रेक्षक' म्हणून जाणार आहोत की 'अतिक्रामक' म्हणून जाणार हे ठरविले पाहिजे. कारण अशा असंस्कृतपणामुळे प्राणी केवळ माणसापासून पळ काढतील एवढेच नव्हे, तर माणूस निसर्गापासून दूर जात राहील. जंगली प्राण्यांना माणसांच्या झुंडीपासून बचाव करण्यासाठी पळ काढावा लागणे हे नैसर्गिक संतुलन बिघडल्याने लक्षण म्हणता येईल. निसर्गशास्त्राच्या दृष्टीने ही मानवी उपद्रवकारी प्रवृत्ती ठरते. ज्या जंगलात प्राण्यांनी आश्वस्तपणे आणि सुरक्षिततेच्या भावनेने जगायचे, त्याच जंगलात प्राणी माणसांना घाबरू लागले किंवा जंगलात जाणारी माणसे जंगली प्राण्यांनाच हुल्लडबाजी करून हुसकावण्याचे प्रयोग करत राहिली, तर या दोन्ही स्थिती संतुलनाच्या दृष्टीने धोकादायक ठरतात. माणसांना घाबरून जंगलातून प्राण्यांनी पळ काढावा हा त्यांचा स्वभाव नसतो. तसे होऊ लागले, तर ते माणसाच्या वर्तनाचे प्रतिबिंब ठरते. त्यामुळेच, आपल्या शक्तीचा वापर वर्चस्व प्रस्थापित करून अकारण हुकूमत गाजविण्याकरिता करावयाचा की सहअस्तित्वाच्या आश्वस्त जाणिवांचा विश्वास प्राण्यांमध्ये रुजविण्याकरिता करावयाचा या टप्प्यावर मानवी संस्कृतीची कसोटी उभी ठाकली आहे. ▮

dineshgune@gmail.com

## रविवारची पत्रे

### भटकंती

परवा संध्याकाळी मी व माझा मित्र मधू फिरावयास निघालो होतो. उन्हाळा सुरू झालेला पण पुण्यात संध्याकाळी हवा छान असते.

कानावर दुरून येत असलेले भजनाचे शब्द पडत होते , ''रघुपती राघव राजाराम...पतीत पावन सीताराम....'' नेहमीच ऐकिवात असलेले शब्द '' ईश्वर अल्ला तेरो नाम ..... '' पुढील शब्द मित्राने उच्चारले. मी त्याला मध्येच थांबविले व भजनाचे मूळ शब्द सांगितले ..''रघुपती राघव राजाराम, पतितपावन सीताराम, सुंदर माधव मेघश्याम, गंगा तुलसी शालिग्राम, भद्रगिरीश्वर सीताराम, भगत जनप्रिय सीताराम

जानकीरमणा सीताराम, जय जय राघव सीताराम.''

साहजिकच चर्चेला विषय मिळाला. अरे आपण सध्या जे विषय घेऊन समोर जात आहोत त्यातला स्वबोध आणिक काही वेगळे असेल काय? खरेतर आपल्याला शिक्षणातून जे मूळ विचार मिळावयाचे त्यापासून वंचित ठेवले गेले. आणि म्हणूनच आपल्या संस्कृतीपासून दुरावत चालल्याचे दिसते.

अगदी प्रथम आपल्या आहाराचेच घेऊया ना. जसा आहार तसा विचार हा तर सिद्धांतच आहे. चार ठाव आहार असावा म्हणजे काय तर अन्न चार प्रकारचे असावे. (१) भोक्ष्य : दाताने चाऊन खाण्यायोग्य, भाकरी, पोळी, पुरी, पापड इत्यादी. (२) भोज्य : विशेष चावण्याची आवश्यकता नसते. मऊ भात, खिचडी, शिरा, वरण, इ. (३) लेह्य : मध, चटणी, पंचामृत इ. (४) चोष्य : चोखून खावयाचे आंबा, शेवगा, इ. फास्ट फूडच्या व आजच्या वेगवान जमान्यात कसे जमणार पण अन्न ताजे असावे, गरम असावे याबाबत निश्चित विचार व्हावा.

आहारासंबंधात सात्त्विक, राजस व तामस असे देखील प्रकार सांगितले आहेत. केवळ तामस आहारापासून आपण दूर राहू शकणार नाही का?

स्वबोध हा विचार केवळ आहारापुरता मर्यादित नाही हे तर अधिक व्यापक आहे परंतु सूर्यनारायण आम्हा दोघासही घरी परत जाण्याचे संकेत देत आहे तेव्हा तूर्तास येथे थांबावे व पुढील टप्प्यात अन्य विषयांचा परामर्श घ्यावा.

**संजय विष्णू वेलणकर**/पुणे ८९२८६५०००५

### भारताचे आर्थिक वर्ष २२ मार्चपासूनच सुरू व्हावे

भारत स्वतंत्र झाल्यानंतर त्यावेळी अस्तित्वात असलेल्या विविध कालगणनांमधील दोष दूर करून संपूर्ण देशासाठी लागू होणारी व शास्त्रीय मानकांवर आधारित कालगणना निर्माण करण्यासाठी सरकारने नोव्हेंबर १९५१ मध्ये खगोलशास्त्रज्ञ डॉ. मेघनाथ साहा यांच्या अध्यक्षतेखाली दिनदर्शिका पुनर्रचना समिती स्थापन केली. त्या समितीने नोव्हेंबर १९५५ मध्ये आपला अहवाल सरकारला सादर केला. सरकारने तो मान्य केला. २२ मार्च १९५७ ला १ चैत्र शके १८७९ पासून ही राष्ट्रीय दिनदर्शिका अस्तित्वात आली. ज्याप्रमाणे आपला एक राष्ट्रध्वज, एक राष्ट्रगीत आणि इतर राष्ट्रीय मानचिन्हे आहेत, तेवढेच महत्त्व राष्ट्रीय दिनदर्शिकेला असून तिचे पालन हे आपले राष्ट्रीय कर्तव्य आहे.

आपले केंद्र सरकार मात्र आर्थिक वर्ष, कोणतेही महत्त्व नसलेल्या एका साध्या दिवसापासून अर्थात १ एप्रिलपासून सुरू करते. त्याऐवजी फक्त ९ दिवस आधीच्या, जागतिक महत्त्वाच्या खगोल शास्त्रीय दिन, २२ मार्चपासूनच आर्थिक वर्ष सुरू करून राष्ट्रीयता सिद्ध करावी. पूर्वी १ जानेवारी ते ३१ डिसेंबर हे वर्ष होते, ते जसे बदलले, तसेच पुन्हा बदलावे ही अपेक्षा आहे. ४ ऑक्टोबर १९५६ ला गृह मंत्रालयाने सर्व राज्य सरकारे, रिझर्व्ह बँक व सर्व विभाग यांना आदेश काढून या दिनदर्शिकेचा वापर आणि त्यातील तारखेनुसार काढलेले धनादेश यांचा आदर करण्याचे निर्देश दिले. प्रतिवर्षी २१ मार्च हा विषुवदिन अर्थात दिवस-रात्र समसमान असतात. दोन्ही गोलार्ध सूर्यापासून समान अंतरावर असतात. त्याच्या दुसऱ्या दिवसापासून म्हणजे २२ मार्च हा पहिला दिवस, चैत्र शुद्ध १, वसंत ऋतू सुरू.

२२ मार्च ते २० एप्रिल चैत्र महिना, सूर्य मेष राशीत व २१ एप्रिल ते २१ मे वैशाख महिना. सूर्य वृषभ राशीत असतो. या महिन्यांची वैदिक नावे, अनुक्रमे मधुमास, व माधव मास.

२३ सप्टेंबर ते २२ ऑक्टोबर, आश्विन मास, सूर्य तुळा राशीत. २३ ऑक्टोबर ते २१ नोव्हेंबर, कार्तिक मास, सूर्यरास वृश्चिक, शरद ऋतूचा काळ. वैदिक नावे : ईश मास, उर्ज मास.

२२ नोव्हेंबर ते २१ डिसेंबर, मार्गशीर्ष मास, सूर्य धनु राशीत, २२ डिसेंबर ते २० जानेवारी, सूर्य मकर राशीत, हेमंत ऋतूचा काळ, वैदिक नावे : सहमास, सहस्यमास.


२१ जानेवारी ते २० फेब्रुवारी, माघ मास, सूर्य रास कुंभ, शिशिर ऋतू सुरू. २० फेब्रुवारी ते २१ मार्च, फाल्गुन मास, सूर्य मीन राशीत, वैदिक नावे : तप मास, तपस्य मास.

याप्रमाणे दरवर्षी प्रत्येक महिना व प्रत्येक ऋतू त्याच तारखेला येतो. जर १३ ऑगस्ट १९५३ ही तुमची जन्मतारीख आहे तर राष्ट्रीय दिनदर्शिका हा दिवस २२ श्रावण १८७५ असा दाखवील. प्रत्येक वर्षी १३ ऑगस्ट ला राष्ट्रीय दिनांक २२ श्रावण हीच राहणार. सर्व ऋतू, महिने अगदी त्याच तारखेला येतात. लीप वर्ष २१ मार्चला सुरू होते आणि सर्व वैशिष्ट्ये कायम राहतात. आज इंग्रजी तारीख व ही दिनदर्शिका यांचे परावर्ती (चार्ट) तक्ते उपलब्ध आहेत. आपले आर्थिक वर्ष, नवीन हिंदू वर्ष, जैन वर्षारंभ हे सर्व २२ मार्चच्या आसपास फक्त १५ दिवसांच्या अंतरात फिरत असतात आणि हे प्रतिवर्षी होणार आहे. मग आजच्या खगोलीय महत्त्वाच्या पवित्र दिनी आपल्या देशाने मान्य केलेली शास्त्रीय आधारावरील राष्ट्रीय कालगणना स्वीकारणे ही काळाची गरज आहे.

**ॲड. अविनाश तेलंग**/९४२००७४१२५

### स्वतःच्या हृदयातला राम शोधू या

आपण सारे त्या परमपिता परमेश्वराची लेकरं आहोत. परमेश्वराचाचं अंश आपल्यात सामावलेला आहे, त्यामुळे साक्षात प्रभू श्रीराम आपली काळजी वाहत आहेत.



सूक्ष्मपणे विचार केल्यास, भगवान विष्णूचे दहा अवतार प्रत्येक मानवात सूक्ष्मरूपात विराजमान असल्याचे आढळून येतील. संपूर्ण आयुष्यात माणूस कधीतरी भगवान विष्णूच्या दहा अवतारांपैकी कोणत्या तरी एका अवतारासारखा कधीतरी वागलेलाच असेल. भूतकाळात जाऊन आठवून बघा तुम्हाला खात्री पटेल.

या दहा अवतारांपैकी नेमका कोणता अवतार आपण स्वतःत शोधायला हवा जेणेकरून मानवी जीवनाचे सार्थक होईल व देवाला सुद्धा आपण चांगला माणूस या भूतलावर पाठविल्याचे समाधान प्राप्त होईल, तसेच इतरांना सुद्धा आपल्या जगण्याचा फायदा होईल. माझ्या मते मर्यादा पुरुषोत्तम भगवान श्रीराम जर आपण स्वतःच्या हृदयात शोधला तर जीवनाचे सार्थक होईल व जगणं अधिक अर्थपूर्ण होईल. प्रयत्नांती जर का आपला राम आपल्याला गवसला तर आपलं संपूर्ण जीवन अंतर्बाह्य बदलून जाईल किंबहुना प्रत्यक्षात त्याची अनुभूती सुद्धा येईल. ज्या वेळेस आपला राम आपल्याला गवसेल त्यावेळेस आपलं वागणं, बोलणं, कर्माकडे बघण्याचा दृष्टिकोन व जगण्याची पद्धत बदललेली असेल.

सत्य वचन, धर्मरक्षण, धर्माचरण, मर्यादापालन, पितृ आज्ञापालन, बंधुभाव, परस्त्री मातेसमान, एक पत्नीव्रत, शांतता, संयम, करुणा, कृतज्ञता, त्याग, प्रेम, शौर्य आणि कर्तव्य पालण. हे मर्यादा पुरुषोत्तम भगवान श्री रामरायाच्या अंगी असलेले दैवी गुण, जीवन जगत असताना आपल्याकडून इतरांना अनुभवायला मिळाले तर समजून जावं की आपल्यातला राम आपण शोधला आणि इतरांच्या हृदयातील राम प्रकट करण्याचे सामर्थ्य आपल्या अंगी आहे.

आजच्या युगात राम कुठे आहे, हे शोधणे सहज शक्य आहे. त्याकरिता हृदयात करुणा आणि प्रेम हे भाव रोजच्या जगण्यात प्रकट व्हायला हवे.

वृद्ध माता-पित्यांसाठी श्रावण बाळ, मातृभूमीसाठी मातृभक्त, कर्तव्यासाठी कर्तव्यपालन, धर्मासाठी धर्माभिमान, हिंदू संस्कृतीसाठी संस्कृतिरक्षक आणि मानवतेसाठी एक संवेदनशील व नैतिक मूल्यांची जपणूक करणारा चांगला माणूस जेव्हा आपल्या हृदयात विराजमान होईल तेव्हाच आपला राम आपण शोधला असे म्हणता येईल. जगण्यात राम आणि धर्म असला की आपलं जगणं हे केवळ जिवंत राहणं न ठरता, तो एक आनंदी जीवनाचा सोहळा होईल.


**विजय शंकरराव इंगोले**/जुनी वस्ती बडनेरा

### आभासी जगात हरवलेलं बालपण

काळाचा प्रवाह अथांग असतो हे जरी सत्य असलं, तरी मन मात्र आजही गावाकडच्या त्या विस्तीर्ण माळरानावर आणि शेणानं सारवलेल्या अंगणात रेंगाळत राहतं. आजची पिढी लॅपटॉप आणि मोबाईलच्या निळ्या प्रकाशात हरवलेली असताना, आमच्या पिढीचा तो मुक्त संचार आठवला की, स्मृतींचं आकाश नकळत भरून येतं. आम्ही ती भाग्यवान पाखरं होतो, ज्यांच्या बालपणाला 'इंटरनेट'चं कुंपण नव्हतं. आमचं विश्व चार भिंतींच्या चौकटीत कोंडलेलं नव्हतं, तर ते रणरणत्या मातीत आणि मोकळ्या आभाळाखाली स्वच्छंद झुलत होतं. शाळेची सुट्टी म्हणजे आमच्यासाठी आनंदाचं लेणं असायचं. परीक्षेचा शेवटचा पेपर संपला की दप्तराचं ओझं खुंटीला टांगून आम्ही जो जोमानं सुटायचो, तो थेट सुट्टी संपल्यावरच स्थिरावत असू. ऊन-वारा, तहान-भूक कशाचंच भान नसायचं. रखरखत्या उन्हातही आमचा उत्साह सदैव उधाणलेला असायचा. सुट्टी म्हणजे एक मुक्त आकाश होतं, जिथं पंख पसरून मनसोक्त विहारायचो. लहानपण म्हणजे जणू आनंदाची एक सुंदर पहाट होती. सकाळच्या कोवळ्या उन्हात सुरू झालेला विटी-दांडूचा खेळ दुपारपर्यंत रंगायचा. एकावर एक रचलेली सात दगडांची लगोरी चेंडूनं फोडून ती पुन्हा रचण्यातला थरार शब्दांत पकडता येणार नाही. सायकलचं जुनं चाक काठीने पळवत गावभर हुंदडताना राजेशाही भास व्हायचा. लाकडी भोवऱ्याला सुतळीची पिळदार साथ देऊन जमिनीवर एखाद्या नर्तकासारखं फिरवताना मिळणारा आनंद गगनात मावेनासा व्हायचा. उन्हाचा तडाखा वाढला की पावलं वडाच्या शीतल छायेकडे वळायची. 'सूरपारंब्या' खेळताना आम्ही साक्षात वानरसेनाच व्हायचो. पारंब्यांना लटकून मारलेली ती धाडसी झेप आजच्या साहसी खेळांनाही फिकी पाडणारी होती. सावलीत बसून चिमुकल्या हातांनी मांडलेला भातुकलीचा संसार, रंगलेला पत्त्यांचा डाव आणि सागरगोट्यांचा मंजुळ नाद आजही कानात गुंजतो. उन्हाच्या झळा असह्य झाल्या की, विहिरीच्या संथ निळ्या पाण्यात मारलेली 'धपकन' उडी देहाबरोबरच मनालाही तृप्त करून जायची. रात्री चांदण्यांच्या साक्षीनं अंगणात रंगणाऱ्या भेंड्या आणि शब्दकोड्यांच्या खेळात ती रात्र कधी संपूच नये, असं वाटायचं. 'शिवणापाणी' आणि 'विषामृत' खेळताना मिळालेलं 'जीवदान' अन् 'जोडसाखळी'त एकमेकांचे हात घट्ट धरून धावताना विणलेली अतूट 'मैत्री' आजही हवीहवीशी वाटते. 'कच्चा लिंबू' म्हणून लहानग्यांना मायेनं सामावून घेण्याची ती निखळ वृत्ती आजच्या या स्पर्धेच्या युगात कुठंच दिसत नाही. या खेळांनी आम्हाला केवळ क्षणिक आनंद दिला नाही, तर शब्दांची, नात्यांची आणि अनुभवांची समृद्ध शिदोरी दिली. 'पगा-दुगा-तिगा' किंवा 'अबक-दुबक-तिबक' हे शब्द आजच्या पिढीला परक्या भाषेतील वाटतील; पण ती आमची सांकेतिक भाषा होती. या शब्दांच्या खेळातूनच आमची मैत्री अधिक घट्ट झाली आणि भाषेला खऱ्या अर्थानं मातीचा गंध लाभला. आजच्या या सिमेंटच्या जंगलात ती निरागस पाखरं कुठंतरी हरवून गेली आहेत. शहरातल्या गल्ल्यांमध्ये मुलांचा तो किलबिलाट आता ऐकू येत नाही. लगोरीचे दगड आता विखुरलेले दिसतात आणि विटी-दांडू कुठंतरी अडगळीत धूळ खात पडले आहेत. खिशातल्या गोट्यांची ती 'श्रीमंती' डिजिटल कॉईन्समध्ये बदलली आहे. पण त्या मातीशी जोडलेल्या नात्यात जो ओलावा होता, तो या आभासी जगात कुठंच दिसत नाही.

**मंगेश मुरलीधर दौंडकर**/पुणे, ९८९०६१९३५४

### चांदवडचे जागृत रेणुका माता मंदिर



नाशिक जिल्ह्यातील चांदवड गावात गडावर वसलेल्या रेणुका मातेची महती संपूर्ण महाराष्ट्र राज्यात पसरलेली आहे. मुंबई-आग्रा महामार्गावर चांदवड शहरात रेणुका मातेचे हे प्रसिद्ध स्वयंभू, जागृत व प्राचीन मंदिर आहे. हे मंदिर भाविकांचे श्रद्धास्थान म्हणून ओळखले जाते. महाराणी अहिल्याबाई होळकर यांनी या मंदिराचा जीर्णोद्धार केल्याचे सांगितले जाते. मंदिर परिसराच्या आत गेल्यावर समोरच्या प्रशस्त मोकळ्या जागेत उंचच उंच दोन भव्य दगडी दीपमाळा आपल्याला आकर्षित करतात. मंदिराचा परिसर खूपच प्रसन्न वाटतो. मंदिर परिसरातील वाहन तळाच्या बाजूने प्रवेश केल्यास पायऱ्या नसल्याने वृद्ध व्यक्ती सुद्धा पायी चालून सहजतेने मंदिरातील रेणुका मातेचे दर्शन घेऊ शकतात. पूर्वी चांदवड शहरात अहिल्याबाई होळकर यांच्याकडून रेणुका मातेच्या पूजा विधीचे सोपस्कार पार पाडले जात असत. त्यानंतर अनेक वर्ष होळकर घराणे हे काम पाहत होते. मात्र सद्यस्थितीत रेणुका माता मंदिराचे कामकाज ट्रस्टच्या माध्यमातून चालते. नवरात्रोत्सवाच्या काळात देवीला आभूषणांनी सजविले जाते. देवीचा मुखवटा सोन्याचा आहे. नवरात्रीत प्रत्येक दिवशी सकाळी एक पालखी रंगमहालातून निघते. त्या पालखीत देवीचा मुखवटा व दागदागिने असतात. ही पालखी डोंगरातील देवीच्या मंदिरात जाते. दिवसभर देवीचा सोन्याचा मुखवटा व दागदागिने मंदिरात देवीच्या अंगावर असतात. रात्री आठ वाजता ही पालखी पुन्हा रंगमहालात परत आणण्यात येते.

गेल्या अनेक वर्षांपासून या मंदिराची देखभाल करण्याचे काम ट्रस्टचे विश्वस्त मंडळ करीत आहे. या परिसरात भक्तनिवास, विश्रामगृह, प्रसाधनगृह तसेच वाहनतळ आहे. संपूर्ण मंदिर परिसरात सिमेंटचे रस्ते करण्यात आल्याने सगळीकडे स्वच्छता जाणवते. त्यामुळे या परिसराला एक वेगळेच सौंदर्य प्राप्त झाले आहे.

अशी आहे आख्यायिका : रेणुका माता ही महर्षी जमदग्नी ऋषींची पत्नी. परशुराम हे जमदग्नी ऋषी आणि रेणुका मातेचे पुत्र. रेणुका माता एकदा नेहमीप्रमाणे नदीवर पाणी आणायला गेली असता त्यांना घरी येण्यास उशीर झाला. रेणुका मातेच्या घरी उशिरा येण्याचे कारण लक्षात येताच जमदग्नी ऋषी अत्यंत रागावले. रागाच्या भरातच रेणुका मातेचे मस्तक धडावेगळे करण्याची आज्ञा त्यांनी पुत्र परशुरामाला दिली. वडिलांच्या तोंडून शब्द निघताच परशुरामाने आपल्या मातेचे मस्तक धडावेगळे केले. रेणुका मातेचे मस्तक तिथून जे उडाले ते चांदवडला सध्या जिथे देवीचे मंदिर आहे तिथे येऊन पडले आणि धड माहूर येथेच राहिले. तेव्हापासून माहूर आणि चांदवड येथे रेणुका मातेच्या मंदिरांची स्थापना झाली आहे.

नाशिक शहरापासून चांदवड हे गाव मुंबई-आग्रा महामार्गावर असून एकूण अंतर ६७ किलोमीटर आहे. जाण्यासाठी एसटी बससेवा, खाजगी वाहने उपलब्ध असून स्वतःच्या वाहनाने सलग प्रवास केल्यास मंदिरात पोहोचायला एक ते दीड तास लागतो. चांगल्या दर्जाचे चौपदरी रस्ते, पेट्रोल पंप, आजूबाजूचे निसर्गरम्य वातावरण, प्रत्येक पाच दहा किलोमीटर अंतरावर भरपूर हॉटेल्स आणि रेस्टॉरंट आहेत. उसाचा ताजा रस, गरम चहा, नाश्ता, भोजन स्वस्त दरात मिळत असल्याने प्रवास आर्थिकदृष्ट्या देखील परवडणारा, सुखावह आणि आनंददायी वाटतो.

**प्रमोद तिजारे**/८७६७१७७०८९

### पश्चिम आशियातील युद्ध, राजकारण आणि इतिहास

इराण, इस्रायल आणि अमेरिका यांच्यातील युद्धाचे मुख्य कारण भू-राजकीय वर्चस्व, मध्यपूर्वेतील प्रदेशावर ताबा मिळविण्याची स्पर्धा, भांडवलासाठी पाश्चिमात्यांचे डावपेच आणि अण्वस्त्र क्षमतेवरून निर्माण झालेला संघर्ष हे आहे. इराणने इस्रायली हितसंबंधांवर हल्ले करणे आणि अमेरिकन तळांना लक्ष्य करणे यामुळे हा संघर्ष अधिकच तीव्र झाला आहे. सध्याच्या युद्धाची प्रमुख कारणे लक्षात घेतली तर ती खालीलप्रमाणे असावीत तसेच अमेरिका युद्धांमधील सहभागाची प्रमुख कारणे...

भू-राजकीय वर्चस्व आणि प्रदेशावरील संघर्ष : इस्रायल आणि इराण यांच्यात मध्यपूर्वेतील देशांवर आपले वर्चस्व निर्माण करण्यासाठी दीर्घकाळापासून संघर्ष सुरू आहे.

आर्थिक हितसंबंध आणि तेल : इराणसारख्या देशांच्या तेलाच्या खाणींवर आणि कच्च्या तेलाच्या व्यापारावर नियंत्रण मिळविण्यासाठी किंवा तो विस्कळीत करण्यासाठी अमेरिका युद्धात सहभागी आहे; जेणेकरून अमेरिकेचा जागतिक बाजारावर प्रभाव कायम राहील. मध्यपूर्वेसारख्या महत्त्वाच्या भागात अमेरिका स्वतःचे लष्करी वर्चस्व राखण्यासाठी आणि इराणसारख्या प्रतिस्पर्ध्यांना कमकुवत करण्यासाठी युद्धात प्रामुख्याने भूमिका बजावत आहे.

अण्वस्त्र सज्जता : इस्रायलचा असा आरोप आहे की, इराण अण्वस्त्रे मिळविण्याचा प्रयत्न करत आहे, ज्यामुळे त्यांच्या अस्तित्वाला धोका निर्माण झाला आहे

लष्करी ताकद आणि शस्त्रविक्री : अमेरिकन शस्त्रास्त्रांचा वापर करणे आणि संरक्षण उद्योगाला चालना देणे, ज्यामध्ये दर आठवड्याला हजारो कोटींचा खर्च होत असतो. अमेरिकेचे मित्र राष्ट्र असलेल्या अरब देशांवर इराणने घेतलेल्या आक्रमक भूमिकेमुळे हा संघर्ष वाढला आहे, ज्यात अमेरिकन सैन्याच्या तळांनाही लक्ष्य केले जात आहे. इराणच्या धोरणांमुळे अमेरिका-इराण संघर्ष गुंतागुंतीचा झालेला आहे. इराणने इस्रायलवर गाझामध्ये नरसंहार केल्याचा आरोप केला आहे, या गाझा संघर्षामुळे दोन्ही देशांतील तणाव शिगेला पोहोचला आहे. पाश्चात्त्य देशाची धोरणे पूर्णपणे आदर्शवादी नव्हती. तर इराक, अफगाणिस्तान आणि व्हिएतनामसारख्या देशांमधील ऐतिहासिक संघर्षांप्रमाणे, आतंकवादविरोधी किंवा लोकशाही स्थापन करण्याच्या नावाखाली इतर देशांच्या अंतर्गत बाबींमध्ये अमेरिकेने धोरणात्मक हस्तक्षेप करणे.

अमेरिकन नागरिक आणि राजनयिकांचे संरक्षण करणे आणि सुरक्षा धोरणानुसार धोक्यांना परदेशातच रोखणे. तेल बाजारातील अस्थिरता, आर्थिक धोरण, निर्बंध यामुळे इराणची अर्थव्यवस्था अनुकूल नाही. तेल बाजारातील नियंत्रण हेच या युद्धामागील कारण आहे आणि या युद्धामुळे जागतिक महागाईचा दर झपाट्याने वाढू शकतो. ▮

**संजय श्रौती**/९८६०४५१८४०

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.
प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८४७२६८ RNI Reg.No 46878/87
stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# फाउंडेशनचा राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार युवराज हिरवे यांना जाहीर

तभा. वृत्तसेवा



**केज (प्रतिनिधी)** | तालुक्यातील कळंबआंबा येथील भूमिपुत्र ,मानेवाडी येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेचे प्र मुख्याध्यापक युवराज अभिमन्यू हिरवे यांच्या शैक्षणिक उल्लेखनीय कार्याची दखल घेऊन ध्येय एज्युकेशन फाउंडेशनचा राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार जाहीर झाला आहे. याबद्दल त्यांचे सर्वत्र अभिनंदन केले जात आहे.

शिक्षण क्षेत्रातील सातत्य पूर्ण कार्य, विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण प्रगतीसाठी कायम धडपड, विविध शैक्षणिक उपक्रमातील नाविन्यता, सामाजिक उपक्रमात सक्रिय योगदान शाळा परिसर व गाव परिसर ५०० च्या वर झाडे लावुन संगोपन केले. लोकसहभागातुन विद्यार्थ्यांना लॅपटॉप संगणक दिले.शाळा परिसर तंबाखूमुक्त केला व तालुक्यातील शाळा परिसर तंबाखुमुक्त करण्यासाठी तालुका समन्वयक म्हणुन कार्य केले. आडस केंद्र तंबाखुमुक्त केले. बालविवाह रोखण्यासाठी केंद्रसमन्वयक म्हणुन कार्य केले. पाणी फाऊडेशन वॉटरकप स्पर्धा हिरीरीने सहभाग, गावाला व्दितीय क्रमांकाचे बक्षीस मिळवुन दिले. करोना कालावधीमध्ये वेगवगेळ्या सेवाभावी संस्थेच्या माध्यामातुन गरजू व्यक्तीनां अन्नधान्य किट चे वाटप केले. अंधश्रद्धा निर्मूलन, स्वच्छता मोहीम विविध स्पर्धा यांचे आयोजन,अक्षर परिवार समूह कार्य, महापुरुषांच्या जयंती पुण्यतिथि व्याख्याने, कविसंमेलन, पोवाडे, साजरे करून सामाजिक सलोखा अबाधित ठेवण्यासाठी पुढाकार घेतला

# अचिव्हर्स' इंग्रजी मॅगझिन्सच्या कव्हर पेजवर ना.पंकजाताई मुंडे झळकल्या!

## 'इथिकल लिडरशीप' अशा शब्दांत राजकीय, सामाजिक प्रवासाचा मॅगझिनने केला गौरव

तभा. वृत्तसेवा

**मुंबई** | राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री तथा महाराष्ट्रातील धडाडीच्या नेत्या ना. पंकजाताई मुंडे यांची एक विशेष मुलाखत 'सोसायटी अचिव्हर्स' या मुंबईतून प्रकाशित होणा-या सुप्रसिद्ध इंग्रजी मॅग्झिनने घेतली असून कव्हर पेजवर त्यांना स्थान दिले आहे. 'देअर इज नो सबस्टिट्यूट फॉर इथिकल लीडरशीप' अशा शब्दांत त्यांच्या आतापर्यंतच्या राजकीय, सामाजिक प्रवासाचा मासिकाने गौरव केला आहे.

'सोसायटी अचिव्हर्स' मॅग्झिनची एक स्पेशल एडिशन या महिन्यात प्रसिद्ध झाली आहे. या इंग्रजी मासिकाचा देश विदेशात मोठा वाचक वर्ग आहे. ना. पंकजाताई मुंडे यांनी आपल्या धडाकेबाज कामातून राज्याच्या राजकारणात एक वेगळी ओळख निर्माण केली आहे शिवाय काम करण्याची त्यांची एक स्वतःची खास शैली आहे, अतिशय अभ्यासू व तळमळीने काम करणा-या नेत्या म्हणून त्या ओळखल्या जातात. पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री म्हणून काम करत असताना त्यांनी अनेक लोकाभिमुख निर्णय घेतले. एक लोकनेत्या म्हणून त्यांच्या राजकीय व सामाजिक कार्याचा आढावा या मुलाखतीत घेण्यात आला आहे. मॅग्झिनच्या संपादिका ॲन्ड्रेया कोस्टबीर यांनी त्यांची विशेष मुलाखत घेतली आहे. एकूणच त्यांच्या कार्य प्रवासाच्या टप्प्यातील विविध पैलू फोटोच्या माध्यमातूनही उलगडले आहेत. विविध क्षेत्रातील कर्तृत्ववान महिलांच्या देखील मुलाखती या मासिकात घेतल्या गेल्या आहेत.




यशस्वीतांच्या स्टोरीचा भाग झाल्याचा आनंद मॅगझिनच्या संपादिका ॲन्ड्रेया कोस्टबीर, अशोक धामणकर यांनी शनिवारी ना.पंकजाताई मुंडे यांची त्यांच्या रामटेक या शासकीय निवासस्थानी भेट घेऊन या स्पेशल एडिशनचे

# अंबाजोगाईचे सुपुत्र सर्वोच्च न्यायालयाचे माजी न्यायमुर्ती सुधाकर कुर्डूकर यांचे निधन

तभा. वृत्तसेवा

**अंबाजोगाई** | अंबाजोगाईचे सुपुत्र आणि भारताच्या सर्वोच्च न्यायालयाचे माजी न्यायाधीश सुधाकर पंडितराव कुर्डूकर यांचे शनिवारी २१ मार्च २०२६ रोजी मुंबई येथे वृद्धापकाळाने निधन झाले. वयाच्या ९१ व्या वर्षी त्यांनी अखेरचा श्वास घेतला. अंबाजोगाईच्या देशपांडे गल्लीतील मूळ रहिवासी असलेल्या न्यायमूर्ती कुर्डूकर यांनी आपल्या प्रदीर्घ कारकीर्दीत न्यायव्यवस्थेत मोलाचे योगदान दिले. त्यांनी मार्च १९९६ ते जानेवारी २००० या काळात सर्वोच्च न्यायालयात न्यायाधीश म्हणून काम पाहिले. त्यापूर्वी त्यांनी पंजाब आणि हरियाणा उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश आणि मुंबई उच्च न्यायालयात न्यायाधीश म्हणून जबाबदारी सांभाळली होती. विशेष म्हणजे १९९४ मध्ये त्यांनी पंजाबचे प्रभारी राज्यपाल म्हणूनही पद भूषवले होते. कायदेशीर क्षेत्रासोबतच त्यांनी योगेश्वरी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष म्हणून शैक्षणिक कार्यातही सहभाग नोंदवला. त्यांच्या पार्थिवावर मुंबईतील चंदनवाडी स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या निधनाने कायदेतज्ज्ञ आणि अंबाजोगाई परिसरात शोककळा पसरली आहे.



# जमावाकडून तरुणावर प्राणघातक हल्ला

## लोखंडी रॉडने मारहाण डोक्यावर 13 टाके,बरगड्या मोडल्या

तभा. वृत्तसेवा

**बीड (प्रतिनिधी)** | गेवराई शहरात किरकोळ कारणावरून एका तरुणावर १५ ते २० जणांच्या टोळक्याने प्राणघातक हल्ला केल्याची धक्कादायक घटना घडली आहे. या हल्ल्यात तरुण गंभीर जखमी झाला असून त्याची प्रकृती चिंताजनक आहे. या घटनेनंतरही आरोपींवर तात्काळ कारवाई न झाल्याने पोलिसांच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे.



मिळालेल्या माहितीनुसार, दिनांक २० मार्च रोजी सायंकाळी सुमारे सहा वाजण्याच्या सुमारास शेख अरबाज शेख जब्बार (रा. तय्यब गल्ली, गेवराई) हा तरुण उपास सोडण्यासाठी साहित्य खरेदी करण्यासाठी दुचाकीवरून कुटुंबासोबत घराबाहेर पडला होता. त्यावेळी त्याच्यासोबत त्याची पत्नी आणि एक वर्षाचा मुलगा देखील होता.

दरम्यान, गेवराईतील राजगल्ली परिसरात किरकोळ कारणावरून वाद निर्माण झाला आणि अचानक १५ ते २० जणांच्या टोळक्याने लोखंडी रॉड, लाथा-बुक्क्यांनी त्याच्यावर हल्ला चढवला. या बेदम मारहाणीत त्याच्या छातीला गंभीर दुखापत झाली असून बरगड्या मोडल्या आहेत. तसेच डोक्याला गंभीर मार लागून १३ टाके घालावे लागले आहेत.

जखमी अवस्थेत त्याला प्रथम गेवराई येथील रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र प्रकृती गंभीर असल्याने पुढील उपचारासाठी त्याला तात्काळ बीड जिल्हा रुग्णालयात हलवण्यात आले. डॉक्टरांनी त्याची प्रकृती चिंताजनक असल्याचे सांगितले आहे.

गेवराई शहरातील मुख्य भागातच गंभीर घटना घडूनही मुलींचा कडून हल्लेखोरांना कोणतीही कारवाई करण्यात आली नाही. यामुळे गेवराई पोलिसांच्या कार्यपद्धतीवर प्रश्न उपस्थित होत असून “पोलिसांचे भय संपले का?” असा सवाल नागरिकांमधून उपस्थित होत आहे.

या प्रकरणातील आरोपींना तात्काळ अटक करून कठोर कारवाई करावी, अशी मागणी जखमी तरुणाच्या कुटुंबीयांकडून करण्यात येत आहे.

# बंकटस्वामी महाराज गुणवंतांची खाण होते : महंत तुकाराम महाराज भारती

## किर्तन सोहळ्यास महाराष्ट्रातील गुणिजन मंडळींची उपस्थिती.

तभा. वृत्तसेवा

**बीड** | दि-२१ (प्रतिनिधी) | वारकरी संप्रदायात संत बंकटस्वामी महाराज यांचे संपादकीय कार्य मोठे आहे. स्वामी महाराज हे गुणवंताची खान होते. त्यांच्यामुळेच आज महाराष्ट्रात वारकरी संप्रदायाचे विस्तारलेले स्वरूप पाहायला मिळते असे प्रतिपादन श्री ह भ प महंत तुकाराम महाराज भारती यांनी केले. बीडच्या श्रीक्षेत्र नेकनूर येथे संत सुदाम देव महाराज यांच्या पुण्यतिथी उत्सवानिमित्त दुसऱ्या दिवसाचे कीर्तन पुष्पगुच्छ बोलत होते यावेळी प्रमुख उपस्थिती श्री ह भ प महंत लक्ष्मण महाराज मेंगडे, श्री ह भ प श्रीकृष्ण महाराज यादव, श्री ह भ प अच्युत महाराज घोडके, श्री ह भ प दिनेशानंद शास्त्री, बबन महाराज बहिरावळ, भास्कर महाराज शिंदे यांच्यासह हजारो भावीक भक्तांची उपस्थिती होती..



श्रीक्षेत्र नेकनुर येथे संत सुदाम देव महाराज यांच्या पुण्यतिथी उत्सव व राम जन्मोत्सवानिमित्त भव्य अखंड हरिनाम सप्ताह सुरू आहे यात दुसऱ्या दिवसाची कीर्तन पुष्प श्री ह भ प महंत तुकाराम महाराज भारती यांनी अर्पण केले यावेळी त्यांनी संत नामदेव महाराज यांच्या गाथेतील

ज्ञानदेव म्हणता माया ।
गेलि समूळ विलया । ।
संत महिमा वर्णू किती ।
निर्जीव चालवली भिंती । ।
जड मुळ उद्धरीले ।
रेड्यामुखी वेद बोलवीले । ।
म्हणे नामयाचा नारा ।
नमन माझे ज्ञानेश्वरा । ।

या अभंगावर सुंदर चिंतन मांडले.. 'ज्ञानदेव' या नावाचा उच्चार करताच मनातील सर्व 'माया' अज्ञान आणि सांसारिक मोह मुळासकट नष्ट होते.

संतांचा महिमा शब्दांत सांगणे कठीण आहे. जेव्हा गर्विष्ठ चांगदेवांनी वाघावर बसून दर्शन घ्यायला आले, तेव्हा माऊलींनी त्यांच्या अहंकाराचा नाश करण्यासाठी एका 'निर्जीव भिंतीला' सजीव करून चालवून दाखव

# जयभवानी साखर कारखान्यातील चोरीचा 6 तासांत छडा; जेसीबी ऑपरेटरसह सुरक्षा रक्षक गजाआड

**गेवराई** | गढी येथील जयभवानी सहकारी साखर कारखान्याच्या गोडाऊनमधून झालेल्या साखर चोरीचा गेवराई पोलिसांनी अवघ्या ६ तासांत छडा लावला आहे. या प्रकरणी पोलिसांनी कारखान्यातीलच जेसीबी ऑपरेटर आणि सुरक्षा रक्षकास अटक करून ८ लाख ६९ हजार ५४० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, गोडाऊन कीपर गोपाळ कल्याण शिंदे यांनी याप्रकरणी फिर्याद दिली होती. २२ मार्च २०२६ रोजी मध्यरात्री २:३० वाजता कारखान्यात जेसीबी ऑपरेटर म्हणून काम करणारा शुभम शिरसाट आणि सुरक्षा रक्षक सोमनाथ सुरवसे (दोघे रा. गढी) यांनी संगनमत करून गोडाऊनचे शटर उचकावून आत प्रवेश केला. त्यांनी गोडाऊनमधील १८३० रुपये प्रति गोणी दराच्या एकूण ३८ साखरेच्या गोण्या (किंमत ६९,५४० रुपये) पिकअपमध्ये भरून चोरून नेल्या.

तपासादरम्यान पोलिसांनी संशयावरून शुभम आणि सोमनाथ यांना ताब्यात घेतले. सुरुवातीला त्यांनी उडवाउडवीची उत्तरे दिली, मात्र सखोल चौकशीत त्यांनी चोरीची कबुली दिली. चोरलेली साखर त्यांनी गढी येथेच विकल्याचे निष्पन्न झाले. पोलिसांनी ६९,५४० रुपयांची साखर आणि चोरीसाठी वापरलेली ८ लाख रुपये किमतीची पिकअप असा एकूण ८ लाख ६९ हजार ५४० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

ही कारवाई पोलीस अधीक्षक नवनीत काँवत, अपर पोलीस अधीक्षक सचिन पांढरकर, उपविभागीय पोलीस अधिकारी अनिल कटके, पोलीस निरीक्षक किशोर पवार यांच्या मार्गदर्शनाखाली सपोनि लंके, जंजाळ, पोउपनि ऊदगीरकर, खोत, पारधी आणि पोलीस अंमलदार सांगळे, पाटोळे यांनी केली.

# चारचाकी गाडीतुन अज्ञाताने एक लाख लांबविले; ग्रामीण पोलिसात फिर्याद

तभा. वृत्तसेवा

**माजलगाव, प्रतिनिधी** | शहरापासुन जवळच असलेल्या परभणी चौकातील मोरेश्वर हॉटेल समोर लावलेल्या स्विफ्ट डिझायर क्रं. एमएच ०६ एएस ५५५२ यर चारचाकी गाडीतुन ता. २० शुक्रवारी अज्ञात चोरट्याने लांबविले असुन याप्रकरणी ग्रामीण पोलिसात सुमन खंडु झेटे यांनी दिलेल्या फिर्यादीवरून अज्ञात चोरट्याविरूध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे की, शुक्रवारी परभणी चौकातील मोरेश्वर हॉटेलसमोर लावलेल्या स्विफ्ट डिझायर गाडीच्या सिटकव्हरमध्ये कॅरीबॅगमध्ये ठेवलेले नगदी एक लाख रूपये अज्ञात चोरट्याने गाडी लॉक व गाडीत कोणीही नसल्याचा फायदा घेवुन चोरले असुन याप्रकरणी ग्रामीण पोलिसात फिर्यादी सुमन खंडु झेटे रा. मोगरा यांच्या फिर्यादीवरून गुन्हा दाखल करण्यात आला आहे. प्रकरणाचा पुढील तपास सहाय्यक फौजदार श्री. बळवंते हे करत आहेत. दरम्यान परभणी चौकात असलेल्या सिसीटीव्ही कॅमे-यात सदरील चोरटे कैद झाले असुन पोलिसांनी तपासाची चक्रे फिरविल्यास निश्चीतच चोरटे तात्काळ सापडतील अशी अपेक्षा फिर्यादी व त्यांच्या नातेवाईकांनी व्यक्त केली.

# बीड पोलीस दलाचे 'हायटेक' पाऊल; पाचेगावची चैतन्य कानिफनाथ यात्रा सीसीटीव्ही व्हॅनच्या निगराणीत शांततेत संपन्न



**बीड** | कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी बीड जिल्हा पोलीस दलाने आधुनिक तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर सुरू केला आहे. पोलीस अधीक्षक श्री. नवनीत काँवत यांच्या संकल्पनेतून तयार करण्यात आलेल्या अत्याधुनिक 'सी.सी.टी.व्ही. मोबाईल कंट्रोल व्हॅन'चा यशस्वी वापर करून मौजे पाचेगाव येथील चैतन्य कानिफनाथ यात्रा उत्सव अत्यंत शांततेत पार पडला.

या अत्याधुनिक मोबाईल व्हॅनमध्ये एकूण २५ सीसीटीव्ही कॅमेरे असून ते सर्व 'एआय' (AI Based) प्रणालीवर आधारित आहेत. यामध्ये १ पीटीझेड कॅमेरा, ६ फेस रिकग्निशन कॅमेरे (जे प्रत्येक व्यक्तीचा स्वतंत्र फोटो जतन करतात) आणि ४ एएनपीआर कॅमेरे (जे वाहनांच्या नंबर प्लेटचा फोटो जतन करतात) यांचा समावेश आहे. विशेष म्हणजे, हे सर्व कॅमेरे कोणत्याही केबलशिवाय २० किलोमीटर अंतरापर्यंत व्हॅनमध्ये 'लाईव्ह' पाहता येतात. या व्हॅनला स्वतंत्र लाईटची व्यवस्था असून त्याचा बॅकअप ६ तासांपर्यंत मिळतो.

मागील वर्षी पाचेगाव येथील यात्रेत दोन समाजांमध्ये जातीय तेढ निर्माण झाली होती. या पार्श्वभूमीवर, पोलीस अधीक्षक श्री. नवनीत काँवत, अपर पोलीस अधीक्षक श्री. सचिन पांढरकर, उपविभागीय पोलीस अधिकारी श्री. अनिल कटके यांच्या मार्गदर्शनाखाली गेवराईचे पोलीस निरीक्षक किशोर पवार यांनी चोख नियोजन केले होते. या हायटेक व्हॅनचे कामकाज ऑपरेटर अमोल ससाणे यांनी पाहिले. गेवराई पोलीस ठाण्यातील सर्व अधिकारी व अंमलदारांनी सलग तीन दिवस सातत्याने बंदोबस्त ठेवून ही यात्रा शांततामय वातावरणात यशस्वी केली.

# गाळतो, भरण्या जगाचे पोटं उभा संसार जाळतो; कळंबआंबा येथे कवीसंमेलन रंगले

तभा. वृत्तसेवा

**केज दि २१(प्रतिनिधी)** | तालुक्यातील कळंबआंबा येथे शहावली दर्गा उरूस व गुढीपाडवा निमित्त यात्रा महोत्सव संपन्न झाला.

शुक्रवार रोजी कविसंमेलन संपन्न झाले.कवी गोरख शेंद्रे,कवी जनार्धन सोनवणे,कवी राजेश रेवले,, कवी विक्रम डोईफोडे, कवी पवन खरात,कवी डॉ हनुमंत सौदागर,कवी विशरद पठाण आदी कवींनी बहारदार कविता सादर केल्या. शेतीमतीच्या,निसर्ग,समाज, विविध विषयांवरील कवितांना रसिकांनी दाद दिली.

गोरख शेंद्रे यांनी समाजभान जागवणारी
"वाचितजाय पुस्तक वाचीत जाय समाज,
निळ्या भगव्या बरोबर पाडीत जा नमाज
रंगाच्या रंगाच्या भेदामध्येच
बरबाद झाल्या पिढ्या उगाच
कुणाच्या भानगडीत पडू नको येड्या"
ही कविता सादर केली
डॉ हनुमंत सौदागर यांनी
शेती मातीची कविता सादर



करून
उभ्या जगाचा पोशिंदा
थेंब घामाचे गाळतो,
भरण्या जगाचे पोटं
उभा संसार जाळतो"
शेतकऱ्यांचे कष्ट डोळसपणे उभा केले
तर तिर्रकस मधून सध्या बुवा बाबांकडून होत असलेले शोषण मांडताना
ज्योतिषी,भोंदूबाबा कडून
भक्तीचे सूत जुळले जाते,
जाळ्यात ओढून महिलांना
रात्रंदिवस छळले जाते
हे सादर करून सामाजिक भाष्य केले.
कवी राजेश रेवले यांनी
माय कवितेतून
"माय घराचा उंबरा
माय अंगणी तुळस,
बापाच्या मांदीराची
माय असते कळस "
ही कविता सादर आईची महती उभा केली.
पवन खरात यांनी गझल
सादर करताना
"काय करावे जगताना मी,
तेच नेमके समजत नाही
स्वप्न बघू की जिम्मेदारी, तेच
नेमके समजत नाही
सांडून जा ढगा रे, थोड्या तरी
सरी तू
उरलाय काळजाचा कोराच सातबारा"
शेतकरी जीवनाच्या व्यथा उभा केल्या.
विक्रम डोईफोडे यांनी शेतकरी जीवनावर भाष्य करणारी
'आम्हा कुनब्याच्या भाळी
लिहीलस काय,
अजब तुझा न्याय नभा अजब
तुझा न्याय"
ही कविता सादर केली
कवी जनार्धन सोनवण

# बीड शहराजवळील खजाना विहिर जवळ अपघातात तरुण जागीच ठार

तभा. वृत्तसेवा

**बीड (प्रतिनिधी)** | सोलापूर– धुळे महामार्गावरील वडगाव फाट्याजवळ आज दिनांक २४ मार्च शनिवार रोजी रात्री सुमारे १०:३० वाजता भीषण अपघात घडला. दुचाकीवरून बीड कडे येणाऱ्या तरुणाला मागून येणाऱ्या चारचाकी वाहनाने जोरदार धडक दिल्याने दुचाकीस्वाराचा जागीच मृत्यू झाला. दुचाकी स्वराला धडक दिल्यानंतर चार चाकी गाडी चालकाने घटनास्थळावरून पोवारा केला.

युवा नेते प्रेम कांबळे यांनी तातडीने १०८ क्रमांकावर कॉल करून ॲम्बुलन्सला माहिती दिली. मात्र, ॲम्बुलन्स वेळेवर न पोहोचल्याने ऑटो रिक्षामध्ये अपघात ग्रस्त तरुणाला उपचारासाठी दाखल करण्यात आले परंतु अति रक्तस्राव व वेळेवर उपचार न मिळाल्याने तरुणाचा मृत्यू झाल्याची माहिती समोर येत आहे.

घटनेनंतर परिसरात काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. अपघातातील मृत तरुणाची ओळख अद्याप पटलेली नसून, घटनास्थळी बीड ग्रामीण पोलीस दाखल झाले असून अधिक तपास करत आहेत.

# वेश्या व्यवसायावर छापा;दोन महिलांची सुटका

तभा. वृत्तसेवा

**बीड** | प्रतिनिधी (दि. २१ मार्च २०२६)अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध कक्ष (AHTU) बीड आणि माजलगाव ग्रामीण पोलीस ठाण्याच्या संयुक्त कारवाईत वारोळा (ता. माजलगाव) येथे राहत्या घरात सुरू असलेल्या वेश्या व्यवसायावर छापा टाकण्यात आला. या कारवाईत दोन पीडित महिलांची सुटका करण्यात आली असून दोन आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलीस सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, AHTUच्या पोलीस उपनिरीक्षक पल्लवी जाधव यांना २० मार्च रोजी गुप्त माहिती मिळाली होती की, वारोळा गावात बाहेर जिल्ह्यातील महिलांना बोलावून वेश्या व्यवसाय चालवला जात आहे. ही माहिती वरिष्ठांना कळविल्यानंतर सहाय्यक पोलीस अधीक्षक राहुलकुमार यांच्या मार्गदर्शनाखाली छाप्याचे आदेश देण्यात आले.

त्यानुसार AHTU पथक व माजलगाव ग्रामीण पोलीस ठाण्याचे अधिकारी व कर्मचाऱ्यांनी डमी ग्राहक व पंचांच्या उपस्थितीत सापळा रचला. डमी ग्राहकाने संबंधित ठिकाणी जाऊन खात्री केली असता, तेथील एजंट महिलेने वेश्या गमनासाठी ५०० रुपयांची मागणी केली. ठरल्याप्रमाणे रक्कम दिल्यानंतर इशारा मिळताच पोलीस पथकाने तत्काळ छापा टाकला.



यावेळी अलका हडागाळे (रा. वारोळा) हिच्याकडून डमी ग्राहकाने दिलेली ५०० रुपयांची नोट जप्त करण्यात आली. तसेच ठिकाणी दोन पीडित महिला आढळून आल्या. चौकशीत एक महिला परभणी येथील असून तिला रामा गायकवाड (रा. वारोळा) याने फोन करून बोलावल्याचे समोर आले, तर दुसरी महिला छत्रपती संभाजीनगर येथील असल्याचे निष्पन्न झाले. ग्राहकाकडून ५०० रुपये घेतले जात असून त्यापैकी ३०० रुपये महिलांना दिले जात असल्याची माहितीही पुढे आली.

पोलीसांनी घटनास्थळाची झडती घेतली असता १२ न वापरलेले निरोध जप्त करण्यात आले. आरोपी अलका हडागाळे व रामा गायकवाड हे महिलांना बोलावून घेऊन त्यांच्याकडून वेश्या व्यवसाय करून घेत असल्याचे निष्पन्न झाले.

या प्रकरणी माजलगाव ग्रामीण पोलीस ठाण्यात अनैतिक मानवी व्यापार प्रतिबंध कायदा १९५६ अंतर्गत कलम ३, ४, ५, ६ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दोन्ही पीडित महिलांची सुटका करण्यात आली आहे.

ही कारवाई बीड पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत, अप्पर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर, सहाय्यक पोलीस अधीक्षक राहुलकुमार प्रभारी अधिकारी माजलगांव ग्रामीण, पोलीस उपनिरीक्षक पल्लवी जाधव, सहायक पोलीस उप निरीक्षक मीरा रेडेकर, महीला पोलीस हवालदार शोभा जाधव, पोलीस हवालदार अशोक शिंदे, प्रदीप येवले. संजय राठोड, पोलीस शिपाई आकाश कारले. विकास वाघमारे विठ्ठल चव्हाण, सर्व नेमणूक व अ. मा. वा. प्र. कक्ष व पोठा माजलगांव ग्रामीण यांनी केली.

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# शेतकऱ्यांना आधार देणारा, राज्याला ट्रिलीयन अर्थव्यवस्थेकडे नेणारा अर्थसंकल्प–आ.केणेकर



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २२ मार्च**
शेतकऱ्यांना दोन लाखांची कर्जमाफी देऊन आधार, एआय तंत्रज्ञानाचा वापर करून शेतीला प्रगतीच्या मार्गावर नेणारा, पक्क्या रस्त्यांद्वारे ग्रामीण महाराष्ट्राची अर्थव्यवस्था आणखी मजबुत करणारा, मेट्रोसारख्या सुविधांच्या माध्यमातून शाश्वत शहरी विकासाला चालना देणारा महायुती सरकारचा यावर्षीचा अर्थ संकल्प तसेच राज्याला ट्रिलीयन डॉलर्सची अर्थव्यवस्था बनवेल असा विश्वास भारतीय जनता पक्षाचे आ. संजय केणेकर यांनी पत्रकार परिषदेत व्यक्त केला.
रविवारी भारतीय जनता पक्षाच्यावतीने राज्याच्या अर्थसंकल्पावर खा रामराव वडकुते यांच्या निवासस्थानी पत्रकार परिषदेचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी आ. संजय केणेकर, आ. तान्हाजीराव मुटकुळे, जिल्हाध्यक्ष गजाननराव घुगे, माजी आ. डॉ प्रज्ञा सातव, शशीकांत वडकुते, माजी नगराध्यक्ष बाबाराव बांगर, माजी जिल्हाध्यक्ष फुलाजीराव शिंदे आदींची प्रमुख उपस्थिती होती.
यावेळी पत्रकार परिषदेत राज्याच्या अर्थसंकल्पावर बोलतांना आ. केणेकर म्हणाले की, विकसित भारताचे स्वप्न२०४७ पर्यंत साध्य करण्याच्या पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या निर्धाराला महाराष्ट्राची मोलाची साथ मिळावी यादृष्टीने यावर्षीच्या अर्थसंकल्पाची आखणी करण्यात आली आहे. शेती, उद्योग, सेवा, ऊर्जा, शिक्षण, आरोग्य सिंचन व पायाभूत सुविधा अशा सर्व क्षेत्रांच्या विकासाचा मार्ग दाखविण्याबरोबरच या अर्थसंकल्पात सामान्य माणसाला सुशासनाची, गतिमान प्रशासनाची अनूभूती देण्यासाठीही दुरगामी परिणाम करणारे निर्णय घेण्यात आले आहेत.
मागील वर्षी अतिवृष्टीमुळे संकटात सापडलेल्या शेतकऱ्यांना महायुती सरकारने दोन लाखांपर्यंतचे कर्ज माफ करून मोठा आधार दिला आहे. नियमित कर्जफेड करणाऱ्यांना ५० हजारांचे प्रोत्साहनपर अनुदान देण्याचा निर्णय घेतला आहे. शेतीमालाला जागतिक बाजारपेठ देण्यासाठी १० ते १५ पिकांची एकात्मिक मुल्यसाखळी, अँग्रीस्टॅक, महावेध, क्रॉपसॅप, महाडिबीटी आदी डिजीटल प्लॅटफॉर्मच्या माध्यमातून एकात्मिक इकोसिस्टीम यासारखे निर्णय शेतकऱ्याला गतिमान बाजारपेठेशी जोडण्यात मदत करणारे आहेत. याशिवाय मुख्यमंत्री बळीराजा मोफत वीज योजना सुरूच राहणार आहे. या योजनेसाठी २० हजार कोटींची तरतुद करण्यात आली आहे तसेच मुख्यमंत्री सौर कृषी वाहीनी योजना २.० च्या माध्यमातून १६ हजार मे. वॅ. ऊर्जाक्षमता निर्माण करण्यात येणार आहे. यातून १०० टक्के कृषी पंपांना दिवसा वीजपुरवठा होईल.
नदीजोड प्रकल्पातून शाश्वत विकास साध्य करण्यासाठी वैनगंगा–नळगंगा नदीजोड प्रकल्पासाठी ९४९६८ कोटी रूपये तर दमणगंगा–वेतरणा–गोदावरी नदीजोड प्रकल्पासाठी १३४९७ हजार कोटी, नार–पार गिरणा नदीजोड प्रकल्पासाठी ७४६५ कोटी, दमणगंगा–एकदरे–गोदावरी नदीजोड प्रकल्प २२१३ कोटीची तरतुद करण्यात आली आहे. कोल्हापूर, सांगली जिल्ह्यातील पूर निवारणासाठी जागतिक बँकेच्या मदतीने २२४० कोटींचा प्रकल्प राबविण्यात येणार आहे. त्याचबरोबर कृष्णा खोऱ्यातील पुराचे पाणी भीमा खोऱ्यातील पश्चिम महाराष्ट्र आणि मराठवाड्यातील दुष्काळग्रस्त भागात वळविण्यात येणार आहे.
शहरी भागातील पायाभूत सुविधांचा विकास करण्यासाठी राज्यातील मेट्रो नेटवर्क १२०० किमीवर नेण्यात येणार आहे. ६ हजार किमीपेक्षा जास्तचे द्रुतगती मार्गाचे जाळे तयार करण्यात येणार आहे. शिरूर ते छत्रपती संभाजीनगर ग्रीनफिल्ड महामार्गाचे सहापदरीकरण करण्यासाठी १४८८६ कोटीची तरतुद करण्यात आली आहे. याशिवाय अमृतकाल रस्ते विकास योजना, मुख्यमंत्री ग्रामसडक योजना, प्रधानमंत्री ग्रामसडक योजनांसाठी भरीव तरतुद करण्यात आली असल्याची माहीती आ. संजय केणेकर यांनी दिली.

# एनटीसीमधील ४४ सुसज्ज गाळे उद्‌घाटनाच्या प्रतिक्षेत



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २२ मार्च**
शहराच्या वैभवात भर टाकणारे आणि व्यापाऱ्यांसाठी हक्काची जागा उपलब्ध करून देणारे एक नवीन व्यापारी संकुल आता पूर्णत्वास आले आहे. औंढा रोडवरील स्वर्गीय खासदार राजीव सातव नाट्यगृहाच्या परिसरात हिंगोली नगर परिषदेच्या वतीने हे सुसज्ज मार्केट तयार करण्यात आले असून, आता केवळ याच्या अधिकृत उद्घाटनाची आणि लिलाव प्रक्रियेची प्रतीक्षा व्यापारी वर्गाला लागली आहे.
नगर परिषदेने अत्यंत नियोजनबद्ध पद्धतीने या मार्केटचे काम पूर्ण केले आहे. हे संकुल दोन मजली असून यामध्ये एकूण ४४ गाळे तयार करण्यात आले आहेत. तळमजल्यावर २४ आणि पहिल्या मजल्यावर २० अशा स्वरूपात हे गाळे विभागले गेले आहेत. व्यापाऱ्यांच्या सोयीसाठी आणि ग्राहकांच्या सुविधेसाठी या ठिकाणी सर्व आधुनिक सोयीसुविधा पुरवण्यात आल्या आहेत.
केवळ गाळेच नव्हे, तर या परिसराचा विकास करताना नगरपालिकेने दूरदृष्टी ठेवली आहे. यामध्ये मोकळी जागा ग्राहकांना फिरण्यासाठी आणि मालाची ने–आण करण्यासाठी प्रशस्त मोकळी जागा ठेवण्यात आली आहे. महिला व पुरुष व्यापाऱ्यांसह ग्राहकांसाठी स्वतंत्र शौचालयाची उत्तम व्यवस्था करण्यात आली आहे. मार्केटमध्ये पाणीपुरवठा आणि विजेची जोडणी पूर्ण झाली आहे. हिंगोली शहरातील वाढती गर्दी आणि बाजारपेठेचा विस्तार पाहता, हे नवीन मार्केट शहराच्या आर्थिक विकासाला गती देणारे ठरेल. औंढा रोड हा वर्दळीचा रस्ता असल्याने या ठिकाणी व्यवसायाला मोठी संधी आहे. मात्र, गाळ्यांचे काम पूर्ण होऊनही अद्याप लिलाव प्रक्रिया सुरू झालेली नाही. हे गाळे नेमके कधी खुले होणार आणि लिलावाची तारीख कधी जाहीर होणार, याकडे शहरातील सुशिक्षित बेरोजगार तरुण आणि अनुभवी व्यापाऱ्यांचे डोळे लागले आहेत. नगर पालिका प्रशासनाने लवकर ही प्रक्रिया राबवल्यास नागरिकांना एकाच छताखाली सर्व सुविधा असलेले नवीन मार्केट उपलब्ध होईल आणि नगरपालिकेच्या उत्पन्नातही मोठी भर पडेल, अशी चर्चा आता शहरात रंगत आहे.

# हिंगोली महसूल, जि प वसाहतीतील रस्त्यांचे काम पूर्ण




**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २२ मार्च**
गेल्या अनेक दिवसांपासून खडतर प्रवासाचा सामना करणाऱ्या हिंगोली शहरातील महसूल आणि जिल्हा परिषद कर्मचारी वसाहतीतील रहिवाशांना मोठा दिलासा मिळाला आहे. प्रशासनाच्या वतीने या भागातील खराब रस्त्याचे नूतनीकरण करून अत्यंत दर्जेदार सिमेंट काँक्रीटचा रस्ता तयार करण्यात आला आहे. रस्ता पूर्ण झाल्यामुळे या परिसरातील शासकीय अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी समाधान व्यक्त केले आहे.
महसूल आणि जिल्हा परिषद कर्मचारी वसाहतीकडे जाणाऱ्या या मुख्य रस्त्याची अवस्था अत्यंत बिकट झाली होती. ठिकठिकाणी पडलेले खड्डे आणि उडणारी धूळ यामुळे येथे राहणाऱ्या अधिकारी, कर्मचारी आणि त्यांच्या कुटुंबीयांना मोठा नाहक त्रास सहन करावा लागत होता. पावसाळ्यात तर या रस्त्यावरून चालणेही कठीण झाले होते. या संदर्भात सातत्याने होत असलेल्या मागणीची दखल घेऊन प्रशासनाने अखेर या रस्त्याच्या सिमेंट काँक्रीटीकरणाचे काम हाती घेतले आणि ते आता पूर्णत्वास आले आहे.
रस्त्याचे काम दर्जेदार व्हावे आणि तो दीर्घकाळ टिकावा, यासाठी विशेष काळजी घेतली जात आहे. विशेष म्हणजे, रस्ता तयार झाल्यानंतर त्याचे सिमेंट व्यवस्थित सेट व्हावे यासाठी या परिसरातील कर्मचारी स्वतः पुढाकार घेताना दिसत आहेत. सिमेंट रोडवर टँकरच्या साहाय्याने पाणी मारण्याचे काम सध्या वेगात सुरू आहे. रस्त्याला पुरेसे पाणी पाजल्यामुळे त्याची मजबुती वाढते, हे लक्षात घेऊन स्थानिक रहिवासी या प्रक्रियेवर लक्ष ठेवून आहेत.



**हिंगोली– भारतीय जनता पक्षाचे आ. संजय केणेकर हे हिंगोली येथे आले असता माजी युवा जिल्हाध्यक्ष पप्पू चव्हाण यांनी संत शिरोमणी नामदेव महाराज यांची प्रतिमा भेट देत त्यांचा सत्कार केला. यावेळी आ. तान्हाजीराव मुटकुळे, शशीकांत वडकुते यांच्यासह कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. छाया– सुनील पाठक**

## संक्षिप्त वृत्त

### गोपालदास लदनिया यांचे निधन, मरणोत्तर केले नेत्रदान करण्याचा कुटुंबियांचा निर्णय



हिंगोली– शहरातील मारवाडी गल्लीतील गोपालदास रामेश्वरजी लदनिया यांचे रविवारी पहाटे चारच्या सुमारास निधन झाले आहे. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे संघचालक रामेश्वर लदनिया यांचे ते सुपूत्र होत तसेच भाजपचे ज्येष्ठ नेते सुभाषचंद लदनिया यांचे ते बंधू होत. सामाजिक कार्यात त्यांचा सहभाग होता. गोपालदास लदनिया यांच्या निधनानंतर त्यांच्या कुटुंबियांनी नेत्रदान करण्याचा निर्णय घेतल्यानंतर गॅलक्सी सेवाभावी संस्था हिंगोली यांच्या माध्ममातून नेत्ररोग तज्ञ डॉ नागेश पिंपरे यांच्या टिमने त्यांच्या डोळ्यावर शस्त्रक्रिया करीत त्यांचे डोळे जालना येथील नेत्रालयात जतन करण्यासाठी नेले आहेत. त्यांच्या नेत्रदानामुळे दोन व्यक्तींना दृष्टी मिळणार आहे. स्व गोपालदार लदनिया यांच्या पार्थिवावर रविवारी कयाधू नदीच्या तीरावरील स्मशानभूमीत सायंकाळी ५ वाजता अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी मोठ्या संख्येने व्यापारी, सामाजिक संघटनांचे पदाधिकारी, राजकीय, शैक्षणिक, सांस्कृतिक क्षेत्रातील नागरिक उपस्थित होते. त्यांच्या पश्चात दोन भाऊ, चार बहिणी, चार मुले, नातसुना, नातू, पंतू असा मोठा परिवार आहे. हिंगोलीतील ते प्रसिध्द कपडा व्यापारी होते.

### श्री विघ्नहर्ता चिंतामणी गणपतीची मिरवणूक



हिंगोली– श्री विघ्नहर्ता चिंतामणी गणपती बाप्पाची स्थापना पाडव्याच्या दिवशी करण्यात आली होती. दर वर्षी पाडव्या नंतर येणाऱ्या पहिल्या रविवारी श्रींची पंगत–महाप्रसाद केला जातो. यावर्षी पहिल्यांदाच श्रींच्या मूर्तीची मिरवणूक काढण्यात आली. शहरातील गड्डीपीर गल्ली, मारवाडी गल्ली, महात्मा गांधी चौक, महावीर चौक, जुने ग्रामीण पोलिस ठाणे रोड प्रमुख मार्गाने मिरवणूक काढण्यात आली. या वेळी बँड पथक वर सर्व श्रींचे भजन आणि गीत गायल्या जात होते. तसेच भजनी मंडळ या मिरवणुकीत सामील झाले होते. पूर्ण मिरवणुकीत भजनी मंडळीनी पाऊली खेळत आणि भजन गात मिरवणुकीची शोभा वाढवून सर्व भक्तिमय वातावरण निर्माण झाले होते. यावेळी सतिष लोहिया, दिलीप बांगर, मनोज दावनगिरे, बालाजी कामतळवार, बद्रीभाऊ मुंदडा, पवन मुंदडा, प्रेमालाल जैस्वाल आणि असंख्य भाविक मिरवणुकीत सामील झाले होते

# समाधान हेच खरे धन, लालसेपासून दूर रहा– प. पू. रमेशभाई ओझा





**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २२ मार्च**
येथे सुरू असलेल्या श्रीमद भागवत कथेत तिसऱ्या दिवशी अंतरराष्ट्रीय ख्यातनाम कथाकार प.पू. भाईश्री रमेश भाई ओझा यांनी समाधान, अध्यात्म आणि जीवनमूल्यांवर अत्यंत प्रभावी विचार मांडले. समाधान हेच सर्वात मोठे धन आहे असे ठाम प्रतिपादन करत त्यांनी भाविकांना जीवन जगण्याची खरी दिशा दिली.
येथील रामलीला मैदानावर श्रीमद भागवत कथेच्या तिसऱ्या दिवशी शनिवारी( ता. २१) मार्च रोजी नानुराम जांगीड, मीना गुप्ता, डॉ. निलेश सोमाणी या यजमान यांनी कथेच्या प्रारंभी पूजा अर्चना केली. भाईश्री पुढे म्हणाले, फक्त श्वास चालू आहे म्हणून त्याला जीवन म्हणत नाहीत; खरे जीवन तेच, जे समाधानाने आणि शांतीने भरलेले आहे. त्यांनी श्रीमद भागवताचे महत्त्व अधोरेखित करत भगवान श्रीकृष्णाच्या २४ अवतारांचा उल्लेख केला. तसेच भगवान पुराण आणि भागवत पुराण यात काय फरक आहे? हा प्रश्न उपस्थित करून अनेकांना या विषयाची माहिती नसल्याचे त्यांनी स्पष्ट केले.
अध्यात्मिक उन्नतीसाठी रुची अत्यंत महत्त्वाची असल्याचे सांगताना त्यांनी समाधान व्यक्त केले की, आजकाल महाविद्यालयीन तरुणही सुंदरकांड व तीर्थयात्रांमध्ये सक्रिय सहभाग घेत आहेत. यावेळी त्यांनी हम को मन की शक्ति देना हे गीत सादर करत भाविकांचे लक्ष वेधले.
भाईश्रींनी सांगितले की, ज्याला शांती नाही, तो कधीच सुखी होऊ शकत नाही. त्यासाठी भगवान श्रीकृष्णांनी दिलेली जीवनसूत्रे आचरणात आणली पाहिजेत. त्यांनी मै तो आरती उतारू रे, संतोषी माता की या दोह्याचे वर्णन करत प्रत्येक घरात संतोषी माता म्हणजेच समाधानाची भावना असणे गरजेचे असल्याचे सांगितले. लालसा टाळून प्रामाणिकपणे मेहनत करून मिळवलेल्या संपत्तीमध्येच खरे समाधान असल्याचे सांगत त्यांनी भ्रष्ट मार्गाने पैसा कमावणारा कधीच सुखी राहू शकत नाही, असे स्पष्ट केले. तसेच रोग लपवून ठेवला तर तो वाढतो असे उदाहरण देत जीवनातील समस्यांकडे दुर्लक्ष करू नये, असा सल्लाही दिला.
शिवजींच्या तिसऱ्या डोळ्याचा संदर्भ देताना त्यांनी सांगितले की, जो अंध असूनही सत्यावर विश्वास ठेवत नाही, त्यासाठी हा इशारा आहे. यानंतर कानडा राजा पंढरीचा या अभंगाने वातावरण भक्तिमय झाले. तर धर्मात घुसखोरी करणाऱ्यांना असुर म्हटले असल्याचे सांगत त्यांनी माणसाने माणसासारखे वागावे, असा संदेश दिला.
महिलांमधील वाढत्या अपेक्षांवर भाष्य करत त्यांनी एक सुंदर दृष्टांत मांडला - जर पृथ्वीवर तुम्ही एकटेच असाल आणि सर्व काही तुमच्याकडे असेल, पण इतरांना जळवायला कोणीच नसेल, तर त्या संपत्तीचा काय उपयोग?
या उदाहरणातून त्यांनी मोह टाळून, जे आहे त्यात संतोष मानत समाधानाने जीवन जगावे, असा मोलाचा सल्ला दिला. दरम्यान, तिसऱ्या दिवशीही कथा मंडपात भाविकांची मोठी गर्दी उसळली होती, आणि संपूर्ण वातावरण भक्तिरसाने भारावून गेले होते. प. पू. भाईश्री यांनी आज शनिवारी सकाळी नरसी नामदेव येथे भेट देऊन संत नामदेवाचे दर्शन घेतले आणि इतर ठिकाणची माहिती जाणून घेतली.

# तरूणीला पळवून नेत अत्याचार, सेनगाव पोलिसांत पाच जणांवर गुन्हा दाखल

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २२ मार्च**
सेनगाव पोलिस ठाण्यांतर्गत एका महाविद्यालयीन तरूणीला पळवून नेत तिच्यासोबत लग्न केल्याचे भासवून अत्याचार केल्याची घटना घडली आहे. याप्रकरणी त्या तरूणीच्या तक्रारीवरून सेनगाव पोलिस ठाण्यात पाच जणांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोपींच्या शोधासाठी पथक रवाना झाले आहेत.
पोलिसांनी दिलेल्या माहीतीनुसार सेनगाव पोलिस ठाण्यांतर्गत एका महाविद्यालयात शिक्षण घेणाऱ्या तरूणीचा गजानन चिलगर या तरूणाने छेड काढून विनयभंग केला. सदर प्रकार कोणाला सांगितल्यास जीवे मारण्याची धमकी दिली. या प्रकारामुळे घाबरलेल्या तरूणीने शिक्षण बंद होईल या भितीने सदर घटना कोणालाही सांगितली नाही. त्यानंतर गजानन याने इतरांच्या मदतीने त्या तरूणीला बळजबरीने कारमध्ये टाकून नाशिक येथे नेले. त्या ठिकाणी त्या तरूणीच्या इच्छेविरूध्द विवाह केला. तसेच तिच्यावर अत्याचार केला. सदर प्रकार कोणाला सांगितल्यास तुला व तुझ्या भावाला जीवे मारून टाकू अशी धमकी दिली. या प्रकारामुळे घाबरलेल्या मुलीने सदर प्रकार सुरूवातीला कोणाला सांगितला नाही मात्र गजानन याच्याकडून मिळत असलेल्या धमक्यांना कंटाळून तरूणीने सदर प्रकार तिच्या कुटुंबियांना सांगितला. या प्रकारामुळे तरूणीचे कुटुंबीय देखील हादरून गेले. त्यांनी तरूणीला घेवून सेनगाव पोलिस ठाणे गाठले. तरूणीच्या तक्रारीवरून गजानन चिलगर, गणेश चिलगर, अंकुशचिलगर याच्यासह दोन महिलांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.
पोलिस उप अधीक्षक राजकुमार केंद्रे, सहाय्यक पोलिस निरीक्षक दिपक मस्के, उपनिरीक्षक रवीकिरण खंदारे, जमादार सुभाष चव्हाण, पोले यांच्या पथकाने तातडीने घटनास्थळी भेट दिली. या प्रकरणात आरोपींच्या शोधासाठी सेनगाव पोलिसांनी तातडीने पथक स्थापन करून आरोपींच्या अटकेसाठी रवाना केली आहेत. पथकांकडून आरोपींचा कसून शोध घेतला जात असल्याचे पोलिसांनी सांगितले. उपनिरीक्षक रवीकिरण खंदारे हे पुढील तपास करीत आहेत.

# जिजाऊ ब्रिगेडच्या अधिवेशनाला उपस्थित रहा– ज्योती कोथळकर

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २२ मार्च**
महिलांचे सामाजिक सांस्कृतिक व वैचारिक विचारपीठ असलेल्या जिजाऊ ब्रिगेड च्या वतीने दिनांक ३ एप्रिल २०२६ रोजी राज्यस्तरीय महाअधिवेशन श्री छत्रपती शिवाजी महाराज नाट्यमंदिर मुंबई (दादर) येथे आयोजित करण्यात आलेले आहे. या अधिवेशनाला मोठ्या संख्येने जिजाऊ ब्रिगेडच्या महिलांनी उपस्थित राहण्याचे आवाहन प्रदेश उपाध्यक्ष ज्योती कोथळकर यांनी केले आहे.
या अधिवेशनासाठी महाराष्ट्रासह देशभरातून जवळपास एक हजार महिला पदाधिकारी सहभागी होणार आहेत तसेच प्रत्येक जिल्ह्यातील असंख्य कार्यकर्ते उपस्थित राहणार असून या अधिवेशनातील वैचारिक प्रबोधनाचा व सांस्कृतिक उपक्रमांचा लाभ मिळणार आहे. हे महाअधिवेशन एकूण चार सत्रामध्ये पार पडणार असून उद्घाटन म्हणून मुंबई महानगरपालिकेच्या महापौर रितूताई तावडे यांच्या हस्ते होणार असून कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जिजाऊ ब्रिगेडच्या प्रदेशाध्यक्षा सीमाताई बोके असणार आहेत. कार्यक्रम स्थळी विविध सुप्रसिद्ध वक्ते यांचे मार्गदर्शन लाभणार असून अधिवेशनस्थळी जिजाऊ ब्रिगेडच्या स्मरणिकेचे प्रकाशन होणार आहे.
या अधिवेशनासाठी मराठा सेवा संघाचे संस्थापक अध्यक्ष ॲड पुरुषोत्तम खेडेकर, शिवधर्म संसद सदस्य रेखाताई खेडेकर तसेच मराठा सेवा संघाचे प्रदेशाध्यक्ष इंजि.विजय घोगरे, राज्य कार्याध्यक्ष नवनाथ घाडगे प्रदेश महासचिव चंद्रशेखर शिखरे, जिजाऊ ब्रिगेड महासचिव स्नेहाताई खेडेकर आंतरराष्ट्रीय अध्यक्षा मयुराताई देशमुख, राष्ट्रीय अध्यक्ष निर्मलाताई पाटील यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. या अधिवेशनासाठी जिजाऊ ब्रिगेडच्या राज्य उपाध्यक्ष अंजलीताई भोसले, मुंबई अध्यक्ष स्मिता देसाई, नवी मुंबई अध्यक्ष भारतीताई पाटील, महासचिव सरिताताई सोमवंशी, कार्याध्यक्ष मनीषाताई देसाई, ठाणे जिल्हाध्यक्ष सुनिताताई पाटील व मुंबईची सर्व टिम अथक परिश्रम घेत आहेत. जिल्हाध्यक्ष प्रियंका चिखलीकर भोयर यांनी अधिवेशनाला उपस्थित राहण्याचे आवाहन केले आहे.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



# पवित्र रमजान ईद निमित्त माजी मंत्री आ. संजय बनसोडे यांच्याकडुन शुभेच्छा

**तभा वृत्तसेवा**

**उदगीर, दि. २२ मार्च :** पवित्र रमजान महिन्याची सांगता होत असताना साजऱ्या होणाऱ्या रमजान ईदच्या निमित्ताने आमदार संजय बनसोडे यांनी ईदगाह मैदानावर उपस्थित राहून सर्व मुस्लिम बांधवांना शुभेच्छा दिल्या. रमजान महिना हा संयम, त्याग, दया आणि मानवतेचा संदेश देणारा आहे. या पवित्र महिन्यात उपवास, प्रार्थना आणि दानधर्माच्या माध्यमातून समाजात बंधुभाव व एकोपा वृद्धिंगत होतो. ईदचा सण हा आनंद, शांतता आणि एकमेकांप्रती प्रेम व्यक्त करण्याचा उत्सव असून, तो समाजात एकात्मतेची भावना अधिक दृढ करतो असे माजी आ.संजय बनसोडे यांनी सांगितले.

यावेळी उपस्थित सर्व मुस्लिम



बांधवांना गुलाबपुष्प देवून गळाभेट घेवुन पवित्र रमजान ईदच्या आ.संजय बनसोडे यांनी शुभेच्छा दिल्या.

यावेळी मौलाना मुस्ताक खतीब, माजी आ.गोविंदराव केंद्रे, नगरसेवक सचिन हुडे, शहराध्यक्ष सय्यद जानीमियाँ, गटनेते अनिल मुदाळे, जि.प. सदस्य डॉ. दिपक सोमवंशी, जि.प. सदस्य ज्ञानेश्र्वर बिरादार, उपजिल्हाधिकारी सुशांत शिंदे, तहसीलदार राम बोरगावकर, मुख्याधिकारी सोमनाथ जाधव, सनाउल्ला खान, नरसिंग शिंदे, माजी उपसभापती बाळासाहेब मरलापल्ले, नगरसेवक राजकुमार भालेराव, सर्जेराव भांगे, प्रा.श्याम डावळे, वसंत पाटील, शशिकांत बनसोडे, शिवकुमार कांबळे, अमर सुर्यवंशी, धिरज कसबे, सय्यद इम्रान, इमरोज हाशमी,फय्याज शेख, इब्राहिम नाना पटेल, राजकुमार चव्हाण, प्रा.शिवाजीराव देवनाळे, शफी हाशमी, संदीप देशमुख, बापू साळुंके, हिफ्जुरहेमान हाशमी, अखिल मोमीन, युसुफ बागवान, बाबासाहेब सुर्यवंशी, सोनु हाशमी, सुलतान मिर्झा, शहेबान शेख, सय्यद वसिम, सय्यद अफरोज पटवेघर, सय्यद इम्रान, अविनाश गायकवाड आदी उपस्थित होते.

पुढे बोलताना आ.संजय बनसोडे यांनी सर्व समाजबांधवांना आवाहन केले की, धर्म, जात, पंथ यापलीकडे जाऊन आपण सर्वांनी एकोप्याने राहावे आणि समाजाच्या प्रगतीसाठी हातभार लावावा. ईदच्या या मंगलमय प्रसंगी सर्वांच्या जीवनात सुख, शांती आणि समृद्धी नांदो, अशी प्रार्थना त्यांनी व्यक्त केली.

या शुभेच्छांमुळे परिसरातील मुस्लिम बांधवांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.

यावेळी पक्षाचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## संक्षिप्त...

### एलबीएस च्या विद्यार्थ्यांचे सैनिक स्कूल परिक्षेत यश



**निलंगा :** निलंगा येथील लाल बहादूर शास्त्री प्रा विद्यालयातील अथर्व निवृत्तीराव हिंपळेपाटील व सार्थक निवृत्तीराव हिंपळेपाटील या दोन सख्या भावाने सातारा सैनिक स्कुल च्या प्रवेश परीक्षेत घवघवीत यश संपादन करून आपल्या वडिलांचे स्वप्न साकार केले


या यशाबद्दल एल. बी. एस. मिशन चे अध्यक्ष तथा माजी अध्यक्ष जि. प. लातूर श्री पंडितराव धुमाळ साहेब शाळेचे मुख्याध्यापक श्री बिराजदार आर. एस. व शाळेतील शिक्षक यांनी या निवडीबद्दल अथर्व व सार्थक यांचे व पालकांचा शाळेच्या व संस्थेच्या वतीने सत्कार करण्यात आला व पुढील वाटचालीस शुभेच्छा देण्यात आल्या.

### माजी मंत्री, आमदार अमित देशमुख यांचा वाढदिवस विविध उपक्रमांनी साजरा



**रेणापूर :** राज्याचे माजी मंत्री तथा माजी पालकमंत्री आ. अमित विलासराव देशमुख साहेब यांच्या वाढदिवसानिमित्त रेणापूर शहर व तालुका काँग्रेसच्या वतीने विविध सामाजिक उपक्रमांचे आयोजन करून वाढदिवस उत्साहात साजरा करण्यात आला. येथील ग्रामदैवत रेणुका देवी मंदिरात महापूजा करण्यात आली. तसेच ग्रामीण रुग्णालयात उपचार घेत असलेल्या रुग्ण व त्यांच्या नातेवाईकांना फळवाटप करून सामाजिक बांधिलकी जपण्यात आली. यावेळी रेणा सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन अनंतराव देशमुख, व्हा चेअरमन प्रवीण पाटील, संचालक तुकाराम कोल्हे, पंडित माने, कॉंग्रेसचे तालुकाध्यक्ष प्रमोद कापसे, शहराध्यक्ष तथा नगरसेवक पदमसिंह पाटील, प स सदस्य डॉ तातेराव वाघमारे, बालाजी हाके,कॉंग्रेसचे गटनेते गजेंद्र चव्हाण, माजी सभापती प्रदीप राठोड कृउबाचे सभापती उमाकांत खलंग्रे, उपसभापती ड .शेषेराव हाके, नगरसेवक सचिन मोटेगावकर, संतोष शिंदे, भुषण पनुरे,हनुमंतराव पवार, केशव माने, अमरिश भिसे, रघुनाथ मदने, राज मस्के, शिवाजी अकनगिरे,नितीन मोटेगावकर, सचिन इगे, प्रदिप काळे, सतीश चव्हाण, दगडू पाटील यांच्यासह काँग्रेस पदाधिकारी, कार्यकर्ते व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. उपस्थितांनी माजी मंत्री आ. देशमुख साहेब यांच्या दीर्घायुष्य व उत्तम आरोग्यासाठी प्रार्थना केली. युवक काँग्रेस व महिला काँग्रेसच्या पदाधिकाऱ्यांसह अनेक मान्यवर उपस्थित होते.

### गुलालाच्या कीर्तनाने भक्तिरंग; संतसंगाच्या संदेशाने भारावला सप्ताह



**उदगीर :** श्री समर्थ धोंडुतात्या महाराज यांच्या ९४ व्या पुण्यतिथीनिमित्त आयोजित अखंड हरिनाम सप्ताहात संतपीठात दुपारी २ ते ५ या वेळेत ह.भ.प. विजयानंद महाराज सुपेकर यांचे गुलालाचे कीर्तन अत्यंत भक्तिमय वातावरणात पार पडले. टाळ-मृदुंगाच्या गजरात, हरिनामाच्या अखंड निनादात व गुलालाच्या उधळणीत संपूर्ण परिसर भक्तिरंगात न्हाऊन निघाला. या सप्ताहात पारायण व रामकथेची सांगता पार पडली असून अखंड हरिनाम सप्ताहाची सांगता दि. २२/०३/२०२६ रोजी काल्याच्या कीर्तनाने होणार आहे. हे कीर्तन ह.भ.प. जयवंत महाराज बोधले यांच्या वाणीने सादर होणार आहे. गुलालाचे कीर्तन संपल्यानंतर हजारो भाविकांनी महाप्रसादाचा लाभ घेतला. तसेच श्री समर्थ धोंडुतात्या महाराज यांच्या समाधीचे पूजन (अभिषेक) ह.भ.प. विजयानंद महाराज सुपेकर यांच्या हस्ते विधीवत पार पडले. यावेळी सादर करण्यात आलेल्या संत तुकाराम महाराजांच्या अभंगाने संपूर्ण वातावरण अधिकच भक्तिमय झाले-

देशील तरी पाहे पांडुरंगा ।।१।।
या संतासी निरवीं हेचिं मज देई ।
आणिक दुजें कांहीं न मागों देवा ।।२।।
तुका म्हणे आतां उदार तूं होई ।
मज ठेवी पायीं संताचिया ।।३।।

या अभंगाच्या माध्यमातून संतसंगाचे महत्त्व अधोरेखित करण्यात आले. जीवनात धन, मान, सुख यापेक्षा संतांचा सहवास श्रेष्ठ असून त्यांच्या मार्गदर्शनातूनच आत्मशांती व देवप्राप्तीचा मार्ग सापडतो, असा संदेश यावेळी देण्यात आला.

त्यामुळे कीर्तनातून केवळ भक्तीचा आनंदच नव्हे, तर जीवनमूल्यांची जाणीवही भाविकांना झाली. तसेच गावातील सर्व देवतांना नैवेद्य गावचे मानकरी बालाजी पाटील यांनी अर्पण केला. या महाप्रसादाचा हजारो भाविकांनी लाभ घेतला.

# मनुष्याच्या आचरणाचा प्रकाश देणारा ग्रंथ म्हणजे व्यवहार भानू होय- मधुमती नरेंद्र शिंदे

**तभा वृत्तसेवा**

**उदगीर, दि. २२ मार्च :** आज आधुनिक युगात एकीकडे विज्ञान आणि तंत्रज्ञान प्रचंड प्रगती करत आहे. तर दुसरीकडे अज्ञान, स्वार्थ, भ्रष्टाचार, असत्य आणी हिंसा देखील वाढत आहे. मनुष्याचे जीवन केवळ ज्ञानाने नाही तर त्याच्या वर्तन आचरणादी व्यवहाराने महान ठरते. मनुष्याच्या जीवनातील योग्य अशा आचरणाचा प्रकाश देणारा ग्रंथ म्हणजे व्यवहार भानू हा होय. असे मत मधुमती नरेंद्र शिंदे यांनी व्यक्त केले.




जागतिक महिला दिनाच्या पार्श्र्वभूमीवर संपन्न झालेल्या वाचक संवादचे ३५७ वे पुष्प मीनाक्षी स्वामी, पतंजली महिला राज्य प्रभारी, यांच्या अध्यक्षतेखाली सौ मधुमती नरेंद्र शिंदे यांनी महर्षी स्वामी दयानंद सरस्वती लिखित व्यवहार भानू या ग्रंथावर संवाद साधून गुंफले. गेल्या पंधरा वर्षापासून अखंडितपणे चालू असलेल्या चला कवितेच्या बनात उपक्रमांतर्गत चा हा कार्यक्रम जेष्ठ नागरिक संघांचे विरंगुळा केंद्र, अहिल्यादेवी होळकर सभागृह उदगीर येथे संपन्न झाला. पुढे बोलताना त्या म्हणाल्या की आळशीपणा हा मनुष्याचा सर्वात मोठा शत्रू आहे. अज्ञानामुळे मनुष्य चुकीचे निर्णय घेतो, वर्तन करतो. समाजातले असत्य बोलणे, चोरी, फसवणूक आणि शिक्षणाकडील दुर्लक्षामुळे मनुष्याच्या नैतिक मूल्यांचा ऱ्हास होत आहे. शिक्षण, ज्ञान, सत्य आणि परिश्रमाशिवाय प्रगती शक्य नाही. त्यासाठी चांगल्याचा सहवास आणि मेहनतीतूनच समाजात शांतता नांदेल. समाजाची प्रगती होऊन आनंद मिळेल. यासाठी योग्य मार्गदर्शक, गुरु, राजा, वैद्य कसा असावा त्याचे गुणदोष आणि आचरणाच्या संदर्भाने छोट्या छोट्या कथांच्या माध्यमातून या ग्रंथात नैतिक जीवनाचे मार्गदर्शन करण्यात आल्याचे सांगितले.

यानंतर झालेल्या चर्चेत अनेकांनी सहभाग नोंदवला. शेवटी अध्यक्षीय समारोपात मीनाक्षी स्वामी म्हणाल्या की सत्य, शिक्षण, परिश्रम आणि परोपकाराच्या आधारावरच उत्तम समाजाची निर्मिती होऊ शकते. त्यासाठी अशा वाचक संवादात येऊन माणसाने माणूसपण जपण्याचे शिकले पाहिजे.

कार्यक्रमाचे संचालन मुरलीधर जाधव यांनी केले तर आभार प्राध्यापक राजपाल पाटील यांनी मांडले. या कार्यक्रमास प्रतापसिंह चव्हाण, दिलीप कंधारे, अशोक नाईक, संभाजी मोहटे, धूळपा, बालाजी, ललिता बिरादार, संध्या बेद्रे, सुमित्रा कोयले, लता नळगिरे, विजया पाटील, डॉ. तन्मयी वैद्य, स्मिता पोद्दार, भगवती टवानी, राजनंदिनी बेंडकुळे, सुमती भातांबरे, पंचफुला जाधव आदींसह अनेक मान्यवर उपस्थित होते.

## दयानंद विज्ञान महाविद्यालयात युवातरंग वार्षिक स्नेहसंमेलनाचे आयोजन

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २२ मार्च :** येथील दयानंद शिक्षण संस्था संचलित, दयानंद विज्ञान महाविद्यालयात दि.२४ ते २५ मार्च २०२६ रोजी ' युवातरंग ' वार्षिक स्नेहसंमेलनाचे आयोजन दयानंद शिक्षण संस्थेचे अध्यक्ष लक्ष्मीरमण लाहोटी व सचिव रमेश बियाणी यांच्या मार्गदर्शनानुसार करण्यात आलेले आहे.या संमेलनाचे उदघाटन दि.२४ मार्च २०२६ रोजी सुप्रसिद्ध चित्रपट व नाट्य अभिनेते प्रशांत दामले या प्रमुख पाहुण्याच्या हस्ते सकाळी ठीक १०:०० वाजता होणार आहे.

सदरील ' युवातरंग ' वार्षिक स्नेहसंमेलनात आनंद नगरी,गीत गायन व नृत्य स्पर्धा,विविध गुणदर्शन,साधे व संगीत शेलापागोटे इतर सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आलेले आहे.समारोप व बक्षीस वितरण दि.२५ मार्च २०२६ रोजी होणार आहे. तसेच दि.२० व २३ मार्च २०२६ रोजी साहित्य आणि सांस्कृतिक मंडळाच्या वतीने निबंध, पोस्टर पेंटिंग, वक्तृत्व, गायन, मेहंदी, रांगोळी स्पर्धा, सिनेमॅटिक रिल शुट स्पर्धा, लोगो स्पर्धा आणि क्रीडा स्पर्धा घेण्यात आल्या आणि बॉलीवूड डे सारखे विविध डे उत्साहात साजरे करण्यात आले.वार्षिक स्नेहसंमेलन यशस्वी होण्यासाठी महाविद्यालयाचे प्र.प्राचार्य डॉ.सिद्धेश्र्वर बेल्लाळे यांच्या अध्यक्षतेखाली बैठक संपन्न झाली.विविध कमिटी तयार करण्यात आलेल्या असून प्रत्येकजण आपापली जबाबदारी कर्तव्यदक्षपणे पार पाडत आहेत.

या उद्घाटन व समारोपप्रसंगी महाविद्यालयाचे प्र.प्राचार्य डॉ. सिद्धेश्र्वर बेल्लाळे,उपप्राचार्य प्रा.भाऊसाहेब सरवदे,विद्यार्थी विकास मंडळ प्रभारी प्रा.डॉ.युवराज सारणीकर, सांस्कृतिक प्रभारी प्रा.मेघा पंडित, आयक्यूएसी समन्वयक डॉ.जमन अंगुलवार, सेल्फ फायनान्सचे प्राचार्य अनिलकुमार माळी, पर्यवेक्षिका डॉ. संध्या वाडीकर, पर्यवेक्षक डॉ.हेमंत वरूडकर,कार्यालयीन अधीक्षक नवनाथ भालेराव, सदस्य प्रा.भालचंद्र कोयलवार, डॉ.कोमल गोमारे असे आवाहन महाविद्यालयाचे प्र.प्राचार्य डॉ.सिद्धेश्वर बेल्लाळे व संयोजन समितीच्या वतीने करण्यात आलेले आहे.

# ग्राहक समिती महाराष्ट्र राज्य कार्यकारिणी जाहीर

**तभा वृत्तसेवा**

**उदगीर, दि. २२ मार्च :** ग्राहक समिती महाराष्ट्र राज्य एवमं ग्राहक जनजागरण व मार्गदर्शन संस्था महाराष्ट्र राज्य यांच्या संयुक्त विद्यमाने रविवार दि.१५ मार्च २०२६ रोजी सकाळी ११ वाजता श्री हावगीस्वामी कॉलेज महाविद्यालयातील सभागृहात जागतिक ग्राहक हक्क दिन मोठ्या उत्साहाने साजरा करण्यात आला. यावेळीच ग्राहक समिती महाराष्ट्र राज्याचे कार्य करणे ही जाहीर करण्यात आली. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ.ए.ए.काळगापुरे, प्राचार्य श्री.हावगी स्वामी महाविद्यालय, उदगीर हे होते तर प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. एन.जी.यमेकर उपप्राचार्य, श्री.हावगी स्वामी महाविद्यालय उदगीर, डॉ. एस.डी.लोहारे, डॉ.ए.आर कवठाळे, अर्थशास्त्र विभाग प्रमुख श्री हावगस्वामी महाविद्यालय, उदगीर, प्राध्यापक मनोहर भालके, दत्ता बिरादार, राम राठोड उपस्थित होते. तर प्रमुख पाहुणे व मुख्य मार्गदर्शक म्हणून ग्राहक समिती महाराष्ट्र राज्याचे संस्थापक राज्याध्यक्ष तथा प्रदेशाध्यक्ष तानाजीराव नरहरीराव गुंड, राज्याचे प्रदेश कार्याध्यक्ष सतीशकुमार बुरगुटे, ग्राहक जनजागरण व मार्गदर्शन संस्थेचे महाराष्ट्र राज्याचे संस्थापक प्रदेशाध्यक्ष तथा राज्याध्यक्ष बी.जी. शिंदे तसेच ग्राहक समिती महाराष्ट्र राज्याचे नवनिर्वाचित राज्य प्रदेश



संघटक तथा मराठवाडा अध्यक्ष बालासाहेब शिंदे, प्रा.डॉ.अविनाश प्रभातराव पाटील, प्रा.डॉ.सुनील यशवंतराव ढगे, तालुकाध्यक्ष प्राचार्य व्ही.एस.कणसे, शिरूर अनंतपाळ तालुकाध्यक्ष आर. एन.जाधव, प्रा.विकास पाटील उपस्थित होते. यावेळी विद्यार्थी, विद्यार्थिनी, पालक, महाविद्यालयीन कॉलेजकुमार, युवक, युवती, तरुणी, पदाधिकारी, कर्मचारी, ग्राहक स्वंयसेवक उपस्थित होते.

ग्राहक समिती महाराष्ट्र राज्य व ग्राहक जनजागरण व मार्गदर्शन संस्था महाराष्ट्र राज्य ग्राहकांमध्ये जनजागृती करण्यासाठी कार्यकर्ते कार्यरत असून, संस्थापक राज्याध्यक्ष तानाजीराव नरहरी गुंड, राज्य प्रदेश कार्याध्यक्ष सतीशकुमार बुरगुटे, नवनिर्वाचित बी.जी.शिंदे अतनूरकर राज्य कार्यकारी संघटक तथा मराठवाडा अध्यक्ष हे केंद्रीय कार्यकारिणीत आहेत.

ग्राहक समिती महाराष्ट्र राज्य उदगीर येथील ग्राहक जनजागरण व मार्गदर्शन मेळावा शिबिरात नवीन महाराष्ट्र प्रदेश राज्यसंघटक तथा मराठवाडा अध्यक्ष पदावर बी.जी.शिंदे अतनूरकर यांची निवड करण्यात आली तसेच त्यांना प्राचार्य काळगापुरे, राज्याध्यक्ष तानाजी गुंड, कार्याध्यक्ष सतीशकुमार बुरगुटे यांच्या हस्ते नियुक्तीपत्र देण्यात आले. उदगीर तालुका अध्यक्षपदी प्राचार्य व्यंकटराव कणसे, कार्याध्यक्षपदी प्रा.डॉ.अविनाश प्रभातराव पाटील, तालुका उपाध्यक्षपदी प्रा.डॉ.सुनील यशवंतराव ढगे, तालुकाध्यक्ष प्राचार्य व्ही.एस.कणसे, शिरूर अनंतपाळ तालुकाध्यक्ष आर.एन.जाधव, प्रा.विकास पाटील, व इतर पदाधिकारी निवडले गेले. तसेच पोलीस मित्र व ग्राहक समिती महाराष्ट्र राज्य, ग्राहक जनजागरण व मार्गदर्शन समिती महाराष्ट्र राज्य शासकीय शासननियुक्त नोंदणीकृत ग्राहक व पत्रकार संरक्षण संघटनेची नवीन कार्यकारिणी जाहीर झाली असून, ती ग्राहकांच्या हक्कासाठी सक्रिय राहणार आहे. या ग्राहक संस्थेचे उद्दिष्ट्ये सदोष वस्तू, सेवा आणि सायबर फसवणुकीविरुद्ध ग्राहकांना जागरूक करणे, तसेच तक्रार निवारण मंचाद्वारे न्याय मिळवून देणे हे नवीन कार्यकारिणीचे प्रमुख ध्येय आहे.

### रस्त्यात रिक्षा उभी; चालकावर गुन्हा

**लातूर :** सार्वजनिक रस्त्यावर वाहतुकीस अडथळा निर्माण होईल, अशा पद्धतीने वाहन उभे केल्याप्रकरणी गांधी चौक पोलिसांनी एका रिक्षा चालकाविरुद्ध गुन्हा नोंदविला आहे. ही कारवाई १६ मार्च रोजी 'गंजगोलाई' परिसरात करण्यात आली. पोलिस नाईक निकेतन बिराजदार यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार, रिक्षा क्रमांक (एमएच २४ एटी ७५६२) रस्त्याच्या मध्यभागी उभी असल्याचे आढळले. यामुळे सर्वसामान्यांच्या जीवितास धोका निर्माण झाल्याने कलम २८५ (बीएनएस) नुसार गुन्हा दाखल करण्यात आला असून, पोलिस अंमलदार होळंबे पुढील तपास करत आहेत. दरम्यान, प्रवासी घेण्यासाठी रस्त्यामध्ये ऑटो उभा करून अडथळा करण्याच्या घटना वारंवार घडत आहेत.

### रबीची काढणी शेवटच्या टप्प्यात

**लातूर :** जिल्ह्यात रब्बी हंगामातील पिकांची काढणी आता अंतिम टप्प्यात आली असून शेतकरी सध्या काढणीच्या कामात व्यस्त आहेत. सुमारे ३ लाख ५० हजार हेक्टरपेक्षा अधिक क्षेत्रावर रब्बी पिकांचा पेरा करण्यात आला होता. यामध्ये हरभरा पिकाचे क्षेत्र सर्वाधिक असून या पिकाने यंदा शेतकऱ्यांना चांगला दिलासा दिला आहे.हंगामाच्या सुरुवातीला पोषक हवामान आणि उपलब्ध पाण्यामुळे पिकांची वाढ चांगली झाली. त्यामुळे उत्पादनही समाधानकारक मिळत असल्याचे चित्र आहे. मात्र, मध्यंतरी झालेल्या अवकाळी पावसाचा काही भागातील पिकांवर परिणाम झाला असून काही ठिकाणी नुकसानही नोंदवले गेले आहे.

# निलंग्यात रमजान ईद उत्साहात साजरी

**तभा वृत्तसेवा**

**निलंगा, दि. २२ मार्च :** मुस्लीम बांधवांसाठी पवित्र असणारी रमजान ईद निलंगा शहरात शनिवारी मोठ्या उत्साहात आणि आनंदात साजरी करण्यात आली.

सकाळी १० वाजता शहरातील लातूर रस्त्यावरील ईदगाह मैदानावर एकत्रित नमाज पठण केल्यानंतर सर्व मुस्लीम बांधवांनी एकमेकांना 'ईद मुबारक' करत आलिंगन देऊन शुभेच्छा दिल्या. यानंतर शहरभर सर्वत्र ईदचा उत्साह पाहायला मिळाला. ईद ची नमाज जामा मस्जिद चे शाही इमाम हाफिज महेबूब रशिदी यांनी पाढवली .नमाज नंतर जागतिक शांतता सह देशातील शांतता सलोख्यासाठी दुवा करण्यात आले.



गेल्या महिनाभरापासून सुरू असलेल्या पवित्र रमजान महिन्यानिमित्त मुस्लीम बांधवांच्या रोजाची सांगता शुक्रवारी झाली. १९ फेब्रुवारीला रमजान महिन्याच्या सुरुवात झाली होती. या काळात शहरातील मशिदींमध्ये विद्युत रोषणाई करण्यात आली होती. तर पहाटेची सहेरी झाल्यानंतर दिवसभर नमाज, कुराण पठण करण्यात आल्यानंतर सायंकाळी इफ्तारीचे आयोजन केले जात होते. आज अबालवृद्धांनी नवीन कपडे परिधान करून नमाज पठाण केले. सर्वधर्मीयांकडून मुस्लीम बांधवांना शुभेच्छा देण्यात आल्या. अनेकजणांनी एकमेकांच्या घरी जाऊन शिरकुर्म्याचा आस्वाद घेत ईद साजरी केली. विविध राजकीय पक्षांनीदेखील ईदच्या शुभेच्छा दिल्या. लहान मुलांनीही सणाचा मनसोक्त आनंद लुटला.

रमजान ईद हा मुस्लीम धर्मियांसाठी पवित्र सण मानला जातो. महिन्याभराचे उपवास (रोजे), अल्लाहचे नामस्मरण, प्रेम, त्याग, समर्पण अशा वैशिष्ट्यांसाठी रमजान ईद ओळखली जाते. सामाजिक बंधुभाव, एकात्मता, भाईचारा वाढीस लागण्यात ईद महत्त्वाची ठरते. रमजानच्या निमित्ताने महिनाभर शहरातील वातावरण उत्साहाने भरून गेले होते. प्रत्यक्ष भेटींच्या सोबतच दिवसभर विविध समाजमाध्यमांवर अनेकांनी एकमेकांना ईदच्या 'व्हर्च्युअल' शुभेच्छा दिल्या. ईदच्या मुस्लिम बांधवाना शुभेच्छा देण्यासाठी ईदगाह मैदानावर काँग्रेस जिल्हाध्यक्ष अभय साळुंखे, नगराध्यक्ष संजयराज हलगरकर, डॉ.अरविंद भातांब्रे, अजित माने, विजयकुमार पाटील,पंकज शेळके,विलास लोभे, आदी उपस्थित राहून शुभेच्छा दिल्या.

लातूर
दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## मजविप' च्या वतीने पोलीस अधीक्षक अमोल तांबे यांचा सत्कार



**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २२ मार्च :** मराठवाडा जनता विकास परिषदेच्या वतीने लातूर जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक अमोल तांबे यांचा सत्कार करण्यात आला. लातूर येथील जिल्हा पोलीस अधीक्षक कार्यालय येथे हा सत्कार करण्यात आला. यावेळी मराठवाडा जनता विकास परिषदेचे जिल्हाध्यक्ष शिवाजी नरहिरे यांनीशाल, पुष्पगुच्छ देऊन तर सचिव पांडुरंग देडे यांनी त्यांचा गौरवग्रंथ 'संघर्यात्री' हे पुस्तक भेट देऊन सत्कार केला. मराठवाडा जनता विकास परिषद लातूरच्या वतीने लातूर जिल्ह्यतील पोलीस वेल्फेअर व पोलिस निवास हाउसिंग प्रकल्पावर यावेळी चर्चा झाली. नवीन पोलीस स्टेशन व पोलिस स्टेशन बांधकाम प्रलंबित प्रकल्प याची माहिती घेतली या बजेटमध्ये लातूर जिल्ह्यातील पोलिस प्रकल्पाला किती निधी प्राप्त झाला आहे त्यावर चर्चा झाली. मराठवाडा जनता विकास परिषद. या प्रसंगी मराठवाडा जनता विकास परिषदेचे जिल्हाध्यक्ष शिवाजी नरहिरे, सचिव पांडुरंग देडे आदींची उपस्थित होते..



# शिक्षक हे मुलांवर सर्वात जास्त प्रभाव टाकणारे व्यक्तिमत्व : डॉ. भूषण शुक्ल





**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २२ मार्च :** सध्यस्थितीत मुले पालकांपेक्षा शिक्षकांसोबत जास्त वेळ असतात. त्यामुळे शिक्षकांकडून जी मूल्ये विद्यार्थ्यांमध्ये रुजवली जा-तात त्यांचा त्यांच्या जडणघडणीवर खूप मोठा प्रभाव पडत असतो. कारण शिक्षक हे मुलांवर सर्वात जास्त प्रभाव टाकणारे व्यक्तिमत्व असते, असे प्रतिपादन पुण्याचे ख्यातनाम बालमानसोपचार तज्ज्ञ डॉ. भूषण शुक्ल यांनी केले.

सावली सेंटर फॉर मेंटल हेल्थ अँड रिसर्च हॉस्पिताल व मानसिक आरोग्याच्या क्षेत्रात काम करणारी सेवाभावी संस्था सोसायटी फॉर वेलबेईंग अवेअरनेस अँड रिहॅबिलिटेशन (स्वर) लातूरच्या वतीने येथील श्रीकिशन सोमाणी विद्यालयाच्या कस्तुर-कंचन सभागृहामध्ये लातुरा-तील विविध शाळांमधील शिक्षकांसाठी आयोजित करण्यात आलेल्या ' विद्यार्थ्यांची मानसिकता- शिक्षकांना काय माहिती असायला हवे' या विषयावरील कार्यशाळेत डॉ. शुक्ल मार्गदर्शन करत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रा. अनिल जायभाय हे होते. यावेळी अभिनव मानव विकास संस्थेचे अध्यक्ष डॉ. चेतन सारडा, श्रीकिशन सोमाणी विद्यालयाच्या शालेय समितीचे अध्यक्ष अतुल देऊळगावकर, डॉ. दिनेश पाटील, डॉ. मुग्धा पोतदार आदी मान्यवरांची प्रमुख उपस्थिती होती. आजच्या स्पर्धेच्या युगात बदललेली मूल्यव्यवस्था, सामाजिक वातावरण, बदललेल्या पालकत्वाच्या संकल्पना, जागतिकीकरण, सोशल मिडिया व तंत्रज्ञानाचा वाढलेला वापर अशा अनेक कारणांमुळे शालेय विद्यार्थ्यांसमोरील मनोसामाजिक आव्हाने व समस्या वाढत चालल्या आहेत. या आव्हाने व समस्यांचा सामना विद्यार्थ्यांसोबत काम करणाऱ्या शिक्षकांनाही करावा लागतो. विद्यार्थ्यांच्या मानसिक जडणघडणीत शिक्षकांची भूमिका महत्वाची असते. त्यामुळे आजच्या जगा-तील विद्यार्थ्यांची मानसिकता समजून घेणे अत्यावश्यक असल्याने सदर कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते.

या कार्यशाळेत डॉ. भूषण शुक्ल यांनी लातूर मधील विविध शाळांच्या प्रतिनिधी शिक्षकांशी संवाद साधला. शिक्षकांनी स्वतःला अजिबात कमी लेखू नये. आपले काम काम करीत असताना शिक्षकांनी आपल्यातील आत्मविश्वास, आपली देहबोली यावर विशेष लक्ष द्यायला हवे असे त्यांनी सांगितले. कारण या गोष्टी मुलांमध्ये आत्मविश्वास निर्माण करण्यासाठी आणि शिक्षक मुलांना जे शिकवित असतात ते त्यांच्यापर्यंत पोहोचण्यासाठी अत्यंत आवश्यक असतात. शाळेत येणार प्रत्येक मूल हे त्याचे अनेक विषयांबद्दलचे विचार व भावना घेऊन वर्गात येत असते. त्यामुळे शिक्षकांना त्याची जाण असणे, त्याच्या भावनांना समजून उत्तेजित मनाला शांत करता आले तरच त्याला शिकवलेल्या गोष्टी त्याच्यापर्यंत योग्य पद्धतीने पोहोचू शकतात. विद्यार्थ्यांच्या सकारात्मक जडणघडणीमध्ये योगदान देत असताना त्यातून आपण राष्ट्र उभारणीचे कार्य हे खरोखरच करीत असतो याची जाण प्रत्येक शिक्षकाने ठेवायला हवी. तसेच शिक्षकांनी स्वतःला आपण एक महत्त्वपूर्ण काम करीत आहोत, हे बजावायला हवे असे डॉ. शुक्ल म्हणाले. विद्यार्थ्यांचा मेंदू कोणत्या पद्धतीने काम करतो, याचे शास्त्रीय विश्र्लेषण करीत आपल्याला त्याच्यापर्यंत आपले विचार आणि आपला विषय पोहोचवण्यासाठी कशा पद्धतीने वागायला व बोलायला हवे याबद्दल त्यांनी शिक्षकांना विविध क्लुप्त्या सांगितल्या.

सत्राच्या शेवटी शिक्षकांच्या विविध प्रश्नांची डॉ. भूषण शुक्ल यांनी समर्पक उत्तरे दिली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. मिलिंद पोतदार यांनी केले. प्रास्ताविकात त्यांनी या कार्यशाळेच्या आयोजनामागची भूमिका सविस्तरपणे विशद केली. या कार्यक्रमात विविध शाळातील जवळपास १८० शिक्षकांनी सहभाग नोंदवला.

### संत गोरोबा सोसायटी महिल मंडळाकडून स्वामी समर्थ महाराजांची आरती व अन्नदान



**लातूर :** राज्याचे माजी मंत्री, आमदार अमित विलासराव देशमुख यांच्या वाढदिवसानिमित्त लातुर शहरातील संत गोरोबा सोसायटी महिला मंडळाच्या वतीने श्री स्वामी समर्थ महाराजांची विधिवत पूजन करण्यात आले. तसेच यावेळी माजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांना निरोगी दीर्घायुष्य,यशस्वी राजकीय कारकीर्द आणि अखंड जनसेवा त्यांच्या हस्ते घडत राहो अशी श्री स्वामी समर्थ महाराज यांच्या चरणी मनोभावे प्रार्थना करण्यात आली. दरम्यान या पवित्र प्रसंगी परिसरातील बाल गोपाळ, महिला भगिनी,नागरीक यांच्या समवेत अन्नदान उपक्रम राबवत आमदार अमित देशमुख यांचा वाढदिवस मोठ्या उत्साहात आणि आनंददायी वातावरणात साजरा करत अभिष्टचिंतन्यात आले.

### कॉईल नगरमधील रस्त्याची दुरवस्था

**लातूर :** शहरातील कॉईल नगर भागातील मुख्य रस्त्यावरील पेव्हर ब्लॉक उघडल्याने दुरवस्था झाली असून, या रस्त्यावरुन वाहनधारकांना जाताना अनेक अडचणींचा सामना करावा लागत आहे. रस्त्याच्या मधोमध खोदून रस्ता तसाच बुजविण्यात आला आहे. या रस्त्याच्या कडेला पार्किंग असल्याने दुचाकी वाहनांना खोदलेल्या रस्त्यावरुन जावे लागत आहे. त्यामुळे वा-हने असंतुलित होऊन घसरून पडत आहेत. पावसाळा सुरू होण्यापूर्वी या रस्त्याची दुरुस्ती करावी, अशी मागणी होत आहे.

### महामार्गावरील पथदिवे बंद

**लातूर :** शहरातील बाभळगाव नाका ते बाभळगाव या मुख्य महामार्गावर पथदिवे बंद असल्याने वाहनधारक आणि पादचाऱ्यांना जीवघेण्या प्रवासाला सामोरे जावे लागत आहे. बाभळगाव नाका, म्हाडा कॉलनी, आरटीओ ऑफिस, पोलिस ट्रेनिंग सेंटरपर्यंत रात्रीच्या वेळी रस्त्यावर दिवे नसल्यामुळे धोकादायक परिस्थिती निर्माण झाली आहे. रस्त्यावरील पथदिवे बंद असल्यामुळे अंधारात अनेक ठिकाणी 'यू-टर्न' घेताना चालकांचा अंदाज चुकत आहे.

### दुचाकी लंपास; अज्ञातावर गुन्हा

**लातूर :** औसा तालुक्यातील मलगा येथे घरासमोर उभी केलेली होंडा युनिकॉर्न (एमएच २४ सीई ६७३३) अज्ञात चोरट्याने चोरून नेल्याची घटना घडली आहे. फिर्यादी अभिषेक बालाजी पवार यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, ११ मार्चच्या रात्री ही चोरी झाली. साधारण १,४०,००० रुपये किमतीची ही दुचाकी चोरट्याने पळवून नेली असून, किल्लारी पोलिस ठाण्यात याप्रकरणी गुन्हा नोंदवण्यात आला आहे. पोलिस हवालदार साळुंखे या प्रकरणाचा अधिक तपास करीत आहेत.

## सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांच्या हस्ते जिल्हा सार्वजनिक ग्रंथालय संघाचे ४१ वे वार्षिक अधिवेशनाचे होणार उद्घाटन

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २२ मार्च :** वडवळ ना.येथील अमर ज्योती ग्रंथालयाच्या सुवर्ण महोत्सवी वर्षानिमित्त लातूर जिल्हा सार्वजनिक ग्रंथालय संघ आणि अमरज्योती ग्रंथालय वडवळ ना.च्या संयुक्त विद्यमाने,जिल्हा सार्वजनिक ग्रंथालय संघाचे ४१ वे वार्षिक अधिवेशन शनिवार,दि.२८ मार्च २०२६ रोजी सकाळी ८ ते सायंकाळी ५ या वेळात ग्रंथदिंडी,उद्घाटन समारंभ,पुरस्कार वितरण परिसंवाद,खुलीचर्चा,ठराव वाचन आदि कार्यक्रमांनी तीन सत्रांमध्ये,वटसिध्दनागनाथ मंदिर,वडवळ ना.येथे आयोजित करण्यात आले असून,त्याचे उद्घाटन सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांच्या हस्ते होणार आहे,अशी माहिती अमर ज्योती ग्रंथालयाचे अध्यक्ष तथा अधिवेशन स्वागताध्यक्ष वैजनाथअप्पा नंदागवळे यांनी दिली.



जिल्हा सार्वजनिक ग्रंथालय संघाच्या अधिवेशनाचा एक भाग म्हणून सकाळी ८ वाजता आयोजित ग्रंथ दिंडीचे पूजन विश्वासराव पाटील,गंगाधरअप्पा कल्याणे,राम मोतीपवळे,अशोकराव खोडवे यांच्या हस्ते होणार आहे.त्यानंतर ग्रंथदिंडीप्रमुख संतोष आचवले,माणिकराव हालिंगे,सुरेश राजोळे व आनंद कापसे यांच्या प्रमुख उपस्थितीत ही गंथदिंडी ग्रंथालय ते वटसिध्द नागनाथ मंदिरापर्यंत काढण्यात येणारआहे.

सकाळी ११ वाजता या अधिवेशनाचे उद्घाटन राज्याचे सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांच्या हस्ते,महाराष्ट्र राज्य ग्रंथालय संघाचे अध्यक्ष डॉ.गजानन कोटेवार यांच्या अध्यक्षतेखाली होणार आहे. या वेळी विशेष अतिथी म्हणून जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे, ज्येष्ठ साहित्यिक विचारवंत डॉ.नागोराव कुंभार आणि राज्याचे ग्रंथालय संचालक अशोक गाडेकर यांची उपस्थिती लाभणार आहे.तर प्रमुख पाहुणे म्हणून सहाय्यक ग्रंथालय संचालक सुनील हुसे,जिल्हा ग्रंथालय अधिकारी वंदना काटकर देशमुख,राज्य ग्रंथालय संघाचे कार्याध्यक्ष गुलाबराव पाटील,कोषाध्यक्ष भिमराव पाटील,माजी अध्यक्ष प्राचार्य डॉ. रामेश्वर पवार,मराठवाडा ग्रंथालय संघाचे अध्यक्ष खंडेराव सरनाईक,कार्याध्यक्ष प्रभाकर कापसे,प्रमुख कार्यवाह राम मेकले,जिल्हा सार्वजनिक ग्रंथालय संघाचे कार्याध्यक्ष डॉ. ब्रिजमोहन झंवर, उपाध्यक्ष युवराज जाधव यांची उपस्थिती राहील.

यावेळी सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांच्या हस्ते रवींद्र कालेकर यांना कै.ॲड. त्र्यंबकदास झंवर आदर्श ग्रंथालय कार्यकर्ता राज्यस्तरीय पुरस्कार,जिल्हा सार्वजनिक ग्रंथालय संघाचे माजी अध्यक्ष हावगीराव बेरकीळे यांना जीवन गौरव पुरस्कार,किनगावच्या स्वामी विवेकानंद वाचनालयाचे अशोक मुंढे यांना कै.मारोती चिरके आदर्श ग्रंथपाल जिल्हास्तरीय पुरस्कार प्रदान करण्यात येणार असून, शासनाचा ग्रंथमित्र पुरस्कार प्राप्त धनंजय पवार व सूर्यकांत जाधव यांचा सत्कार करण्यात येणार आहे.

दुपारी २ वाजता कर्मचारी समस्या व उपाय या विषयावर किरण बोबळसुरे यांच्या अध्यक्षतेखाली होणाऱ्या दुसऱ्या सत्रात जहांगीर सय्यद व शादुल शेख हे विचार मांडणार आहेत. दुपारी ३ वाजता खुली चर्चा,ठराव वाचन व अधिवेशन समारोप सहाय्यक ग्रंथालय संचालक सुनील हुसे यांच्या अध्यक्षतेखाली होईल.यावेळी जिल्हा ग्रंथालय अधिकारी वंदना काटकर याचे प्रमुख मार्गदर्शन होणार आहे.विठ्ठल कटके हे ठरावाचे वाचन करतील.

तरी या अधिवेशनाला ग्रंथालय पदाधिकारी,कर्मचारी व साहित्य प्रेमींनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन अमरज्योती ग्रंथालयाचे सचिव वसंत बेरकीळे,उपाध्यक्ष विश्वनाथ भेटे,सहसचिव शिवाजी कल्याणे,कोषाध्यक्ष दिगंबर भेंडे,संचालक विश्वासराव पाटील,सिद्रामप्पा आचवले, संभाजी बेरुळे,मनिषा महाजन,सुवासिनी यमपल्ले,सेवक दत्ता कांबळे, जिल्हा सार्वजनिक ग्रंथालय संघाचे सहकार्यवाह काशीनाथ बोडके,संचालक सूर्यकांत शिरसे,गुप्तलिंग स्वामी,नंदकुमार घोगरे,अनिल पाटील,बाळकृष्ण होळीकर,श्रीधर स्वामी, काशीनाथ साहू,तुकाराम सुगावकर,बालाजी सुर्यवंशी,गोकर्णा जाधव, राजकुमार सोनी,नागनाथ बिरादार,रामचंद्र तिरुके, डॉ.अमित म्हेत्रे व संयोजन समितीचे वैभव पाटील,दयानंद पाटील,दिगंबर भेंडे,संभाजी बेरुळे,ज्ञानेश्वर बेरकीळे,गंगाधर यवंदगे,मुरलीधर सोनकांबळे,बालाजी गंदगे, उमाकांत आचवले,सांगर नवणे, विवेकानंद पाटील,नागनाथ बेंडके,उमाकांत लव्हराळे, माहदेव भेटे, गंगाधर कल्याणे,भरतसिंह ठाकूर,संभाजी रेकुळगे,धनश्री मॅडम,मीना देवकते,प्रकाश बेरुळे,विश्वनाथ बेंडके,काशिनाथ रेड्डी,श्रीधर बेरकीळे,सतीष सांगवे,महादेव खिचडे इत्यादींनी केले आहे.

## जिल्हा स्तरीय बचत गट विक्री व प्रदर्शन हिरकणी हाट चे उद्घाटन उत्साहात संपन्न

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २२ मार्च :** जिल्हा स्तरीय बचत गटांच्या उत्पादनांना हक्काची बाज-ारपेठ उपलब्ध करून देण्यासाठी आयोजित करण्यात आलेल्या हिरकणी हाट या विक्री व प्रदर्शनाचे उद्घाटन लातूर जिल्हा परिषद अध्यक्षा उषाताई पाटील याच्या हस्ते मोठ्या उत्साहात पार पडले. या कार्यक्रमास प्रमुख मान्यवर म्हणून जिल्हा परिषद उपाध्यक्ष दयानंद सुरवसे, राज्य कृषी मूल्य अध्यक्ष पाशा पटेल तसेच जिल्हा परिषद सदस्य, पंचायत समिती सभापती,उपसभापती ,पंचायत समिती सदस्य जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी राहुल कुमार मीना, प्रकल्प संचालक संजय इंगळे , जिल्हा अभियान व्यवस्थापक देवकुमार कांबळे तसेच जिल्हा परिषद विविध विभागाचे विभाग प्रमुख यांची उपस्थिती लाभली.

प्रसंगी जिल्हा परिषद उपाध्यक्ष यांनी उमेदच्या या हिरकणी हाट उपक्रमाचे कौतुक करून महिलाना प्रोत्साहित करूण विक्रीसाठी शुभेच्छ्या दिल्या.

गावाखेड्यातून आलेल्या या गटाच्या ताईंनी प्रामाणिकपणे आपल्या जिद्दीने तयार केलेले विविध पदार्थ हे नक्कीच नाविन्यपूर्ण असून ते ग्राहकांचे लक्ष वेधून घेणारे आ-हेत या बचत गटाच्या यशाच्या उत्सवाला सर्व लातूरकरांनी भरभरून प्रतिसाद द्यावा असे आवाहन करून स्टॉल धारक महिलाना राज्य कृषी मूल्य आयोग अध्यक्ष पाशा पटेल यांना शुभेच्छा दिल्या.

मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद राहुल कुमार मीना यांनी हिकारनी हाट मध्ये मिळणाऱ्या विविध वस्तू आणि पदार्थ हे कायमस्वरूपी उपलब्ध होतील यासाठी जिल्हा परिषद परिसरात हिरकणी मॉल ही संकल्पना राबविण्यात येणार असून जिल्ह्यातील सर्व हिरकणीचे उत्पादने एका छताखाली येणार असल्याचे प्रसंगी नमूद करून स्टॉल धारक महिलाना प्रोत्साहित केले.

जिल्हा अभियान व्यवस्थापक देवकुमार कांबळे यांनी उमेद अभियानाच्या माध्यमातून देण्यात येणाऱ्या फिरता निधी, समुदाय गुंतवणूक निधी, वैयक्तिक व्यवसाय कर्ज विनियोग कशा पद्धतीने महिलांनी करावा याविषयीची सविस्तर माहिती दिली. यावेळी महिलाना विविध कर्ज वितरण धनादेश मान्यवरांचे हस्ते वितरीत करण्यात आले.

प्रसंगी जिल्हाची उमेद अभियानाची सद्यस्थिती तसेच हिरकणी हाट मध्ये लावण्यात आलेल्या विविध स्टॉल तसेच विक्री व प्रदर्शन आयोजनाचा उद्देश याविषयी सविस्तर माहिती प्रास्ताविकातून नमूद केली.

उद्घाटन प्रसंगी मान्यवरांनी बचत गटांनी तयार केलेल्या विविध दर्जेदार व आकर्षक उत्पादनांचे कौतुक केले. स्थानिक पातळी-वर तयार होणाऱ्या वस्तूंना प्रोत्साहन मिळावे आणि महिलांना आर्थिक स्वावलंबन साधता यावे, हा या उपक्रमामागील मुख्य उद्देश असल्याचे त्यांनी सांगितले.

प्रसंगी सर्व मान्यवरांनी बचत गटाच्या स्टॉलला भेट देऊन स्टॉलवरिल विविध नाविण्यपूर्ण उत्पादनांचे कौतुक करून महिलाना प्रेरित केले.

# माजी कुलगुरू डॉ. जनार्दन वाघमारे यांचे स्मारक लातुरात व्हावे; लातूरच्या श्रद्धांजली सभेत मान्यवरांचा सूर

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २२ मार्च :** महाराष्ट्रातील ज्येष्ठ पुरोगामी विचारवंत, सुप्रसिद्ध साहित्यिक, नांदेडच्या स्वारातीम विद्यापीठाचे संस्थापक कुलगुरू, माजी खासदार डॉ. जनार्दन वाघमारे यांच्या विचारांचा वारसा जतन करण्यासाठी नांदेडच्या नरहर कुरुंदकर स्मारकाच्या धर्तीवर लातूर येथे त्यांचे स्मारक उभे राहिले पाहिजे, त्यासाठी राजकीय इच्छाशक्तीचीही गरज आहे, असा सूर लातूर येथे शुक्रवारी आयोजित डॉ. जनार्दन वाघमारे श्रद्धांजली सभेत अनेक मान्यवर वक्त्यांनी व्यक्त केला.

येथील दयानंद सभागृहात झालेल्या या श्रद्धांजली सभेत मराठवाड्यातील विविध क्षेत्रांतील मान्यवरांनी भावपूर्ण आदरांजली वाहिली. ज्येष्ठ साहित्यिक व नाटककार प्रा. दत्ता भगत आणि ज्येष्ठ विचारवंत डॉ. सूर्यनारायण रणसुभे यांच्या शोक संदेशांचे यावेळी वाचन करण्यात आले.

महाराष्ट्राच्या वैचारिक बांधणीत डॉ. वाघमारे यांचा मोलाचा वाटा असून सामाजिक क्षेत्रातील त्यांचे योगदान दिशादर्शक आहे, असे सांगून डॉ. नाग-ोराव कुंभार यावेळी म्हणाले, सामाजिक न्याय समता या मूल्यांचा आग्रह धरणारे सर्वसमावेशक विचारवंत म्हणून डॉ. वाघमारे यांच्या विचारांची जपणूक झाली पाहिजे त्यामुळे भविष्यात पुरोगामी चळवळीला अधिक बळ आणि दिशा मिळेल. तर, सर्वोदय चळवळीचे नेते व इतिहासाचे अभ्यासक प्राचार्य डॉ. सोमनाथ रोडे यांनी दलित व ग्रामीण साहित्याचा वारसा, वाचन संस्कृती, संविधान, यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान प्रकल्पाचा वारसा आपण पुढे घेऊन जाऊ या, असे सांगितले.

जिल्हा पोलीस अधीक्षक अमोल तांबे म्हणाले, सामाजिक, शैक्षणिक , राजकीय आणि वैचारिक क्षेत्रात लातूरची ओळख महाराष्ट्राबाहेर निर्माण करणाऱ्या डॉ. वाघमारे यांची वैचारिक ग्रंथसंपदा राज्याला मार्गदर्शक अशीच आहे. लातूरने शैक्षणिक क्षेत्रात पश्र्चिम महाराष्ट्राची मक्तेदारी मोडून काढली आणि लातूर पॅटर्न तयार केला या लातूर पॅटर्न चे सर्व श्रेय डॉ. वाघमारे यांनाच जाते. लातूरमध्ये त्यांचे उचित स्मारक उभे राहिले पाहिजे, असे प्रतिपादन सुप्रसिद्ध साहित्यिक प्रा. डॉ. शेषराव मोहिते यांनी केले.

भूकंप ही विस्थापतिमानुन आपल्या स्वप्नातील जातीपाती विरहित चलबुर्गा हे गाव डॉ. वाघमारे यांनी उभारले होते.



अतिशय प्रतिकूल परिस्थितीत उच्च शिक्षण घेतलेले डॉ. वाघमारे हे तळागाळापर्यंत शिक्षणाचा विस्तार व्हावा यासाठी कायम प्रयत्नशील राहिले त्यांचा विचार शैक्षणिक कार्य हे पुरोगामी चळवळीला बळ देण-ारे आणि गती देणारे आहे असा विचारही अनेक मान्यवर व त्यांनी व्यक्त केला.

यावेळी जितेंद्र वाघमारे, लक्ष्मीरमण लाहोटी, डॉ. सुचेता वाघमारे-शास्त्री, आकांक्षा जाधव-शास्त्री, प्राचार्य डॉ. एम. एस .दडगे, ड. धनंजयभाई पाटील, डॉ. राम बोरगावकर, डॉ. रमेश भराटे, ज्येष्ठ पत्रकार जयप्रकाश दगडे, कवी योगीराज माने, माजी मंत्री विनायकराव पाटील, राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे नेते राजेश्र्वरराव देशमुख, दत्ता सुरवसे, भारत सातपुते, डॉ. रणजीत जाधव, ड. वसंतराव उगले, प्राचार्य डॉ. बाबासाहेब ठोंबरे, परभणीच्या वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. अशोक ढवण, अरविंद कांबळे, प्राचार्या कुसुम मोरे, प्रा. दत्ता सोमवंशी, प्राचार्य डॉ, महादेव गव्हाणे, शरद झरे, शेतकरी नेते लक्ष्मण वांगे, विजय चव्हाण, अजित पाटील कव्हेकर, प्रा. नयन राजमाने, बाबासाहेब सीतापुरे, ओमप्रकाश आर्य, शिवदासजी लखादिवे, विद्याधर कांदे-पाटील, रमेश दापके, प्रा. सतीश यादव, प्राचार्य डॉ. संजय वाघमारे, डॉ. जयद्रथ जाधव, बाबा सितापुरे, ओमप्रकाश झुरु-ळे, आदी मान्यवर वक्त्यांनी डॉ. जनार्दन वाघमारे यांच्या शैक्षणिक व वैचारिक प्रव-ासाचा वेध घेतला. डॉ. वाघमारे यांच्या आठवणींना अनेकांनी उजाळा दिला. सभेच्या आयोजनासाठी प्रा. डॉ. नाग-ोराव कुंभार, डॉ दिगंबर नेटके, प्रा सुधीर साळुंखे, प्रा. डॉ. विनोद चव्हाण आदींनी परिश्रम घेतले. या श्रद्धांजली सभेचे संचलन डॉ. विवेक सौताडेकर यांनी केले.